## नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

ग्राममंगल

# शिक्षणवेध

**शिक्षणातील प्रश्नांकडून उत्तरांकडे जाण्याचा एक मासिक प्रयत्न**

**शिक्षणात मूलगामी परिवर्तनाची वाट शोधणारा एक मासिक प्रकल्प**

**शिक्षणाकडे सर्व दिशांनी पाहणारा एक मासिक दृष्टिक्षेप**



**निसर्ग हाच शिक्षणासाठी योग्य वातावरण पुरवितो. त्यामुळे पुस्तकांकरवी अप्रत्यक्ष पद्धतीने ज्ञान मिळवण्यापेक्षा, मुलांनी प्रत्यक्ष वातावरणातून शिकणे जास्त चांगले.**

ग्राममंगल

# शिक्षणवेध

शिक्षणातील परिवर्तनासाठी

**वर्ष : तिसरे । अंक सहावा**

**जानेवारी २०१३**



■
संपादक
रमेश पानसे

■
कार्यकारी संपादक
डॉ. वैखरी वैद्य

■
संपादन साहाय्य
मुग्धा नलावडे

■
व्यवस्थापकीय संपादक
प्रसाद मणेरीकर

■
संचालक
अदिती नातू

■
संपादक मंडळ
डॉ. द. ना. धनागरे । डॉ. हेमचंद्र प्रधान
विवेक सावंत । आशिष पेंडसे

■
सल्लागार मंडळ
डॉ. राम ताकवले । डॉ. जब्बार पटेल
कुमार केतकर । प्रमोद लेले । दीपक घैसास ।
डॉ. चंद्रहास देशपांडे । अच्युत गोडबोले

■
कार्यकारी संचालक
अजित मंडलिक

■
जाहिरात प्रतिनिधी
देवेंद्र कुलकर्णी
संपर्क : ०८९७५७८९७३८
devenkul.pune@gmail.com

■
मुखपृष्ठ
राजू देशपांडे

■
आतील चित्रे
अपर्णा कुलकर्णी

■
सजावट । मांडणी
संतोष कांबळे
भ्र. ८४४६१२९६९८


---


संपादकीय व कार्यालयीन पत्रव्यवहार
ग्राममंगल शिक्षणवेध : 'सृष्टी' अपार्टमेंट,फ्लॅट नं.१०६, सिंहगड रोड,पुणे-३०.
संवाद -०२०-२४२५२१५१
पुणे कार्यालय
गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११ ०३८.
Email : shikshanvedh@grammangal.org, संवाद : ०२० २५३८६६८७
प्रसिद्धी आणि जाहिरात संपर्क
अजित मंडलिक : २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७., संवाद : ०९८६९०४९८४९
बँकर्स : दि ठाणे जनता सह. बँक लि.
कायदेतज्ज्ञ आणि सल्लागार : हेमांगी जोशी

---

हे मासिक मुद्रक-प्रकाशक अजित मंडलिक यांनी ग्राममंगल संस्थेसाठी इम्प्रेशन, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ येथे छापून त्याच ठिकाणाहून प्रसिद्ध केले.

## अनुक्रम


संपादकीय/६

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे पुणे येथील एकोणिसावे अधिवेशन.../डॉ. अ. गो. भाळवणकर/९

बालशिक्षणातील रचनावाद/वर्षा उदयन कुलकर्णी/१६

अहवाल एकोणिसाव्या अधिवेशनाचा/शैला चिटणीस/२०

मानपत्र स्वीकारताना.../कालिदास मराठे/२७

शास्त्रीय बालशिक्षणाच्या युगाची निर्मिती/रमेश पानसे/३०

महाराष्ट्र बालशिक्षण परिषद : सामजिक चळवळ/अनिल जोशी/३५

प्रतिमानासह अध्यापन एक सर्जनात्मक प्रयोग/डॉ. रत्ना गुजर/३८

वृत्तविशेष/४९

वृत्तविश्व/५१

ग्राममंगल वार्ता/५४

रोमराज्यातील शिक्षण व्यवस्था/सुनित पोतनीस/५८

संगीत : आनंददायी कला/उर्मिला मराठे/६०

सजग पालकत्वाच्या दिशेने/डॉ. अपर्णा कुलकर्णी /६२

संवेदनशीलता वाढवा/आसावरी गुपचूप/६४


महाराष्ट्र बालशिक्षण परिषद, पुणे शाखा, ग्राममंगल आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने, पुणे येथे परिषदेचे एकोणिसावे राज्यव्यापी अधिवेशन संपन्न झाले. त्यानिमित्ताने...

संपादकीय

# अधिवेशनाच्या निमित्ताने

‘महाराष्ट्र बालशिक्षण परिषद’ ही ‘शास्त्रीय बालशिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणा’ चा ध्यास घेतलेली संस्था. १९९४ पासून, महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांमध्ये, प्रबोधनाची एक चळवळ म्हणून कार्यरत असलेली. दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात या परिषदेच्या सदस्यांचे वार्षिक अधिवेशन भरविले जाते. मागील वर्षी धुळे येथे तर यावर्षी पुणे येथे असे अधिवेशन भरविण्यात आले. भारतातील बालशिक्षणाचे आद्य प्रणेते गिजुभाई बधेका यांचा १५ नोव्हेंबर हा जन्मदिन, परिषदेकडून ‘बालशिक्षणदिन’ म्हणून साजरा होतो. त्या निमित्ताने असे वार्षिक अधिवेशन भरविले जाते.

या वर्षीचे अधिवेशन दि. १९ ते २१ नोव्हेंबर २०१२ असे तीन दिवस, ‘गणेश कला क्रीडा केंद्र,’ पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. ‘परिषदेची पुणे शाखा’, ‘ग्राममंगल’ संस्था आणि ‘महाराष्ट्र ज्ञान महामंडळ’ यांनी एकत्रितरित्या परिषदेच्या अधिवेशनाचे यजमानपद घेतले होते. दरवर्षी एखाद्या विषयाभोवती, अधिवेशनातील सर्व कार्यक्रम गुंफले जातात. या वर्षीचा विषय ‘शिक्षणातील गुणवत्ता’ हा होता.

सोमवार दि.१९ नोव्हेंबरला सकाळी परिषदेचे उद्‌घाटन, अहमदाबाद मधील ‘कॅलोरेक्स टीचर्स युनिव्हर्सिटी’ चे कुलगुरू डॉ. अ गो. भाळवणकर यांनी केले. त्यांच्या विद्वत्ताप्रचुर भाषणात, त्यांनी शिक्षणातील गुणवत्तेची व्याख्या ठरविण्याचा प्रयत्न केला. अशी व्याख्या ठरविताना, लक्षात घेण्याची ‘आठ गृहितके’ त्यांनी मांडली. शिक्षणातील गुणवत्तेकडे पाहण्याची डॉ. भाळवणकर यांची दृष्टी गणितज्ञाची होती तर त्यांच्या विवेचनाची शैली भाषातज्ञाची होती. शिक्षणातील गुणवत्तेकडे अगदी भिन्न अशा नव्या दृष्टिकोनातून कसे पाहता येते हे आपल्या भाषणात त्यांनी दाखवून दिले. अशा उद्‌घाटनाच्या भाषणामुळे परिषदेच्या अधिवेशनाची सुरूवातच मुळी एका उंचीवर पोचली. आणि पुढील दोन दिवसांतील सारे कार्यक्रम या उंचीवरच राहिल्याचे सर्व सदस्यांना प्रत्ययाला आले.

परिषदेचे अध्यक्ष, श्री. अ.वि. जोशी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात, गांधीजींच्या 'नयी तालीम' शिक्षणाच्या अमृत महोत्सवाचे निमित्त साधून, या संकल्पनेचा इतिहास व त्याची काल सुसंगतता यांचा उहापोह केला. 'नयी तालीम'ची शिक्षणप्रणाली, कशा तऱ्हेने आजच्या रचनावादी शिक्षणप्रणालीशी नाते जुळवते, हेही उदाहरणे देऊन श्री. जोशी यांनी विशद केले. वर्धा येथे सेवाग्राम आश्रमात चालू असलेल्या आधुनिक रूपातील 'नयी तालीम' चे स्वरूप त्यांनी सांगितले. शिक्षणातील गुणवत्तेच्या दृष्टिकोनातून नयी तालीमच्या प्रयोगाचे महत्त्व अनिवार्य आहे, हे श्री. अ. वि. जोशी यांनी श्रोत्यांना पटवून दिले.

उद्घाटनाच्या कार्यक्रमात, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले व गोमंतकातील शिक्षण संशोधन व विकास केंद्राचे माजी संचालक श्री. कालिदास मराठे यांना परिषदेतर्फे सन्माननीय सदस्यत्त्व बहाल करण्यात आले.

याच कार्यक्रमात प्रा. रमेश पानसे यांचे नयी तालीम वरील इंग्रजी पुस्तक व अन्य काही पुस्तके यांचेही प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या दिवशी दुपारच्या सत्रात, परिषदेचे सर्व सदस्य, ग्राममंगल संस्थेने भरविलेल्या रचनावादी शिक्षण या प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्यात सहभागी झाले. या सदस्यांना हे प्रदर्शन अनुभवण्याचा एक अपूर्व योग या निमित्ताने आला.

सायंकाळच्या सत्रात 'मान्यवरांचे बालपण' अनुभवता आले. श्री. दाजीकाका गाडगीळ, श्रीमती.सुलभा देशपांडे, व श्री. रमेश पानसे यांचे बालपण उलगडण्याचे व त्यांना भरभरून बोलायला लावण्याचे कसब दाखविले ते त्यांची मुलाखत घेताना, श्री. सुधीर गाडगीळ यांनी. मोठी माणसे लहानपणापासून घडली कशी याचा मनोरंजक इतिहास या मुलाखतींतून व्यक्त झाला. विलक्षण आठवणींनी आणि विचक्षण अशा मुलाखतकाराच्या प्रश्न-उपप्रश्नांनी हा कार्यक्रम दोन तासांपेक्षाही अधिक वेळ रंगला नि श्रोत्यांना खूप काही देऊनही गेला.

दुसऱ्या दिवशीच्या दोन्ही सत्रांत मिळून चार विषयांवर तज्ज्ञांनी मांडणी केली. पहिल्या सत्रात श्रीमती वर्षा कुलकर्णी यांनी 'रचनावादी शिक्षण व गुणवत्ता' यावर आपले सखोल विवेचन केले. विविध उदाहरणांनी नटलेल्या या त्यांच्या व्याख्यानाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतरच्या 'विशेष मुलांच्या शिक्षणातील गुणवत्ता' या विषयावरील आपल्या मांडणीत, श्रीमती वर्षा भगत यांनी आपले सडेतोड विचार मांडले त्यामुळे श्रोत्यांना विचारमग्न व्हावे लागले.

दुपारच्या सत्रामध्ये डॉ. रमेश जोशी यांनी 'विज्ञान विषयातील गुणवत्ता' या विषयावर आपले विचार मांडले. त्यानंतर 'गणित विषयातील गुणवत्ता' या विषयावर श्री. नागेश मोने यांनी आपले विचार मांडले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द विज्ञान शिक्षणतज्ज्ञ डॉ. हेमचंद्र प्रधान हे होते. त्यांच्या अध्यक्षीय विवेचनाने, डॉ. जोशी यांच्या विश्लेषणाचे महत्त्व अधोरेखित केले.

सायंकाळचे सत्र होते ते 'पालक-शिक्षकांच्या विविध प्रश्नांना तज्ज्ञांनी उत्तरे देण्याचे.' या कार्यक्रमात, डॉ. अस्मिता हुद्दार (विशेष मुलांचे तज्ज्ञ), डॉ. अवंती दामले (आरोग्य व आहार), श्रीमती. अनघा अडोनी (मानसशास्त्रतज्ज्ञ) व प्रा. रमेश पानसे (शिक्षणतज्ज्ञ) यांनी पालकांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. प्रश्न अनंत पण वेळ मात्र मर्यादित अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे, मिळालेल्या उत्तरांबाबत समाधान पण, राहिलेल्या प्रश्नांबाबत असमाधान घेऊन श्रोते गेले. या

सत्राचे सूत्रसंचालन श्री. पंकज मीठभाकरे (गंपूदादा) यांनी केले.

सायंकाळचा कार्यक्रम होता तो, डॉ. शमा भाटे यांच्या 'पीड पराई जाने रे ......' या विषयावरील बॅले नृत्याचा. विलक्षण तन्मयतेने सादर केलेला आणि तेवढ्याच तन्मयतेने रसिकांनी अनुभवलेला. हा कार्यक्रम प्रामुख्याने 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळा'ने आयोजित केला होता.

शेवटच्या दिवशी म्हणजे बुधवार दि. २१ नोव्हेंबरला, परिषदेची सर्वसाधारण सभा, खुले अधिवेशन आणि अधिवेशनाचा समारोप असे कार्यक्रम होते. समारोपाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांनी स्वीकारले होते. आपल्या भाषणात त्यांनी बालशिक्षणाचे दुर्लक्षित क्षेत्र आणि अशा क्षेत्रात जाणीवपूर्वक काम करणारी, महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेसारखी संस्था यांचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व विशद केले. श्री. रमेश पानसे यांच्या भाषणाने या अधिवेशनाचा समारोप झाला. श्री. रमेश पानसे यांनी अधिवेशन आयोजकांना धन्यवाद दिले. व त्याचवेळी परिषदेच्या कार्यविस्ताराबाबत आपल्या कल्पना मांडल्या.

**संपादक**

## शहाणपणाच्या गोष्टी

### गोष्ट १ : प्रदर्शन

गावात मोठ्या पाट्या लागल्या होत्या. खाद्य पदार्थांचे प्रदर्शन भरले. केवढी तरी गर्दी झाली. सारे पदार्थ संपून गेले. पुन्हा खूप पाट्या लागल्या. कपड्यांचे भव्य प्रदर्शन भरले. केवढी तरी गर्दी झाली. सगळे कपडे विकले गेले. मग, खूप पाट्या लागल्या. घरगुती वस्तूंचे अति भव्य प्रदर्शन भरले. सगळ्याच वस्तू खपून गेल्या. एका संस्थेने खूप पाट्या लावून शिक्षणविचारांचे प्रदर्शन भरविले. तिकडे फारसे कुणी फिरकलेच नाही.

**'शिकलेल्यांना शिक्षणाची गरजच काय?' शहाणपण म्हणाले!**

### गोष्ट २ : सरकार

सरकार म्हणते, आम्हीच शाळा चालवू, आम्हीच पुस्तके छापू
सरकार म्हणते, आम्ही, फक्त आम्हीच शिक्षकांना शिकवू
सरकार म्हणते, आम्ही कायदे करू, किंवा कायदे मोडू
सरकार म्हणते, आम्ही, फक्त आम्हीच मूल्यमापन करू

**'बरे आहे, मुलांना काहीच म्हणता येत नाही!' शहाणपण म्हणाले.**

**सदा शहाणे**

# महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे पुणे येथील एकोणिसावे अधिवेशन...

## उद्घाटक डॉ. अ. गो. भाळवणकर यांच्या भाषणातील काही विचार

▶▶

एकविसाव्या शतकामध्ये 'गुणवत्ता' या संकल्पनेस सर्वच क्षेत्रांमध्ये महत्त्व प्राप्त झालेले आहे. यास शिक्षणक्षेत्र देखील अपवाद नाही. १०० वर्षांपूर्वी कोणालाही वस्तू किंवा सेवांच्या बाबतीत मर्यादित पर्याय उपलब्ध होते. त्याचप्रमाणे व्यक्तिंच्या गरजा, अपेक्षा इ. मर्यादित असल्याने 'गुणवत्ता' या संकल्पनेस महत्त्व दिले गेले नाही. परंतु गेल्या ४-५ दशकांपासून सर्वच क्षेत्रांमध्ये गुणवत्तेचा विचार गांभीर्याने सुरू झाला. त्यामानाने शिक्षणामध्ये गुणवत्तेचा विचार उशीराने सुरू झाला. गुणवत्ता ही संकल्पना अशी आहे, की ती दुरून 'भावते' पण त्याची व्याख्या करणे अतिशय अवघड आहे. एखाद्या वस्तूची गुणवत्ता निश्चित करणे त्यामानाने सोपे असते, परंतु कोणत्याही सेवेची गुणवत्ता निश्चित करणे अशक्य नसले तरी अवघड असते. त्याचे प्रमुख कारण सेवेची गुणवत्ता ही उपभोक्त्याच्या समाधानावर अवलंबून असते. शिक्षणाच्या संदर्भात गुणवत्ता निश्चित करण्यासाठी विद्यार्थी/पालक यांच्या समाधानास अधिक महत्त्व प्राप्त झाले होते. गेल्या काही वर्षांमध्ये पालक/विद्यार्थी यांच्या शाळेकडून अपेक्षा वाढत चाललेल्या आहेत. त्यामुळे गुणवत्तेची संकल्पना स्थिर राहू शकत नाही; पण याचा अर्थ असा नाही की, शिक्षणामध्ये गुणवत्तेचा विचारच करू नये. वस्तुतः अशा बदलत्या परिस्थितीत तिची भूमिका अधिकच महत्त्वाची आहे. पालक, विद्यार्थी, शिक्षक इ. घटकांना गुणवत्तेच्या संदर्भात अर्थ, विविध कृती, मापन साधने इ. बाबतीत उद्बोधन करणे आवश्यक ठरते. त्याचप्रमाणे पालक/




विद्यार्थी यांना या प्रक्रियेत सहभागी करून घेणे अधिक फायदेशीर ठरते. गुणवत्तापूर्ण शिक्षण या संकल्पनेचा विचार कसा करावा, हा या लेखाचा प्रमुख उद्देश आहे. शिक्षणाची गुणवत्ता ही बऱ्याच प्रमाणात शिक्षकाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. गुणवत्तापूर्ण शिक्षण या संकल्पनेचा विचार गणिती दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. त्याशिवाय या संकल्पनेची मांडणी वस्तुनिष्ठपणे करणे अशक्य आहे.

**गुणवत्तेची गृहितके :**

कोणत्याही प्रणालीच्या यशस्वितेसाठी काही गृहितके आवश्यक असतात. ही गृहितके सत्य आहेत असे गृहित धरूनच प्रणालीची मांडणी केलेली असते. ही गृहितके अंतर्गत एकसूत्रतेने बांधलेली असतात आणि कोणत्याही दोन गृहितकांमध्ये विरोध नसतो. अशा गृहितकांच्या आधारे संपूर्ण प्रणालीची मांडणी करणे आवश्यक असते. तरच अशी प्रणाली व्यवहार्य होऊ शकते. गुणवत्ता ही अष्टपैलू आहे अशी लेखकाची धारणा आहे. प्रत्येक पैलू गृहितकाच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**गृहितक १ :** गुणवत्ता ही आंतरिक घटना आहे.

प्रणालीच्या प्रत्येक घटकांमध्ये गुणवत्तेचे अस्तित्व मनात असल्याशिवाय प्रणालीमध्ये गुणवत्ता आणणे अशक्य असते. प्रणालीच्या गुणवत्तेवर बाह्य घटकांचा परिणाम होतो. परंतु तिचे अस्तित्व अंतर्मनामध्ये असल्याशिवाय ती साध्य करता येत नाही. याशिवाय, गुणवत्ता ही अव्याख्यात आणि क्लिष्ट अशी संकल्पना आहे. शिक्षणाच्या संदर्भात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, व्यवस्थापक, पालक आणि विद्यार्थी या सर्वांच्या अंतर्मनामध्ये गुणवत्तेचे अस्तित्व असले पाहिजे. यासाठी सर्व घटकांचे उद्बोधन करणे आवश्यक आहे.

१. एक सुंदर भित्तिपत्रक आहे, ज्यामध्ये दोन पक्षी उडताना दाखविले आहेत व त्याखाली एक वाक्य लिहिले आहे 'They fly because they thank they can.' या वाक्यातून कोणालाही कृतीसाठी विचारांची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे गुणवत्तेचा विचार मनामध्ये असल्याशिवाय शैक्षणिक संस्थेमध्ये गुणवत्ता आणणे अशक्य आहे.

गृहितक २ : गुणवत्तेच्या संदर्भात क्रांती शक्य नसते, पण ती उत्क्रांत होते.

कदाचित वस्तूंच्या बाबतीत गुणवत्तेच्या संदर्भात क्रांती शक्य असते, पण शिक्षणामध्ये क्रांती शक्य नाही. ती नेहमीच उत्क्रांत होते. शिक्षणाची गुणवत्ता ही ८०-८५% मानवी घटकांवर अवलंबून असते. अध्यापन स्तरांवर गुणवत्ता आणण्यासाठी कमीत कमी ३ वर्षे तर संस्थेच्या संदर्भात कमीत कमी ५ वर्षे

**शिक्षणाची गुणवत्ता ही बऱ्याच प्रमाणात शिक्षकाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. गुणवत्तापूर्ण शिक्षण या संकल्पनेचा विचार गणिती दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. त्याशिवाय या संकल्पनेची मांडणी वस्तुनिष्ठपणे करणे अशक्य आहे.**

लागतात. कमी कालावधीमध्ये गुणवत्तेची विशिष्ट पातळी साध्य करणे अवघड असते.

२. एका शाळेमध्ये घडलेली ही घटना आहे. शास्त्रविषयाच्या शिक्षकाची नुकतीच नेमणूक झाली होती. व त्यांनी ८ वीच्या विद्यार्थ्यांना शास्त्र विषय शिकविण्यास सुरुवात केली. त्या शिक्षकाची ठाम धारणा अशी होती की, शास्त्र विषय प्रयोगाद्वारे शिकविला पाहिजे. पण त्यांच्या असे लक्षात आले की, त्या विद्यार्थ्यांना पूर्वी शास्त्र पुस्तक वाचून शिकविले जात होते. त्यामुळे विद्यार्थी समरस होऊ शकत नव्हते. म्हणून त्या शिक्षकाने मुख्याध्यापकांना विनंती केली की मला वर्ग सलग ३ वर्षे शिकविण्यासाठी द्यावा. सुदैवाने मुख्याध्यापकांनी शिक्षकाची विनंती मान्य केली. सलग ३ वर्षे शिकविल्यानंतर विद्यार्थी स्वतंत्रपणे प्रयोग करून निष्कर्ष मिळवू शकले. गुणवत्तापूर्ण अध्यापनासाठी सलगता आवश्यक आहे.

**गृहितक ३ :** गुणवत्तेची प्रक्रिया सर्व क्षेत्रांमध्ये सारखीच असते.

गुणवत्तेच्या संकल्पनेचा विकास सर्वप्रथम उत्पादन क्षेत्रांमध्ये केला गेला. त्यांना त्यांच्या वस्तू बाजारात विकावयाच्या होत्या. त्यामुळे त्यासाठी त्यांनी यंत्र-निर्मिती, कामगार प्रशिक्षण, गुणवत्ता नियंत्रण, गुणवत्तेची खात्री, प्रक्रियांवर नियंत्रण इ. गोष्टींचा साकल्याने अभ्यास करून उपपत्ती मांडल्या. गेल्या काही दशकांमध्ये शिक्षण-संस्था देखील व्यावसायिक स्तरांवर चालू झाल्या. म्हणून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा गांभीर्याने विचार सुरू झाला. दोन्ही क्षेत्रांनी मानवी घटकांचे महत्व मान्य केले आहे.

३. व्यावसायिक जगताने देखील मानवी घटकांचे महत्त्व फार पूर्वीच मान्य केले आहे. त्यामुळे त्यांनी मानवी-संसाधन विकास विभागाची निर्मिती केली. त्याद्वारे कर्मचाऱ्यांची निवड व विकास यावर अधिक भर दिलेला आहे. असा विभाग प्रत्येक शैक्षणिक संस्थामध्ये निर्माण केल्याशिवाय गुणवत्ता साधणे आणि टिकविणे अशक्य आहे.

**गृहितक ४ :** गुणवत्तेचा सर्वसमावेशक आणि साकल्याने विचार करून त्याद्वारे सांघिक प्रयत्नांची आवश्यकता असते.

संपूर्ण गुणवत्ता साध्य करण्यासाठी सर्व घटकांचा साकल्याने विचार करावा लागतो. अंतिम ध्येय निश्चित करून त्यासाठी लागणारी साधन-सामग्री, प्रशिक्षित मनुष्यबळ, सुव्याख्यात सुस्पष्ट प्रक्रिया, त्यावर नियंत्रण इ. गोष्टींचे नियोजन आणि अंमलबजावणीची आवश्यकता असते. गुणवत्ता केवळ सांघिक प्रयत्नाने साध्य करता येते.

**गृहितक ५ :** प्रत्येक क्षेत्रामध्ये गुणवत्तेचे मापन बऱ्याच प्रमाणात शक्य झालेले आहे.

४. शिक्षणातील गुणवत्ता मापनासाठी साधनांची निर्मिती NAAC या संस्थेने उच्चशिक्षणाची गुणवत्ता अजमवण्यासाठी केली आहे. तर माध्यमिक शाळांसाठी ----- Cennai 7 India या संस्थेने पदवी विकसित केली आहे. या साधनांचा उपयोग शैक्षणिक संस्थांनी केला पाहिजे.

सुरूवातीच्या काळात गुणवत्तेचा विचार व्यावसायिक जगतात झाला. त्यावेळी या संकल्पनेस विरोध झाला. परंतु विविध क्षेत्रांमधील तज्ज्ञांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि व्यवसाय प्रमुखांमुळे ही संकल्पना फक्त मान्य झाली असे नाही; तर तिचा शीघ्र गतीने विकास झाला. त्यामानाने शिक्षण क्षेत्रामध्ये तेवढ्या प्रमाणात विचार झालेला नाही, ही खेदाची बाब आहे. मात्र शिक्षणामधील गुणवत्ता मापनासाठी मापन साधने आणि तंत्रे विकसित झालेली आहेत. परंतु सर्व



संस्थांमध्ये या गोष्टी पोहोचलेल्या नाहीत हे सत्य आहे.

**गृहितक ६ :** गुणवत्ता ही क्षणार्धात भावते.

कोणत्याही क्षेत्रामधील वस्तू अथवा सेवा यांची गुणवत्ता एका क्षणात आणि सम्यकपणे जाणवते. त्यानंतर इतर समाविष्ट घटकांचा विचार सुरू होतो. याचा अनुभव आपणास शैक्षणिक संस्थेच्या बाबतीत देखील येतो.

५. एखादे गुलाबाचे फूल पाहिल्यास त्याची सुंदरता आपणांस क्षणार्धात भावते व त्यानंतर आपण रंग, पाकळ्यांची संस्था, आकार इत्यादी गोष्टींचा विचार सुरू करतो. असाच अनुभव शैक्षणिक संस्थेच्या बाबतीत देखील येतो, असा लेखकाचा अनुभव आहे.

**गृहितक ७ :** गुणवत्ता साधण्यासाठी व्यवस्थापनाचे योगदान व्यक्तिपेक्षा, साधन सामग्रीपेक्षा अधिक महत्त्वाचे असते.

तज्ज्ञांनी गुणवत्तेची श्रेणीबध्दता अथक प्रयत्नाने विकसित केलेली आहे. त्यामध्ये पर्यवेक्षण, गुणवत्ता नियंत्रण, गुणवत्तेची खात्री/हमी, आणि संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन यांचा समावेश होतो. शिक्षणक्षेत्राचा विचार केला असता, या क्षेत्रामध्ये व्यवस्थापन कमकुवत आहे तसेच व्यावसायिक जगताच्या तुलनेत अध्यापन आणि अध्यापक व्यवस्थापन याचा फारसा विचार झालेला नाही. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शैक्षणिक संस्थांचा अभाव प्रकर्षाने जाणवतो.

६. गुणवत्ता ही बऱ्याच प्रमाणात वरून खाली या दिशेने झिरपत असते. व्यवस्थापनाच्या मनात गुणवत्ता असल्याशिवाय व्यवस्थापन योग्य ती परिस्थिती संस्थेमध्ये निर्माण करू शकणार नाहीत. अशी अनेक उदाहरणे आपल्या आजूबाजूला पाहण्यात आली असतील.

**गृहितक ८** : गुणवत्ता मंद गतीने (गोगलगायीच्या चालीने) साध्य होते, तर जलदगतीने (जेट विमानाच्या गतीने) ऱ्हास पावते.

सुरूवातीला नमूद केल्याप्रमाणे गुणवत्ता ही क्लिष्ट आणि सांघिक प्रक्रिया आहे. त्यामध्ये सातत्य, प्रेरणा (दोन्हीही), वातावरण निर्मिती, निःस्वार्थ प्रशासन इ. गोष्टींची अत्यंत आवश्यकता असते. या सर्व गोष्टी संस्थेमध्ये आणण्यासाठी बराच कालावधी लागतो. परंतु यांपैकी एक किंवा अधिक गोष्टींचा प्रभाव कमी झाला, की गुणवत्ता ढासळण्यास सुरूवात होते. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कमीत कमी ५ वर्षे तरी सातत्याने प्रयत्न करावे लागतात. गुणवत्ता ऱ्हासासाठी एक वर्षाचा कालावधी देखील पुरेसा आहे.

गुणवत्तेची ही आठ गृहितके एकाकी राहू शकत नाहीत. त्यांच्यामध्ये आंतरक्रिया होऊन वेगवेगळी प्रमेये तयार होऊ शकतात. व्यवस्थापनामध्ये यांची (आठही गृहितकांची) जाणीव प्रथम होणे आवश्यक आहे व सर्व घटकांच्या एकत्रित प्रभावामुळे कोणत्याही संस्थेमध्ये गुणवत्ता साधणे शक्य होते.

गुणवत्ता साधण्यासाठी शैक्षणिक संस्थेच्या बाबतीत

**शिक्षणामधील गुणवत्ता मापनासाठी मापन साधने आणि तंत्रे विकसित झालेली आहेत. परंतु सर्व संस्थांमध्ये या गोष्टी पोहोचलेल्या नाहीत हे सत्य आहे.**

विचार कसा केला पाहिजे, याचे वर्णन संक्षेपाने केले आहे.

**गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी वैचारिक पध्दती**

व्यवस्थापन क्षेत्रांमध्ये गुणवत्ता साधण्यासाठी प्रणाली-विचारांचे उपयोजन केले गेले व त्याधारे साधने, तंत्रे इ. विकसित केली गेली. प्रणाली विचारामध्ये आदान (Inputs) प्रक्रिया -

**आदान :** प्राचार्य, शिक्षक, शिक्षक : विद्यार्थी गुणोत्तर, वर्गखोली, प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रीडांगण, दृक्-श्राव्य साधने, संगणक प्रयोगशाळा, व्हाईटबोर्ड, Smart clasaroom इत्यादी.

**प्रक्रिया :** अध्यापनाचे दिवस, अध्यापनाचे तास, अध्यापन पध्दती, पाठनियोजन, अध्यापन निरीक्षण, पर्यवेक्षण, प्रत्याभरण इत्यादी

**प्रदान :** निकालाची टक्केवारी, विद्यार्थ्यांमध्ये झालेला लक्षणीय बदल, स्पर्धांमधील यश, विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, पालक-विद्यार्थी समाधान इत्यादी.

या सर्व घटकांची निवड शास्त्रशुध्द पध्दतीने करणे आवश्यक आहे. हे तिन्हीही घटक गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक आहेत.

**आदान :**

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी इ. निवड कशी केली जाते, हे अतिशय महत्वाचे आहे. सर्वसाधारणपणे शिक्षकाची निवड पदवी प्रमाणपत्रे, १५-२० मिनिटांची मुलाखत आणि क्वचित पाठनिरीक्षण याद्वारे केली जाते. जी व्यक्ती पुढील २५-३० वर्षे संस्थेमध्ये काम करणार आहे, तिची निवड अशी करणे योग्य नाही. ज्या गुणवत्तापूर्ण संस्था आहेत, त्या शिक्षकांच्या निवडीवर विशेष लक्ष केंद्रित करतात. शिक्षक वैशिष्ट्ये, अध्यापन परिणामकारकता, अध्यापन तत्त्वज्ञान, अध्यापनशैली, सर्जनशीलता इत्यादी घटकांचा विचार करून शिक्षकांची निवड करतात. Teacher Profile तयार करून निवड केली पाहिजे.

बहुतेक शाळांमध्ये प्राचार्य/मुख्याध्यापक यांची निवड सेवा ज्येष्ठतेनुसार केली जाते. हा निकष आवश्यक असला तरी तो पुरेसा नाही. या निकषांबरोबर व्यक्तिमत्व कसोटी, नेतृत्वशैली, आंतरव्यक्तिसंबंध, इ. चा साकल्याने विचार करून निवड केली पाहिजे.

७. एका विद्यापीठात घडलेले उदाहरण आहे. त्या व्यवस्थापनास कुलगुरुची निवड करावयाची होती. व्यवस्थापनाने सर्व उमेदवारांना व्यक्तिमत्त्व कसोटी, नेतृत्त्वशैली कसोटी इत्यादी कसोटचा प्रत्यक्ष आंतरक्रियेपूर्वी पाठविल्या होत्या. शोध समितीपुढे मुलाखत घेताना कसोट्यांच्या संदर्भात अनेक प्रश्न विचारले होते. त्यापैकी एकाच प्रश्नाचा उल्लेख करतो.

**समिती सदस्य** : नेतृत्त्वशैलीच्या कसोटी आधारे तुम्ही लोकाभिमुख नेते आहात आणि आम्हांस 'Task Oriented' असणारा नेता हवा आहे. तर याबाबतीत आपले मत कोणते आहे?

**उमेदवार** : व्यावसायिक जगतात 'Task Oriented' असणे स्वाभाविक आहे. कारण त्या जगतात आदान, प्रक्रिया आणि प्रदान या सर्वांच्या सुस्पष्ट व्याख्या, प्रक्रिया असतात, त्यामुळे कर्मचाऱ्यांकडून ठरावीक कालावधीत ठरावीक काम करून घेता येते. पण शैक्षणिक संस्थांच्या बाबतीत या तीन्हीही गोष्टी ....... नसल्याने शैक्षणिक नेत्यास लोकाभिमुखी असणे आवश्यक आहे. याद्वारे प्राचार्य, मुख्याध्यापक, कर्मचाऱ्यांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करू शकेल व त्याद्वारे कार्य पूर्ण करून घेऊ शकेल.

अशाप्रकारे उमेदवार कसा विचार करतो हे जाणून घेता येते व त्या उमेदवाराची निवड करणे त्यामानाने

अधिक सोपे होते.

२) **प्रक्रिया** : Process

गुणवत्तेच्या संदर्भात प्रक्रियेची भूमिका सर्वात जास्त महत्त्वाची आहे. शिक्षक म्हणून माझे काम मी अशाप्रकारे करीन, की मला फलाची चिंता करण्याचे कारण नाही. निश्चितपणे मिळेलच! उत्तम गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी खाली दिलेल्या काही बाबींचा उपयोग करणे आवश्यक आहे. वर्षभरामध्ये कमीत कमी १८० दिवस अध्यापन होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक विषयाचे निश्चित केलेले तासदेखील पूर्ण होणे आवश्यक आहे. आजकाल काही शाळांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून या निकषांचे काटेकोर पालन केले जाते. अध्यापन प्रक्रिया शिक्षक केंद्री/विषयकेंद्री न राहता विद्यार्थी केंद्री होणे आवश्यक आहे. यासाठी व्यवस्थापनाकडून अध्यापनाचे पर्यवेक्षण, निरीक्षण, आणि प्रत्याभरण होणे अपेक्षित आहे. या गोष्टींचा उपयोग शिक्षकांची बढती/मूल्यमापन यासाठी न करता त्यांच्या अध्यापनाचा दर्जा वाढविण्यासाठी केला पाहिजे. अध्यापन-अध्ययन प्रक्रियेसंदर्भात विषयवार चर्चा घडवून आणल्या पाहिजेत. उत्कृष्ट अध्यापनाचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करून जतन केले पाहिजे व याचा उपयोग वेगवेगळ्या परिस्थितीत करावा. अध्यापन सुधारले, तरच शिक्षण सुधारेल हे तत्त्व तंतोतंत उपयोगात आणले पाहिजे.

शिक्षकांना स्वतःच्या अध्यापनाचे विश्लेषण करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे, यासाठी वर्गपद्धतीचा वापर करण्यास शिकविले पाहिजे.

एखादा विशिष्ट वर्ग शिक्षकाकडे सोपविल्यास तोच वर्ग सलग २-३ वर्षे सतत दिल्यास शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये योग्य ते बदल घडवून आणू शकतो. असा बदल घडवून आणण्यासाठी २-३ वर्षांचा कालावधी लागतो.

एका वर्गास शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांनी महिन्यातून एकदा तरी अध्यापनाच्या संदर्भात चर्चा केली पाहिजे. Peer Coaching उपयोग करावा.

परिणामकारक अध्यापन ही अतिशय क्लिष्ट प्रक्रिया आहे. ती संकल्पना 'किरण' या गणिती संकल्पनेशी मिळती जुळती आहे. ज्याप्रमाणे किरण यास आरंभ बिंदू आहे; पण अन्त्य बिंदू नाही, त्याप्रमाणे परिणामकारक अध्यापनास आरंभबिंदू आहे; पण अन्त्य बिंदू नाही. त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता राखण्यासाठी शिक्षकांनी अध्यापन गुणवत्तेची पातळी सातत्याने उच्च पातळीवर राखली पाहिजे. अजूनही 'प्रक्रिया परिवर्तकांचा' उपयोग शिक्षणाची गुणवत्ता निश्चित करण्यासाठी केला जात नाही.

८. आपणा सर्वांनाच माहित असलेले 'कर्मव्ये.....' विधान शैक्षणिक संस्थेस अतिशय महत्त्वाचे आहे. शिक्षकांनी शिकविण्याचे काम अशा प्रकारे करावे की, त्याला विद्यार्थ्यांना किती गुण मिळतील त्याची चिंता करण्याचे कारण नाही. अध्यापनाचा दर्जा इतका वाढविला पाहिजे की, विद्यार्थ्यांना उत्तम गुण मिळतीलच. लेखकाने गेल्या ४७ वर्षांत कधीही परीक्षेच्या प्रश्नपत्रिका न पाहता शिकविण्याचे काम केलेले आहे. तरीदेखील विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळालेले आहेत. फिनलँड हा देश शैक्षणिक गुणवत्तेच्या बाबतीत क्रमांक एकवर आहे. त्यांनी त्यांची शैक्षणिक गुणवत्ता गेल्या ४० वर्षांत विकसित केली आहे. विद्यार्थी शिक्षणास ७ व्या वर्षी सुरुवात करत. व १६ व्या वर्षापर्यंत कोणतीही परीक्षा देत नाहीत. म्हणूनच त्यांनी गुणवत्ता साध्य केली आहे.

**३) प्रदान** : सर्वसाधारणपणे शिक्षणाची गुणवत्ता मापनासाठी या घटकाचाच प्रामुख्याने उपयोग केला जातो. त्यातल्या त्यात शालेय स्तरावर एस. एस. सी/ एच. एस. सी. च्या निकालासाठी टक्केवारीचाच उपयोग केला जातो. अनेक निकषांपैकी हा एक निकष आहे, याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे. याशिवाय अन्य निकषांचा कसा उपयोग करता येईल हे संक्षेपाने दिले आहे.

केवळ १००% निकालावर अवलंबून न राहता प्रभुत्व-अध्ययन पातळीचा उपयोग केला पाहिजे. त्यामध्ये ८०X८०, ९०X९०, १००X१०० इ. पातळ्यांचा उपयोग केला जातो. सुरूवातीस निम्न

पातळी निश्चित करून अध्यापनाचा दर्जा वाढवून उच्च पातळीकडे जाता येईल.

बऱ्याच शाळांमध्ये ६०% गुणांच्यावर गुण असतील तरच प्रवेश दिला जातो.  व १०० % निकाल लागला हे अभिमानाने सांगतात. त्याऐवजी प्रवेश घेतानाचे गुण व बाहेर पडतानाचे गुण यांमधील फरक जर संख्याशास्त्रीयदृष्ट्या लक्षणीय असेल तर ती शाळा अधिक गुणवत्तापूर्ण आहे.

शिक्षणाचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांची विचार प्रक्रिया विकसित करणे असा आहे. जी शाळा यामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणेल ती अधिक गुणवत्तापूर्ण.

विविध क्षेत्रांमधील प्राविण्यांचादेखील गुणवत्ता निश्चित करण्यासाठी उपयोग केला पाहिजे. क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम, उपयोजित कला, विविध स्पर्धा परीक्षांमधील यश इ. विचार करणे आवश्यक आहे. ह्या गोष्टींचा विचार करताना किती टक्के विद्यार्थ्यांनी अशा विविध क्षेत्रांमध्ये प्रावीण्य मिळवले, हे पाहणे आवश्यक आहे. केवळ ज्ञान किती मिळविले यावर भर देण्याऐवजी, ज्ञान मिळविण्याच्या किती पद्धती आत्मसात केल्या याचाही विचार करावा.

अध्ययनाचे मूल्यांकन आणि अध्ययनासाठी मूल्यांकन या दोन्ही पद्धती एकमेकांशी पूरक आहेत. जी संस्था दोन्ही पद्धतींचा उपयोग करते ती संस्था अधिक गुणवत्तापूर्ण.

गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबत अनेक गोष्टींचा उल्लेख करता येईल; पण वेळेअभावी या सर्व गोष्टींचा उल्लेख केला नाही. यांपैकी काही बाबींचे मापन सहजसाध्य आहे; तर काही बाबींचे अवघड आहे. प्रत्येक संस्थेने स्वतःची मूल्यांकन प्रणाली विकसित केली पाहिजे.

९. आपणास विद्यार्थी कसा हवा आहे हे प्रथम निश्चित केले पाहिजे व त्याप्रमाणे प्रक्रिया आणि आदान यांचा विचार केला पाहिजे. यामध्ये सतत आंतरक्रिया होणे अभिप्रेत आहे. त्यानंतर अध्यापनाचा दर्जा सतत उंचावत नेऊन अपेक्षित उद्दिष्टे साध्य करता येतील.

समारोप : गुणवत्तापूर्ण शिक्षण ही अतिशय क्लिष्ट अशी प्रक्रिया आहे. अनेक परिवर्तकांचा गुणवत्तेवर परिणाम होत असतो. त्याचप्रमाणे दोन किंवा अधिक परिवर्तकांच्या आंतरक्रियेमुळे ही संकल्पना अधिकच क्लिष्ट होते.

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सर्व घटकांनी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी योग्य ती परिस्थिती व्यवस्थापनाने निर्माण केली पाहिजे. व्यवस्थापन जर कमकुवत असेल तर गुणवत्तापूर्ण शिक्षण ही अशक्यप्राय गोष्ट आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नेहमी अधिक निधी लागतो असे नाही. अध्यापनाच्या दर्जावर गुणवत्तापूर्ण शिक्षण बऱ्याच प्रमाणात अवलंबून असते. त्यासाठी सांघिक प्रयत्नांची नितांत आवश्यकता असते.



वर्षा उदयन कुलकर्णी

# बालशिक्षणातील रचनावाद

▶▶

'रचनावादी शिक्षण' हा विषय जेव्हा बालशिक्षण परिषदेच्या अधिवेशनामध्ये येतो, तेव्हा रचनात्मक पद्धतीने बालशिक्षण कसे व्हायला हवे, यावर विचार होणे अपेक्षित आहे.

बालशिक्षण म्हणजे शून्य ते सहा वयोगटातील मुलांचे शिक्षण. हे खरेतर संगोपनाचे वय आहे. परंतु हे संगोपन अधिक शास्त्रीय झाले की, त्याला या वयातील शिक्षण म्हणता येईल.

'बालशिक्षणातील रचनावाद' यामध्ये दोन संकल्पनांचा विचार आहे. एक, बालशिक्षण आणि दुसरे, रचनावादी शिक्षण.

बालकाच्या विश्वाचा विचार केला असता आपल्या असे लक्षात येईल की, जन्मल्यापासून वयाच्या तीन साडेतीन वर्षांपर्यंतचा बालकाचा वावर कुटुंबामध्ये आणि अगदी थोडा काळ समाजामध्ये असतो. यानंतर शाळा या औपचारिक घटकाशी संबंध येतो. म्हणजे बालवयातील शिक्षणावर कुटुंब, शाळा, आणि समाज या व्यवस्थांचा प्रभाव पडतो. हे तीनही घटक स्वतंत्र, परस्परावलंबी आहेत. कुटुंब, शाळा, समाज या ठिकाणी जे जे 'घडते' त्याचा मुलावर परिणाम होत असतो. हे जे 'घडणे' आहे; त्यासंबंधीचा विचार रचनावादी बालशिक्षण करते. समाजात काय घडावे यावर आपले नियंत्रण नसले; तरी कुटुंब आणि शाळा या ठिकाणी काय आणि कसे घडावे यावर नियंत्रण ठेवता येणे संबंधितांना शक्य आहे.




या तीन्ही ठिकाणी दोन प्रकारे शिक्षण घडते, एक सहज शिक्षण आणि दुसरे हेतुपूर्वक आखणी करून होणारे. मात्र त्यांचे प्रमाण प्रत्येक ठिकाणी भिन्न आहे. उदा. घरात सहज शिक्षणाचे प्रमाण हेतुपूर्वक आखणी करून होणाऱ्या शिक्षणापेक्षा अधिक आहे. शाळेत हे प्रमाण विरुद्ध आहे. हेतुपूर्वक अनुभवांची मांडणी करून होणारे शिक्षण हे सहज शिक्षण कसे होईल, यासाठी रचनावादी शिक्षणपद्धती मार्गदर्शन करते. ही शिक्षणाची शास्त्रीय पद्धती व्हावी यासाठी शिक्षणतज्ज्ञांनी, मानसशास्त्रज्ज्ञांनी, तत्वज्ञांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. रुसो, जॉन ड्युई, जीन पियाजे, मॉन्टेसरी ही त्यांतील काही महत्त्वाची नावे.

भारतीय आणि पाश्चात्य तत्त्वज्ञांनी मानवी जीवनाविषयी सखोल चिंतन करून संपूर्ण जीवनाचे ध्येय निश्चित केले. उपजत क्षमतांचा विकास, व्यक्तिच्या ठायी असणाऱ्या सुप्त गुणांचा विकास, आत्माविष्कार या जीवनविषयक ध्येयांबाबत बहुतेक सर्वांचे एकमत होते. या ध्येयाप्रत जाण्यासाठी अभ्यासक्रम, नंतर त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अध्ययन, अध्यापनपद्धती अस्तित्वात आल्या. या अध्यापनपद्धतींमध्ये कालानुरुप बदल होत आले आहेत. हे सर्वच बदल शिक्षणप्रक्रिया समृद्ध करणारे ठरले असे नाही. काही बदल काही प्रमाणात त्यांतील त्रुटींसह स्वीकारले गेले. त्यापैकीच एक म्हणजे वर्तनवादी पद्धती. वर्तनवादी पद्धतीमध्ये काही दोष होते, त्यामुळे शिक्षणात मुलाला शिक्षणाचा आनंद तर घेता येत नव्हताच; पण जे साध्य करायचे त्यापासूनचे अंतर कमी होण्याऐवजी वाढतच चालले होते. प्रत्येक मुलाची आंतरिक उर्मी वेगळी, कल वेगळा असे असताना सर्वांना सरसकट एकाच पद्धतीतून जावे लागत होते. अजूनही जावे लागते आहे.

वर उल्लेख केलेल्या शिक्षणतज्ज्ञांना यातील विसंगती जाणवली. पारंपरिक शिक्षणामध्ये मुलाचा विकास किती होतो आहे हे माहीत नाही; पण, त्याला त्रासदायक अशा अनेक गोष्टी घडत आहेत. उदा. वर्गात बोलायचे नाही, हालचाल करायची नाही. कारण वर्गात मुलांनी बोलणे, खेळणे इत्यादी गोष्टी शिक्षकांच्या अध्यापन कार्यात अडथळा आणतात. शिक्षणाची, पर्यायाने शाळांची, वर्गाची रचना शिक्षकांच्या सोयीने होऊ लागली. रुसो, ड्युई यांनी मुलांच्या बाजूने विचार करण्यास सुरुवात केली. मुलांच्या बाजूने विचार हाच खरे तर रचनावादाचा उगम, पाया आणि धागा आहे.

निरीक्षण, प्रयोग यांतून असे लक्षात आले की, मुलामध्ये शिकण्याची उपजत प्रेरणा आहे. कितीही ठरवले तरी मुलाला शिकण्यापासून वंचित ठेवता येणार नाही. मुले सतत प्रश्न विचारत असतात. याचाच अर्थ, त्यांना नवनवीन गोष्टी ज्ञात करून घ्यायच्या असतात. प्रत्येक विद्यार्थी स्वत:च्या ज्ञानाची स्वत: निर्मिती करतो, हे रचनावादी शिक्षणपद्धतीचे गृहीतक आहे.

अनेक तत्त्वज्ञ, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ यांच्या

**कुटुंब, शाळा, समाज या ठिकाणी जे जे 'घडते' त्याचा मुलावर परिणाम होत असतो. हे जे 'घडणे' आहे; त्यासंबंधीचा विचार रचनावादी बालशिक्षण करते. समाजात काय घडावे यावर आपले नियंत्रण नसले; तरी कुटुंब आणि शाळा या ठिकाणी काय आणि कसे घडावे यावर नियंत्रण ठेवता येणे संबंधितांना शक्य आहे.**

अभ्यासातून, योगदानातून वरील काही ठळक गोष्टी समोर आल्या आहेत. रचनावादी पद्धतीने शिक्षणाची आखणी करताना वरील सर्व गोष्टींची शिक्षक, पालकांनी दखल घेणे आवश्यक आहे.

**शिक्षण : तत्त्वज्ञान**

जॉन ड्युई, रुसो यांच्या तात्विक सिद्धांताचा रचनावादावर प्रभाव आहे. मूल स्वत:च्या अनुभवातूनच उत्तम शिकू शकते. यासाठी मूल योग्य त्या अनुभवास सन्मुख होणे आवश्यक आहे. शारीरिक कृतींचे अनुभव आवश्यक आहेत; पण शिकण्यासाठी पुरेसे नाहीत. आंतरिक स्वातंत्र्य आणि स्वयंनियंत्रण या गोष्टी शिक्षणातूनच साध्य करायच्या आहेत, यासाठी बाह्य स्वातंत्र्य पूरक असायला हवे.

**शिक्षण : आकलनशास्त्र**

आत्तापर्यंत विद्यार्थ्यांचे मूल्यमापन त्याच्या बाह्य कृतींवरून केले जात असे. शिकणे ही मानसप्रक्रिया आहे. त्यामुळे मानसिक पातळीवर जे घडते त्याचा विचार आकलनशास्त्रामध्ये केला जाऊ लागला. जीन पियाजे यांनी या मानसप्रक्रियांचा सखोल अभ्यास करून मांडणी केली आहे.

**शिक्षण : सामाजिक अभ्यासक्रम**

विद्यार्थी ज्या समाजात राहतो, ज्या संस्कृतीमध्ये मोठा होतो त्याचा परिणाम त्याच्या घडणीवर, विचारप्रक्रियेवर होत असतो. वास्तव जीवनातल्या अनुभवातून शिकणे, त्याचा वापर करून वास्तव जीवनाला सामोरे जाणे, यासाठी अभ्यासक्रमही वास्तव जीवनाशी सुसंगत हवा.

**शिक्षण :** अध्यापन पद्धती, मेंदू संशोधन, शिक्षक. वरील तीन गोष्टी परस्परांशी घनिष्टपणे जोडलेल्या आहेत, म्हणून त्यांचा एकत्रित विचार करता येईल.

रचनावादी अध्यापन पद्धतींना मेंदू संशोधनाचा आधार आहे. शिक्षकाची भूमिका काय असावी, याबाबतही मेंदू संशोधनाने दिशा दिली आहे. कारण अध्यापन पद्धतींचा अवलंब शिक्षक करणार आहेत.

विद्यार्थी स्वत:ची स्वत: ज्ञाननिर्मिती करतो हा धागा घेऊन पुढे जाऊ.

मेंदू संशोधनाने याला पूरक आणि बाधक गोष्टी सांगितल्या आहेत. त्यावर आधारित ठळक मार्गदर्शक तत्त्वे पुढीलप्रमाणे,:

**भावनिक सुरक्षितता :**

घरातील किंवा शाळेतील वातावरण हे मुलांच्या भावनांचे रक्षण करणारे असायला हवे. शिस्त, शिक्षा, स्पर्धा यांमुळे शिक्षण होतच नाही; पण भीती, ताण मात्र निर्माण होतात. भावना या बौद्धिक कार्यात द्वारपालाचे काम करीत असतात. भावनिकदृष्ट्या स्थिर असतानाच बौद्धिक कार्य पूर्ण क्षमतेने होऊ शकते.

**टप्प्याटप्प्याने होणारा बौद्धिक विकास:**

पियाजेच्या म्हणण्यानुसार, बालकाची शारीरिक, बौद्धिक, भावनिक वाढ ही विशिष्ट वयाशी संबंधित असते. एका अवस्थेतील तयारी पूर्ण झाल्याशिवाय ती पुढच्या अवस्थेत जाऊ शकत नाहीत. मधली एखादी अवस्था गाळून कुणी पुढे जाऊ शकणार नाही.

**कृतिशीलता :**

मानवाची पाच ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यांद्वारा तो भोवतालच्या वातावरणाला प्रतिसाद देत असतो, अनुभव घेत असतो. केवळ शिक्षकांनी सांगितलेले ऐकणे, हा परिपूर्ण अनुभव असू शकत नाही, कारण यातून श्रवण ही एकच कृती घडते. अनुभव घेत

असताना मुलाने शक्य तितके कृतिशील राहावे, म्हणजेच कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये यांची अधिकाधिक गुंतवणूक होते. मिळालेले ज्ञान दिर्घकालीन स्मृतीत जाण्यास साहाय्य होते. अनुभवातही नाविन्य असले पाहिजे, त्याच त्याच अनुभवांचा मुलाला कंटाळा येऊ शकतो.

वरील गोष्टींची दखल घेऊन घर आणि शाळा यांचे रूपांतर रचनावादी घर आणि रचनावादी शाळा यांमध्ये व्हायला हवे.

मुलांच्या कोवळ्या वयातील भावनांवर आघात होईल, असे वातावरण घर वा शाळा या ठिकाणी असता कामा नये.

मुले वातावरणातून ज्ञान शोषून घेत असतात. यासाठी घर व शाळा या दोन्ही ठिकाणी रचनावादी वातावरण असायला हवे.

कृतीला वाव देणारे उपक्रम असायला हवेत. जेणेकरून मुले क्रियाशील बनतील.

इतरांनी सांगितलेल्या शब्दांवर अवलंबून न राहता स्वत:च्या शब्दातून स्वत:च्या ज्ञानाची रचना करतील.

रचनावादी बालशिक्षण हे खरे तर रचनावादी संगोपनच आहे. या संगोपनामुळे शिक्षक किंवा पालक या नात्याने आपण बालकाच्या समृद्ध आणि प्रगल्भ भविष्यकाळाची पायाभरणी करू.

चांगला पालक हा चांगला माणूस असतो. बायकोशी वाईट वागणारा माणूस मुलांशी चांगलं वागेल हे शक्य नाही. नवऱ्याला ताप देणारी बाई मुलांवर प्रेम करेल हे शक्य नाही. ऑफिसमध्ये बेजबाबदारपणे काम करणारा माणूस मुलं जबाबदारीनं वाढवेल हे शक्य नाही. पालकत्व ही एक वृत्ती आहे. ती संवाद साधण्याची कला आहे. खऱ्या अर्थानं समृद्ध जीवन जगण्याची कला आहे.

ह्या अर्थानं आपण कुणीच सहजपणे उत्तम पालक नसतो. उत्तम पालक होऊ शकत नाही.

प्रयत्न करणं मात्र आपल्या हातात असतं. आजवर आपण मुलांना घडवतो असं आपण म्हटलं, पण मुलंही आपल्याला घडवत असतात, हे लक्षात घेतलं पाहिजे. मुलांच्या निमित्तानं स्वतःला घडवत राहिलं पाहिजे. पालक शिक्षणात याचं फार महत्त्व आहे.

**आपली मुलं : शोभा भागवत**

शैला चिटणीस

# अहवाल एकोणिसाव्या अधिवेशनाचा

▶▶

सोमवार दिनांक १९ नोव्हेंबर २०१२ रोजी सकाळी १० वाजता महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून बालशिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने पुण्यातील 'गणेश कला क्रीडा केंद्र' स्वारगेट येथे जमले. ह्या सर्वांचे श्रीम. सुप्रियाताई अत्रे यांनी स्वागत केले. प्रथम कै. बाळासाहेब ठाकरे आणि कै. सुमनताई भिडे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. नंतर सुप्रियाताईंनी महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे हे १९ वे अधिवेशन पुणे येथे, महाराष्ट्र बालशिक्षण परिषद, पुणे शाखा, महाराष्ट्र ज्ञान मंडळ (M.K.C.L.) आणि ग्राममंगल यांच्या विद्यमानाने संपन्न होत आहे, हे स्पष्ट केले. सर्व बालप्रेमींचे स्वागत एका सुंदर गोम गीताने करण्यात आले. 'ॐ कार रुप देवा आणि लावियेला दीप' ह्या गीताने गोम विणला गेला आणि तितक्याच कौशल्याने तो सोडविला गेला. अतिशय सुंदर सादरीकरणाने, सर्वांच्या उत्स्फूर्त टाळ्यांनी परिषदेची सुरुवात झाली.

यानंतर ऐना येथील बालवाडी शिक्षकांनी 'आम्ही ध्येयवेड्या तुम्हाला दिसू' हे ध्येयगीत सादर केले.

यानंतर महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या पुणे शाखेच्या श्रीम. वैजयंतीताई देवळालकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि परिषदेच्या उपसचिव श्रीम. अदिती नातू यांनी आपल्या गोड भाषेत प्रास्तविक केले. त्यांनी यावेळी परिषदेची उद्दिष्टे-हेतू स्पष्ट केले. संशोधन केंद्र, विकासगट करत असलेली कामे सांगितली. अनुभवातून तयार झालेल्या विकासात्मक कार्यक्रम पुस्तिकेचाही



त्यांनी उल्लेख केला. शिक्षक प्रशिक्षण या विषयीही नातूताईंनी आपले विचार मांडले. M.K.C.L. च्या माध्यमातून 'तंत्रज्ञान' तळागाळातील शिक्षकांपर्यंत पोहोचवायचे आहे, असे सांगून त्यांनी आपले प्रास्ताविक पूर्ण केले.

यानंतर पुणे शाखेच्या सचिव श्रीम. सुरेखा पेंडसे यांनी पुणे शाखेच्या कामगिरीचा आढावा सादर केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.श्री. राम ताकवले यांच्या शुभहस्ते '२१ वे शतक व आपले बालशिक्षण', 'प्रकल्प पद्धती' इ. पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

परिषदेचे अध्यक्ष श्री. अ. वि. जोशी यांनी 'नयी तालीम' चे दोन वर्षांतील कामाचे इंग्रजीत भाषांतर केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन, समारंभाचे उदघाटक पाहुणे डॉ. अ.गो. भाळवणकर यांच्या हस्ते करण्यात आले. श्री. भाळवणकरांनी त्याची प्रत प्रा. पानसेसरांना द्यावी, अशी विनंती अध्यक्ष श्री. अ. वि. जोशी यांनी केल्याप्रमाणे ती प्रत पानसेसरांना, पाहुण्यांना दिली.

यानंतर सोहाळा संपन्न झाला तो मानपत्र प्रदानाचा! याचे पहिले मानकरी होते गोव्याचे माजी शिक्षण संचालक मान. श्री. कालिदास मराठे. त्यांच्या मानपत्राचे वाचन श्रीम. अदिती नातू यांनी केले. परिषदेचे अध्यक्ष श्री. अ. वि. जोशी यांच्या हस्ते त्यांना मानपत्र प्रदान केले गेले. व सन्माननीय सदस्यत्व बहाल करण्यात आले.

यानंतर थोर शिक्षणतज्ञ डॉ. राम ताकवले सर यांच्या ८०व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा, मानपत्र व सन्माननीय सदस्यत्व बहाल करण्यात आले. श्री कालिदास मराठे व डॉ.राम ताकवले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. '२१ व्या शतकातील शिक्षक कसा असेल!' ह्या संबंधी काढलेल्या पुस्तकाबद्दल परिषदेचे त्यांनी आभार मानले.

यानंतर अधिवेशनाचे उदघाटक डॉ. अ . गो. भाळवणकर (कुलगुरु कॅलोरेक्स टीचर्स युनिवर्सिटी, अहमदाबाद) यांनी त्यांच्या अभ्यासपूर्ण शैलीत 'गुणवत्तापूर्ण शिक्षण' यावर एक अष्टसूत्री मांडली. शिक्षणाची गुणवत्ता ही बऱ्याच अंशी शिक्षकांवरच अवलंबून असते, असे त्यांनी ठामपणे मांडले. शिक्षकाचे शिकविणे फार महत्त्वाचे आहे. कसेही शिकवून चालणार नाही. विद्यार्थ्यांशी जवळीक साधणारा शिक्षक हवा. अध्ययन प्रक्रिया विद्यार्थी केंद्रीत व्हायला हवी. विद्यार्थ्यांच्या विकासात विचारप्रक्रियेला महत्त्व द्यायला हवे, हे त्यांनी आवर्जून सांगितले. शेवटी 'शिक्षक हा समर्थ बनला पाहिजे तरच शिक्षण गुणवत्तायुक्त होईल' असे सांगितले. हा विचार समस्त बालशिक्षण प्रेमींनी टाळ्यांच्या प्रतिसादात स्वीकारला.

यानंतर परिषदेचे अध्यक्ष श्री. अ. वि. जोशी

**विद्यार्थ्यांशी जवळीक साधणारा शिक्षक हवा. अध्ययन प्रक्रिया विद्यार्थी केंद्रीत व्हायला हवी. विद्यार्थ्यांच्या विकासात विचारप्रक्रियेला महत्त्व द्यायला हवे**

यांच्या हस्ते डॉ. भाळवणकरांचा सत्कार करण्यात आला. तर परिषदेचे सचिव श्री. अनिल जोशी यांनी श्री. अ.वि. जोशी यांचा सत्कार केला.

शेवटी अध्यक्ष श्री. अ. वि. जोशी यांचे उत्कट मनोगत सर्वांनाच भावले. पुण्यनगरीत जमलेल्या सर्व गुरुजनांचे, पालकांचे त्यांनी मनापासून स्वागत केले. त्यांच्या भाषणातील 'बचपन बचाव' हा विचार बरेच काही सांगून गेला. प्राथमिक शिक्षणामध्ये काही चांगल्या गोष्टी घडत आहेत. उदा. मेंदूशास्त्राचा विचार, रचनावादी शिक्षण, मानसशास्त्राचा विचार होत आहे, त्यांसंबंधी त्यांनी समाधान व्यक्त केले. 'नयी तालीम' ही जगाला दिलेली देणगी आहे, हे सांगून, यातील तीन 'H' म्हणजे Head, hand and heart या तिन्हींचा विकास म्हणजे बालकाचा विकास हे स्पष्ट केले. नवसमाजाच्या निर्मितीसाठी बौद्धिकश्रम व शारीरिक श्रम यांची गरज आहे. 'कृती व काम करत करत शिकणे' हा गांधीजींचा विचार त्यांनी मांडला. वर्ध्यातील 'नयी तालीम' शाळेतील काही किस्सेही त्यांनी सांगीतले.

यांनंतर, छोट्या-मोठ्या ५ पुस्तकांचा प्रकाशन सोहळा करण्यात आला. तदनंतर श्री. अनिल जोशी यांनी सर्व पाहुण्यांचे आभार मानले व परिषदेचे पहिल्या दिवसाचे प्रथम सत्र संपले.

प्रथम दिवसाचे द्वितीय सत्र दुपारी ४ वाजता ग्राममंगलच्या भव्य प्रदर्शनाने गाजले. यासाठी सन्मा. श्री. सुलभाताई देशपांडे, सुधीर गाडगीळ, आणि सतिश राजवाडे हे मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते 'ग्राममंगल साहित्य' प्रदर्शनाचे उदघाटन झाले. यावेळी अनेक शिक्षक पालकांप्रमाणेच लर्निंग होमचे विद्यार्थीही उपस्थित होते. या विद्यार्थ्यांनी पाहुण्यांना विज्ञानाचे प्रयोग करून दाखवले. आपल्या स्टॉलवर असलेल्या विषयाबद्दल, साहित्याबद्दल माहिती दिली. पाहुण्यांना मुलांचे खूपच कौतुक वाटले. त्यांनी या विद्यार्थ्यांना अनेक प्रश्न विचारले.त्या सर्व प्रश्नांची त्यांनी समर्पक उत्तरे दिली. हा रचनावादी शिक्षणाचा परिणाम सर्वांनाच पाहावयास मिळाला.

संध्याकाळच्या सत्रात ९८ वर्षांचे दाजीकाका गाडगीळ, श्रीम. सुलभाताई देशपांडे आणि प्रा. पानसेसर या सर्वांना त्यांच्या बालपणातील गमती सांगण्यासाठी बोलतं केलं ते सुधीर गाडगीळ यांनी! आपल्या नेहमीच्या खुमासदार शैलीत त्यांनी त्यांना मोजकेच प्रश्न विचारले, त्याला अत्यंत हसत खेळत या मंडळींनी उत्तरे दिली. दाजीकाकांची उत्तम स्मरणशक्ती, उत्तम खणखणीत आवाज, या वयातही उत्तम ऐकू येणे, याबद्दल सुधीर गाडगीळ यांनी प्रेक्षकांना टाळ्या वाजवून दाद देण्यास सांगितले. लहानपणी एकदा शिक्षकांकडून कंबरड्यात जोरात लाथ बसली; त्यामुळे आजतागायत कंबर दुखली नाही हा किस्सा हशा पिकवून गेला.

सुलभाताईंना त्यांचे बालपण कुठे व कसे गेले? हा प्रश्न विचारला असता, त्याला उत्तर देताना सुलभाताई म्हणाल्या, आपले लहानपण दादरच्या घरीच गेलं. घर खूप मोठं होतं, घरात ३५ माणसे होती. खूप मजा यायची. वडेल वसंत कामेरकर यांनी आशाताईंचं पहिलं गाणं रेकॉर्ड केलं, ते जवळून ऐकावयास मिळालं. घरी नाटकाच्या तालमी व्हायच्या त्यामुळे अभिनयही खूप जवळून पाहिला. त्यामुळे अभिनयाचे बाळकडू आपोआप मिळत गेलं. मी म्युनिसिपल शाळेत शिकत होते. हेही त्यांनी अभिमानाने सांगितले.

हाच प्रश्न जेव्हा पानसेसरांना विचारण्यात आला तेव्हा त्यांनी ठाण्यात पूर्वी घरे कमी पण जंगल जास्त. ह्या जंगलात आपण कसे हिंडत होतो. मोकळ्या वातावरणाचा कसा फायदा झाला ! शाळेत असताना

मास्तर नात्यातले असल्यामुळे मास्तरांच्या मुलांना व त्यांना पपई खायला मिळे, ही गंमत त्यांनी सांगितली. मैदानी खेळ मल्लखांब इत्यादी खेळत असल्यामुळे आनंद मिळे. मनाला आनंदाची सवय लागली. आपली आई आजही या वयात सतत वाचत असते. वाचन हे अभ्यासासाठी नसून आनंदासाठी असलं पाहिजे, असे पानसेसरांनी सांगितले.

अशा अनेक गंमती जंमतीतून दाजीकाकांच्या खणखणीत आवाजानं, सुलभाताईंच्या बालपणीच्या आठवणींतून, पानसेसरांच्या पुढील कार्याचं बीज जिथे पेरलं गेलं त्या व्यायामशाळेच्या किश्यांनी ही मुलाखत संपली.

मंगळवार, दिनांक २० नोव्हेंबर २०१२, अधिवेशनाचा दुसरा दिवस. हा दिवस बौद्धिक खाद्याचा ठेवाच ठरला!

सकाळी ९ वाजता वर्षाताई कुलकर्णी यांनी आपल्या 'रचनावादी शिक्षण' या निबंधवाचनास सुरुवात केली. रचनावादातील कृतिशीलतेचे महत्त्व विशद करून, कृतिशीलतेची खोली जितकी वाढेल; तितकी विकासाची पातळी अधिक, हे अनेक उदाहरणांनी पटवून दिले. आठवड्यातील एक दिवस टी.व्ही. बंद दिवस पाळून मुलांबरोबर फिरायला जाणे, गप्पा मारणे, खेळ खेळणे, इतर कलांचा आस्वाद मुलांबरोबर घेणे, ही कल्पना सर्वांनाच आवडली. रचनावादी शिक्षणात पंचज्ञानेंद्रियांचा विकास महत्त्वाचा असून, कृतीत जितकी अधिक ज्ञानेंद्रिये काम करतील; तितका विकासाचा परिणाम दूरगामी हे पटवून दिलं. आपल्या निबंध वाचनात त्यांनी स्लाईड्सचा वापरही केला. मेंदूतील पेशींची रचना, भावनिक मेंदूचे कार्य, तणावपूर्ण वातावरणात विकासाची घसरण, ह्या सर्व गोष्टींचे विश्लेषण वर्षाताईंनी अत्यंत बारकाईने, सोप्या शब्दांत केले. आपल्या संपूर्ण निबंध वाचनात त्यांनी कुठेही म्हटलं नाही की, मुलांना शिकवायचं आहे. त्या म्हणत होत्या; मुले शिकणार आहेत. आपण फक्त त्यांच्या भावनांचे रक्षण करणारे वातावरण निर्माण करायचे आहे. जे जे करू त्यात मुलांच्या दृष्टीने विचार करूनच करू. असे सांगून, शेवटी मुलांचे रचनावादी संगोपन करूया. असे म्हणून या संगोपनामुळे शिक्षक व पालक या नात्याने आपण बालकाच्या समृद्ध आणि प्रगल्भ भविष्यकाळाची पायाभरणी करू शकू, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

यानंतर 'विशेष मुलांच्या शिक्षणातील वाढ' ह्या विषयाच्या निबंधाचे वाचन e.t.c. अपंग शिक्षण व प्रशिक्षण केंद्र नवी मुंबईच्या डारेक्टर श्रीम. वर्षा भगत यांनी केले. विशेष मुलांमध्ये, शारीरिक व्यंगत्व, बौद्धिक क्षमतेची कमतरता, मतीमंद, गतीमंद इ. प्रकारावर आणि Learning Disability याबाबत त्यांनी विचार मांडले. Regular Schools नी आपली भूमिका बदलायला हवी. या मुलांना warm welcome त्यांनी करायला हवं, हा विचार त्यांनी अत्यंत कळकळीने सर्वांसमोर मांडला. त्यात त्यांची या मुलांबाबत असलेली तळमळ जाणवत होती. विशेष शाळांमध्ये स्पर्धा खूप असते; पण हे चुकीचे आहे. मुलांच्या समस्या कमी झाल्या पाहिजेत. या मुलांच्या व्यवसाय शिक्षणासाठी इतर संस्थांशी tie-up करायला हवा. अनुभव संपन्नतेला त्यांनी खूप प्राधान्य दिले. त्या म्हणाल्या की, एकच गोष्ट २५ वर्षे करण्यापेक्षा नवीन नवीन गोष्टी ५ वर्षे केल्या, तर तो 'अनुभव' असू शकतो. या क्षेत्रात, जेवढ्या आकाशात चांदण्या आहेत, तेवढ्या या मुलांच्या समस्या आहेत. यासाठी खूप Resourses उपलब्ध व्हायला हवे आहेत. ह्या मुलांच्या पालकांचे counselling होणे जरूरीचे आहे. ते फार दु:खी असतात. ह्या मुलांसाठी कशी मदत करावी? काय काय करावे? हे जोपर्यंत पालकांना कळत नाही; तोपर्यंत या मुलांच्यात प्रगती नाही. म्हणून पालकांचे प्रशिक्षण होणे जरूरीचे आहे, असे सांगून उपस्थितांना त्या म्हणाल्या, तुम्ही सर्वजण Agent आणि Angel आहात, तुम्ही त्यांना हात दिला तर सर्व चांगले होईल. संस्था Bench mark झाली पाहिजे. यासाठी विविध योजना राबविल्या पाहिजेत. अपंग विद्यार्थी जोपर्यंत स्वत:च्या पायावर उभा राहत नाही, तोपर्यंत त्याचा Follow up घेतला पाहिजे. हे त्यांचे विचार ऐकून मन कळवळून आले. शेवटी Let_s

change to see the change हे त्यांचे वाक्य सर्वांच्याच मनावर कायमचं कोरलं गेलं असेल यात शंका नाही. पानसेसरांनी त्यांचा 'तत्त्वज्ञ' म्हणून उल्लेख केला. खरंच त्या तत्त्वज्ञ म्हणून साऱ्यांनाच दिसल्या.

दोन्ही वर्षाताईंचे विचार प्रत्येक शिक्षक, पालकांनी आचरणात आणल्यास देश बदलण्यासाठी २०२० ची वाट पहावी लागणार नाही, हेही तितकच खरं !

यानंतर दुपारच्या सत्रात ३ वाजता 'विज्ञान विषयातील गुणवत्ता' यावर आपले विचार स्पष्ट केले ते मुक्तांगण सायन्स एक्सप्लोरेटरीचे डॉ. रमेश जोशी यांनी. सध्या मुलांच्या हातात गुलाबाचे काटे आहेत, गुलाब नाहीत. हे घडतयं म्हणजे विषयाचे सौंदर्य मुलांपर्यंत पोहोचत नाही, न समजलेल्या ज्ञानाचे प्रचंड ओझे मुलांवर आहे. 'घोका व ओका' असे शिक्षण पुढे येत आहे. हे थोपवलं पाहिजे, असे परखड विचार सद्य शिक्षणाबाबत जोशी सरांनी मांडले. अनुभवसंपन्न ज्ञान मुलांना मिळाले पाहिजे, यावर त्यांनी भर दिला. यासाठी काही विज्ञानातील घटकांची उदाहरणे त्यांनी स्पष्ट करून सांगितली. मुलांना चॅलेंज स्वीकारायला शिकवा. कृतिशील शिक्षण महत्त्वाचे. ह्या त्यांच्या विचारांवर वर्षाताईंच्या रचनावादाच्या उद्दिष्टांचे स्मरण झाले. विद्यार्थ्यांना असे शिक्षण देण्यासाठी मुक्तांगण विज्ञान शोधिकाची मदत घेता येईल असेही त्यांनी नमूद केले.

यानंतर व्याख्यान गाजले ते 'गणित विषयातील गुणवत्ता' स्पष्ट करणारे श्री. नागेश मोने सरांचे. वास्तविक गणितासारखा विषय त्यात काय गमती-जमती असणार. पण; नेमके हेच त्यांनी स्पष्ट करून सांगितले. गणित गुणवत्तेचा पाया विषयाच्या गोडीत आहे, हे त्यांनी काही उदाहरणांनी पटवून दिले. ज्यांची भाषा चांगली त्यांचे गणितही चांगले. कारण गणिताची भाषा कळलीच नाही, तर पुढे जाताच येणार नाही, हे त्यांचे म्हणणे म्हणजे सगळ्यांच्या मनातलेच विचार होते. पाढ्यांची एक मजेशीर गंमत त्यांनी मांडली. उदा. दोन विषम संख्यांची बेरीज. म्हणजे १+३=४, ३+५=८, ५+७=१२ याप्रमाणे ४ चा पाढा तयार होतो. हे मुलांनाच करू द्यावे. यानंतर धन व ऋण संख्यांची समज अगदी वेगळ्या विचारात त्यांनी मांडली. मुलांना विचार करण्याची संधी द्या.

मुलांचा कंटाळा, भीती, ताण कमी करा इ. गोष्टी त्यांनी अत्यंत खूबीने, गमतीने, हसत खेळत मांडल्या. जवळ जवळ सर्व भूमिती कागदांच्या घडीतून कशी शिकविता येईल, याचे प्रात्यक्षिकही त्यांनी करून दाखविले. मुलांची गणितातील गोडी वाढली की, गुणवत्ता वाढीला लागेल, हे सत्य त्यांनी अगदी सहज उलगडून दाखवले.

संध्याकाळचे सत्र ठीक ६ वाजता सुरु झाले. या सत्रात पालकांच्या, शिक्षकांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याचा कार्यक्रम झाला. यात आहारतज्ज्ञ श्रीम. अवंती दामले, मानसोपचारतज्ज्ञ श्रीम. अनघा अडोनी, विशेष विद्यार्थीतज्ज्ञ डॉ. अस्मिता हुद्दार आणि शिक्षणतज्ज्ञ प्रा. रमेश पानसे यांचा सहभाग होता.

**आहारतज्ज्ञ श्रीम. अवंती दामले यांना पालकांनी नेहमी भेडसावणारे प्रश्न विचारले**

उदा.
- मुले नीट जेवत नाहीत, काय करावे?
- वेगवेगळ्या पद्धतीने जेवण केले तरी मुलांना आवडत नाही? परत कुकींग क्लासला जाण्याची गरज आहे का?
- भूक लागल्यावर काय द्यावे?
- Mid-day meal किती गरजेचे आहे?
- मूल एका जागी बसून खात नाही. काय करावे?
- जंकफूड किती प्रमाणात खावे? इ. या सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे त्यांनी दिली. मुलांनी मागणी केली की लगेच ते देऊ नका समतोल आहार व जेवणाच्या वेळा कटाक्षाने पाळण्यास सांगितले.

**मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अनघाताई अडोनी यांनाही पालकांनी पुढील प्रमाणे प्रश्न विचारले**

- मूल एका जागेवर दहा मिनिटेही स्वस्थ बसत नाही.
- मुलांचा टि.व्ही. कसा बंद करावा? हा तर

जगातील समस्त पालकांना पडणारा प्रश्न असावा, असे वाटते. याचे उत्तर देताना अनघाताई म्हणाल्या, तुम्ही वरून रागावला आहात; रागवू नका. मुलांच्या सवयी बदलण्यासाठी पालकांनीच तत्पर राहावे, ही सूचना करावयास अनघाताई विसरल्या नाहीत.

**डॉ. अस्मिता हुद्दार या विशेषतज्ज्ञ म्हणून होत्या त्यांना काही प्रश्न विचारले गेले.**

उदा.

- नॉर्मल मूल व विशेष मूल यात काय फरक आहे?
- विशेष गरजा असणारी मूले जनरली मागे का पडतात?

मुलाचे वय १९ वर्षे तो (स्लोलर्नर)slow-learner आहे. कोणत्या विषयात मागे आहे, हे कोणत्या चाचण्यांनी कळते इ. प्रश्नांना उत्तरे देताना डॉ. अस्मिता म्हणाल्या, भावनिकदृष्ट्या विशेष मूल Disturb असले, तरी अपंगत्वाचे प्रमाणपत्र असले तरच ते मूल विशेष विद्यार्थी असेल. नाहीतर त्याची गरज पूर्ण झाल्यावर तो नॉर्मल होईल. विशेष गरजा असणारी मुले अभ्यासात मागेच पडतात असे नाही. मुलाचे अपंगत्व पाहिले पाहिजे व तसे उपाय केले पाहिजेत. मुलांची भावनिक उपासमार होऊ देऊ नये. आपला वेळ जास्तीत जास्त बालकांच्या सान्निध्यात घालवला, तर शिकण्याची नि शिकवण्याची प्रक्रिया आनंददायी होईल, असे त्या म्हणाल्या.

यातील शैक्षणिक बाजू सांभाळली श्री. पानसेसरांनी, मुलांना इंग्रजीतून शिक्षण द्यावे का? याचे उत्तर देताना पानसेसरांनी पालकांनाच बुचकळयात टाकले. ते म्हणाले, मुलाला इंग्रजी शाळेत टाकण्याचा निर्णय मुलांचा नसतो पालकांचा असतो. पण यात मुलांवर पडणाऱ्या ताणाचा विचार होत नाही. कारण इंग्रजीतून सर्वच संकल्पना स्पष्ट होत नाहीत. इंग्रजी शिकणे ही गरज आहे; पण इंग्रजीतून शिकणे ही गरज नाही असा मार्मिक टोलाही सरांनी लगावला.

एका शिक्षिकेने आपण स्वत: शिक्षिका आहोत. मनात असूनही अनेक शालेय कामांमुळे मुलांचा सर्वांगीण विकास साधता येत नाही, या प्रश्नाला उत्तर देताना पानसे सर म्हणाले, काही अपरिहार्य गोष्टी कराव्या लागतात. पण तुम्ही रचनावादी शिक्षण पद्धतीकडे वळलात तर यात शिकण्यावर भर आहे, शिकविण्यावर नाही; त्यामुळे आपोआपच तुमचे काम कमी होईल. तुम्ही तुमची भुमिका बदलावी. आपणासमोर असणारे अनेक प्रश्न पठडीबाहेर जाऊन सोडवावे लागतात, याचा जरूर विचार करण्यास सरांनी त्या शिक्षिकेस सरांनी सांगितले. या चारही वक्त्यांना आपल्या खुमासदार शैलीत बांधून ठेवले पंकज मीठभाकरे यांनी त्यांना गंपूदादाही म्हणतात. हे त्यांना मुलाखतीपूर्वीच सांगितले होते. म्हणजे गंपूदादा यांनी प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम सुरेख, बहारदार केला. अशा रीतीने, दुसरा म्हणजे बौद्धिक खाद्याची मेजवानीच होती. त्याचा आस्वाद घेत हा दिवस मजेत गेला.

बुधवार, दिनांक २१ नोव्हेंबर, अधिवेशनाचा शेवटचा दिवस, सकाळी ९ वाजता सर्वसाधारण सभेने सुरु झाला. परिषदेचे सचिव श्री. अनिल जोशी यांनी मागील सभेतील वृत्तांत वाचला. धुळे शाखेने गेल्या वर्षी नवीन सभासद संख्या वाढविली, या उल्लेखनीय कामांचे स्वरूप मांडले. उदा. नाशिक शाखेने 'व्यावसायिक नगरी' भरवली होती. औरंगाबादने बालवाडी शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित केले.

यानंतर खुल्या अधिवेशनात अनेकांनी आपली मते मांडली. श्री. मगदूम सरांनी पुन्हा काम सुरु केले. माधुरी राजवाडकर (सिंधुदूर्ग) खेळातून बालकांचे निरीक्षण कौशल्य वाढविणे, यावर काम केले. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सिंधुताईंचा आवाज ऐकला आणि सर्वांना धन्यता वाटली. त्यांच्या गीताला उपस्थित श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

श्री. मकरंद गणेश साठे यांनी हसत खेळत संस्कृत कसे शिकविले जाते, ते सांगितले.

श्रीम. गीता दिवेदी यांनी १९७७ पासून १० मुले गोळा करून बालवाडी कशी सुरु केली, ते सांगितले.

आजही त्या उत्तम बालवाडी चालवत आहेत. त्यांनी महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे सभासदस्यत्व स्वीकारले. सिंहगड रोड, पुणे वरील सानेगुरुजी विद्यालयातील शिक्षिकेनेही आपल्या शाळेत ही बालनगरी भरविली जाते, याबद्दल सांगितले.

शेवटी अ.वि.जोशी यांनी मात्र महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत महाराष्ट्र बालशिक्षण परिषद पोहोचली नाही, याची खंत व्यक्त केली. १८ वर्षे पूर्ण झाली आहेत. चालू वर्ष हे अधिवेशनाचे १९ वे वर्ष आहे. म्हणजे खऱ्या अर्थाने परिषद सज्ञान झाली आहे. तेव्हा समस्त परिषद सदस्यांकडून याचा विचार व्हावा, असे त्यांनी सूचविले.

दुपारी १२ वाजता अधिवेशन समारोप कार्यक्रम




पार पडला. यावेळी समारोप कार्यक्रम अध्यक्ष डॉ. दीपक टिळक यांचे स्वागत करण्यात आले. परिषदेच्या उपसचिव श्रीम. अदिती नातू यांनी प्रास्ताविक केले. त्यात एक वर्षाच्या शिक्षणक्रम पुस्तिकेविषयीही त्यांनी माहिती दिली.

पुणे शाखेच्या सचिव श्रीम. सुरेखा पेंडसे यांना दोन दिवसाच्या कार्यक्रमाचा आढावा घेण्यास श्रीम. अमला भागवतांनी सांगितले. त्यांनी त्याप्रमाणे दोन दिवसांच्या कार्यक्रमांचा आढावा घेतला. समारोप समारंभाचे पाहुणे डॉ.दिपक टिळक यांची ओळख, परिषदेचे सचिव श्री. अनिल जोशी यांनी करून दिली.

यानंतर डॉ. दिपक टिळक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. बालशिक्षणात चालणारे वारकरी आणि शिक्षणप्रेमी यांना त्यांनी बालशिक्षणासारख्या नाजूक विषयाला हात घातल्याबद्दल धन्यवाद दिले. बालशिक्षण म्हणजे शिक्षणाचा पाया, यात रचनात्मक शिक्षण झाले नाही; तर विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान याबाबत त्यांनी आपले विचार स्पष्ट केले. त्या दृष्टीने गावागावातून, वाडयावाड्यातून काम करणाऱ्या परिषदेला त्यांनी धन्यवाद दिले.

शेवटी परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. रमेश पानसे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

M.K.C.L. ने अभय दिले. ग्राममंगलने आपली बौद्धिक, शारीरिक शक्ती दिली. त्यामुळे हे अधिवेशन यशस्वी झाले, असे आपल्या आभार प्रदर्शनात म्हटले. घरात जन्मास येणारे प्रत्येक बालक घराचे सदस्य आहे. आणि त्याला आशा आकांक्षा घडविण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, ही परिषदेची मूलभूत कल्पना त्यांनी मांडली. शास्त्रीय बालशिक्षणाची मागणी निर्माण करणे, हे आव्हान स्विकारले पाहिजे. पुढच्या अधिवेशनापर्यंत आमच्यात काहीतरी बदल होणे अपेक्षित आहे, असे सांगून, युवक युवतींना पुढले जग हे तुमचे आहे. तुमच्या समाजाची घडण करावयाची असेल तर बालशिक्षणाची गुढी उभारली पाहिजे, असे सांगताच टाळ्यांच्या गजरात अधिवेशनाची सांगता झाली.

कालिदास मराठे

# मानपत्र स्वीकारताना...

▶▶

पुणे येथे एकोणीस नोव्हेंबर रोजी सुरू झालेल्या महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या एकोणिसाव्या अधिवेशनात डॉ. राम ताकवले यांसारख्या देशातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ शिक्षणतज्ज्ञाबरोबर, गोमंतकासारख्या छोट्या राज्यातील माझ्यासारख्या छोट्या शिक्षण कार्यकर्त्याला परिषदेचे सन्माननीय सदस्यत्व देऊन जो बहुमान केला, त्याबद्दल आपणा सर्वांबद्दल मी प्रथम कृतज्ञता व्यक्त करतो.

सन २००७ साली गोमंतक बालशिक्षण परिषदेची स्थापना प्रा. रमेश पानसे यांच्या अधिवेशन घेण्याचे धाडस आम्ही केले.

गेली पाच-सहा वर्षे महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या कोल्हापूर, ठाणे, वाई, औरंगाबाद, इचलकरंजी आणि धुळे येथे झालेल्या अधिवेशनासाठी काही प्रतिनिधी गोमंतकातून पाठविण्याचा आम्ही प्रयत्न केला. या अधिवेशनातून प्रेरणा घेऊन परत आलेल्या कार्यकर्त्यांचे अनुभवकथन, असा एक कार्यक्रम परिषदेतर्फे सातत्याने आम्ही केला आणि त्यामुळे परिषदेला गोमंतकातील सगळ्या तालुक्यातून कार्यकर्त मिळाले. त्यांच्या मार्फत शास्त्रीय बालशिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

सर्व शिक्षा अभियानाच्या पालक प्रबोधन कार्यक्रमाची जबाबदारी आमच्या परिषदेला मिळाली. आणि त्यामुळेच गोमंतकातील सर्व तालुक्यातून शास्त्रीय बालशिक्षण आणि मूल शिकतं कसं? हा विचार पालकांपर्यंत पोहचविता आला.

माझ्याबरोबर काम करीत असलेल्या गोमंतकातील कार्यकर्त्यांचा प्रतिनिधी म्हणून हा सन्मान मी नम्रपणे स्वीकारतो.

पुण्यासारख्या शहरात हा सन्मान मिळणे, ही माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे. कारण याच पुण्यात पदवीपर्यंत आणि त्यानंतर शिक्षणातील पदव्यूत्तर पदवीचे शिक्षण मी पूर्ण केले.

गोमंतकातील शिक्षणखात्यात शिक्षक म्हणून सुरुवात करून विविध पदावर काम करण्याची संधी मला मिळाली. आणि त्या निमित्ताने विविध प्रशिक्षण, बैठक यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, गरवारे बालभवन, पालकनीती परिवार, महाराष्ट्र राज्य पालक-शिक्षक संघ, वनराई, ज्ञानप्रबोधिनी आणि या काही वर्षांत ग्राममंगल, महाराष्ट्र बालशिक्षण परिषद सारख्या अनेक संस्थांच्या संचालक, कार्यकर्त्यांबरोबर काम करायला मिळाले. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना अनेक दिग्गजांच्या सभा समारंभाना उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले, तसेच पूर्वी सांगितलेल्या संस्थांच्या दिग्गजांबरोबर चर्चा करण्याची संधी लाभल्यामुळे, माझी वैचारिक बैठक तयार झाली. आणि त्यामुळे शासकीय सेवेत व त्यानंतर गेली काही वर्षे अल्पसे काम मी करू शकलो. सगळ्यांची नांवे घेऊ लागलो तर बराच वेळ पाहिजे. त्यामुळे या संस्थांच्या सर्व दिग्गजांना मी प्रणाम करतो. आजचा सन्मान त्यांच्यामुळे मला मिळाला, असे सांगू इच्छितो.

तसा महाराष्ट्राचा माझा जुना संबंध आहे. माझ्या वडिलांच्या दुःखद निधनामुळे १९४८ मध्ये गोमंतक सोडून माझी आई बेळगावला आली. तेथील लक्ष्मीबाई सोहनी यांच्यामुळे व्हर्नाकुलर फायनलची परीक्षा देऊन, त्यांच्याच सहकार्याने महाराष्ट्रातील-मराठवाड्यातील मुदखेड येथे शिक्षिका म्हणून काम करू लागली. माझ्या आईने आई आणि वडील या दोन्ही भूमिका समर्थपणे निभावल्या. त्यामुळे आम्ही तीन्ही भावंडे पदवीधर होऊ शकलो. त्यामुळे १९५० पासून माझे शिक्षण मुदखेड, नांदेड व पुणे येथे झाले. नांदेडच्या विचार विकास मंदिर वाचनालयाने मला वाचनाची गोडी लावली, आणि विचार करण्याचे बळ दिले. त्यामुळे महाराष्ट्राने माझा पिंड घडवला. आणि आज त्याच महाराष्ट्रातील 'महाराष्ट्र बालशिक्षण परिषद' मला गौरविते आहे. यासारखी भाग्याची गोष्ट जीवनात कोणतीही नसेल.

१ डिसेंबर २००० ला मी राज्य शिक्षण संस्थेचा संचालक म्हणून सेवानिवृत्ती घेतली. त्यास येत्या १ डिसेंबरला एक तप पूर्ण होईल.

या बारा वर्षांच्या काळात, गोमंतकातील, शिक्षक-पालक यांनी मला वेळोवेळी त्यांच्या कार्यक्रमासाठी बोलावून जे प्रेम दिले, त्यामुळे माझे वाचन आणि लेखन यासाठी अनेक विषय मिळाले. शासकीय सेवेत असतानाही शिक्षण विषयक लेखनही करीत होतो. आणि सेवानिवृत्तीनंतर गोमंतक, नवप्रभा, लोकमत, गोवादूत आणि आता दैनिक हेराल्ड यांसारख्या वृत्तपत्रांनी, भारतीय शिक्षण, महाराष्ट्र एज्युकेशन जर्नल सारख्या मासिकांनी मला लिहिते ठेवले. त्याचाच परिणाम म्हणून शासकीय सेवेत असताना पुण्याच्या श्री. अनंत बल्लाळ यांनी सन १९९९ मध्ये 'प्रौढशिक्षण-छे छे युवा शिक्षण' हे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यानंतर २००३ साली 'अशी वाढवू या शैक्षणिक गुणवत्ता' हे पुस्तकही प्रसिद्ध केले. सन २००६ मध्ये 'माझा शिक्षणनामा' हे पुस्तक साखळी, येथील गोव्याच्या संस्थेने; तर कोल्हापूरच्या अभिनंदन प्रकाशनाने, 'शालेय पातळीवर गुणवत्तेचे मानांकन आणि श्रेणीकरण' हे पुस्तक २००८ साली प्रसिद्ध केले. ज्याची दुसरी आवृत्ती एका वर्षात काढावी लागली. कारण महाराष्ट्रातील मुख्याध्यापक संघटनेने या पुस्तकाला उचलून धरले. सेवानिवृत्तीनंतर वाचन संस्कृतीसाठी वाचक सल्लागार समितीच्या माध्यमातून मी काम सुरू केले. आणि २००५ साली माझे मित्र सतीश दळवी यांच्या 'पूर्व प्राथमिक शिक्षण' या कोकणी पुस्तकाच्या प्रकाशन समारंभानिमित्त पूर्व प्राथमिक शिक्षणावर चर्चासत्र घ्यावे व त्यासाठी महाराष्ट्रातील या क्षेत्रातील एखाद्या तज्ज्ञांना आपण बोलवावे, अशी विनंती कोकणी अकादमीचे अध्यक्ष आणि माझे विद्यार्थी पुंडलिक नाईक व सतीश दळवी यांनी केली.

प्रा. रमेश पानसे यांच्याविषयी मी वाचले होते.

प्रत्यक्ष त्यांचा माझा परिचय नव्हता. परंतु त्यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांनी या कार्यक्रमाला यायचे कबूल केले. या निमित्ताने माझा बालशिक्षणाशी संबंध आला. आणि हेच काम सर्वात महत्त्वाचे आहे, हे प्रा. रमेश पानसे यांच्या गोव्यातील मुक्कामात यांच्याशी चर्चा करताना आणि त्यांची तळमळ बघताना मला पटले. अर्थात यापूर्वी आंतरभारतीचे चंद्रकांतभाई शहा यांच्यामुळे १९८३-८४ मध्ये गिजुभाई बधेकांचे 'दिवास्वप्न' माझ्या वाचनात आले होते. आणि ते सर्व शाळांना देण्याचे काम मी केले होते. त्यावर शिक्षक शिबिरात चर्चा केली होती. या पुस्तकाचे परीक्षण 'शिक्षण समीक्षा' मासिकात व आकाशवाणीवर केले होते. त्यानंतर अनुताईंनी १९९२ मध्ये १०० व्याख्याने देण्याचा जो संकल्प केला होता, त्यामध्ये गोव्यात त्यांची दोन व्याख्याने व्हावीत; अशी मी त्यांना विनंती केली होती. त्यांच्या आजारपणामुळे त्या येऊ शकल्या नाहीत. म्हणून त्यांनी कुळगावच्या डॉ. शकुंतला जोशींना पाठविले होते. त्यांनी स्थानिक संस्थांच्या साहाय्याने गोमंतकात पाच ठिकाणी व्याख्याने दिली.

२००५ साली रमेश पानसे यांची भेट झाली. पण प्रत्यक्षात गोमंतक बाल शिक्षण परिषदेची स्थापना एप्रिल २००७ मध्ये केली. त्यानंतर मडगाव येथे डॉ. राजेंद्र हेगडे यांच्या जांबावलीकर स्मृती न्यास या संस्थेच्या मदतीने ग्राममंगलचं 'मूल शिकतं कसं' ही कार्यशाळा आम्ही घेतली. प्राध्यापक रमेश पानसे यांचे याच विषयावर फोंडा, डिचोली, म्हापसा, मडगाव आणि काणकोण येथे व्याख्याने आयोजित केली. ज्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. त्यानंतर गोमंतकातील सर्व तालुक्यांत हे काम पोचवावे, यासाठी तालुका समित्या स्थापन करणे, दरवर्षी महाराष्ट्र शिक्षण परिषदेच्या अधिवेशनाला पालक, शिक्षण प्रतिनिधी पाठविणे, पालक प्रबोधन शिबिरे, बाल आनंद मेळावे आणि एका दिवसाच्या कार्यशाळा आयोजित करणे, यासारखे उपक्रम गेल्या ५ वर्षांत आम्ही केले.

अर्थात शास्त्रीय बालशिक्षणाचा प्रचार आणि प्रसार हे तसे कठीण काम आहे. पालकांचे प्रबोधन करूनच हा विचार त्यांच्यापर्यंत पोहोचवायला हवा. गोमंतक आणि महाराष्ट्रातच नव्हे; तर हा विचार साऱ्या देशात सर्वत्र पोहोचला पाहिजे असे आम्हाला वाटते कारण येथील बालकेही आपलीच बालके आहेत. त्यादृष्टीने पुढच्या वर्षी आखिल भारतीय शिक्षण परिषद स्थापन करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलावीत, असे आमच्या परिषदेला वाटते. त्यासाठी काम करण्याचे आम्ही ठरविले आहे. माझी पत्नी आता नातवासाठी वेळ द्या, असे म्हणते आहे. खरे तर नातवाच्या सहवासात बालशिक्षणासंबंधी पुस्तकात वाचलेले विचार प्रत्यक्षात बघण्याची संधी यानिमित्ताने लाभते आहे. आणि पालकांशी चर्चा करतानाही त्याचा फायदा होतो आहे.

असो, आपण सन्माननीय सदस्यत्त्व देऊन मला नवी स्फूर्ती आणि प्रेरणा दिली आहे. त्यामुळे या कामासाठी अधिक वेळ आणि शक्ती देण्याची इच्छा व्यक्त करतो. त्यासाठी आपण सर्वांनी मला आशीर्वाद द्यावेत, अशी विनंती करून थांबतो.

**(महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या एकोणिसाव्या अधिवेशनात गोव्यातील बालशिक्षणतज्ज्ञ कालिदास मराठे यांना सन्माननीय सदस्यत्व बहाल करण्यात आले. त्याप्रसंगी त्यांनी व्यक्त केलेले मनोगत.)**

---

लहान बालकांजवळ पूर्वग्रह आणि चाकोरीतील किंवा ठरून गेलेल्या कल्पना नसतात; त्यामुळे, मला वाटते, सत्य-शिव-सुंदराची पेरणी मुलांच्या मनात करणे तुलनेने सोपे असते.

हॉवर्ड गार्डनर

|| विशेष लेख ||

रमेश पानसे

# शास्त्रीय बालशिक्षणाच्या युगाची निर्मिती

▶▶

बालकाचे तीन ते सहा किंवा आठ वर्षांपर्यंतचे वय हे, साधारणपणे, बालशिक्षणाचे वय मानले जाते. बालकातून पुढे निर्माण होणारा प्रौढ कसा असेल हे, या वयात बालकाला मिळणारे वातावरण आणि शिक्षण या दोन घटकांवर अवलंबून असते. अलीकडे या दोन्हींचे नेमके शास्त्र विकसित झाले आहे. या शास्त्राला अनुसरून जर बालकाला वाढण्याचे नि शिकण्याचे वातावरण मिळाले, तर त्याचे अनुकूल परिणाम, त्या बालकाला आणि ते बालक ज्या समाजाचा घटक आहे; त्या समाजाला प्राप्त होतात. परंतु, जर, बालकाला लहान वयात या गोष्टींपासून वंचित राहावे लागले; तर त्याचे विपरीत परिणाम, त्या व्यक्तीला आणि तिच्या समाजालाही भोगावे लागतात. त्यामुळे, बालवयाचा काळ, हा अत्यंत कसोटीचा नि निर्णायक कालावधी असतो, हे आपण सर्वांनी ध्यानात घ्यावयास हवे. कारण, हे ध्यानात घेऊनच, एक सजग समाज म्हणून, आपल्याला कृतिशील व्हायचे आहे.

बालकांचा, आयुष्याच्या सुरूवातीचा काळ, हा त्यांच्या मूलभूत क्षमतांच्या विकासाचा आणि पायाभूत अशा कौशल्य विकासांचा काळ असतो. भाषा, बहुविध बुद्धिमत्ता, आणि विविध शारीरिक कौशल्ये यांच्या प्रगतीचा हा अत्युच्च काळ असतो; वेगाने विकास होण्याचा काळ असतो. एवढेच नव्हे, तर हा काळ नेमका पकडला नाही,म्हणजे तो वाया गेला तर, मानवी जीवनाचा आधार असलेल्या या बाबी अपरिपक्व राहून पुढील आयुष्यात अडथळेच निर्माण करतात. हा काळ आणखी एका गोष्टीसाठी महत्त्वाचा आहे. आजच्या नि उद्याच्या काळात, ज्याचे सार्वत्रिक महत्त्व आहे, अशा भावनिक विकासाचा नि सामाजिक संपर्काच्या

**बालकाचा व्यक्तिगत विकास, बालकाचा सामाजिक विकास, बालकाचा भाषिक विकास या तिन्ही गोष्टी, हातात हात घालून जाव्या लागतात.**

कौशल्य विकासांचाही हा काळ आहे. समाजात योग्य तऱ्हेने मिसळता येणे, दुसऱ्यांशी वेळोवेळी जुळवून घेता येणे, लोकशाहीतील एक नागरिक म्हणून जबाबदारीने वागता येणे आणि जागतिक शांततेच्या स्थापनेसाठी पावले टाकता येणे, या गोष्टींचे बीजारोपण केवळ बालवयातच होऊ शकते. म्हणून बालवयावर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

बालकाने परिसरातील पहिली भाषा आत्मसात करण्याचाही हाच काळ असतो. भाषा आत्मसात करण्याची क्षमता घेऊनच मूल जन्माला येत असते. पुढे, भाषा ऐकण्याच्या व भाषा बोलण्याच्या जेवढ्या जास्त संधी मुलांना मिळतील, तेवढ्या प्रमाणात बालकाचे भाषेचे स्वयंशिक्षण होत जाते. जेवढे जास्त, विविध तऱ्हेचे भाषिक अनुभव मुलांना मिळतील, तेवढी त्यांची स्वभाषा समृध्द होत जाते. ही भाषासमृध्दी घेऊनच, मुले आपले बौद्धिक व सामाजिक जीवन जगणार असतात, हे लक्षात घेतले तर, भाषा शिक्षणाचे वय म्हणूनही बालवयाचे महत्त्व अनिवार्य आहे.

थोडक्यात असे की, बालकाचा व्यक्तिगत विकास, बालकाचा सामाजिक विकास, बालकाचा भाषिक विकास या तिन्ही गोष्टी, हातात हात घालून जाव्या लागतात. दुसऱ्यांशी जुळवून घेण्याची मानसिकता आणि स्वतःच्या भाव-भावनांचे विवेकाने नियंत्रण करता येणे, या दोन क्षमता, लहान वयातच उगम पावतात आणि योग्य भाषिक अनुभवांनी त्या वृद्धिंगतही होतात.

हे सारे बालवयातच घडून येते याचे एकमेव कारण म्हणजे, सहा ते आठ वर्षांपर्यंतचे वय हे मुलांचे मेंदू घडणीचे वय असते. माणसाचा मेंदू जन्मानंतरच प्रामुख्याने कार्यरत होत असतो. मेंदूची ऐंशी टक्के वाढ याच वयात पूर्ण होते; आणि ती कशा दिशेने पूर्णतेला जावी, हे आपल्याला बऱ्याच प्रमाणांत ठरविता येते. याचे कारण असे की, मुलांच्या मेंदूचा विकास हा त्यांना मिळणाऱ्या बाह्य वातावरणावर अवलंबून असतो. लहान वयात मिळणाऱ्या अनुकूल वा प्रतिकूल अनुभवांवर अवलंबून असतो. बालशिक्षणाचे खरे कार्य इथे आहे. मेंदू हा माणसाचा शिकण्याचा अवयव आहे. त्यामुळे त्याला 'शिकते' करणे, त्याला शिकते ठेवणे, त्याच्या शिकण्याच्या क्षमता वाढवत नेणे नि त्याची शिकण्याची कौशल्ये विकसित करणे, या साऱ्या गोष्टींची जबाबदारी बालशिक्षणाला पेलायची असते. म्हणूनच अर्थात, बालशिक्षणाचे स्वतंत्र नि प्रगत असे शास्त्र अभ्यासावे लागते, व त्याला धरूनच बालशिक्षणाचा व्यवहार प्रत्यक्षात करावा लागतो.

आजवर, सगळीकडेच बालशिक्षणावर अत्यंत तुटपुंजा खर्च केला जात आहे कारण, हा खर्च आपण परिव्यय म्हणजे costs मानतो आहोत. परंतु अलीकडच्या, म्हणजे विशेषतः गेल्या दशकभरातल्या संशोधनांतून असे ठळकपणे पुढे आले आहे की, बालशिक्षणावरील खर्च हा परिव्यय (costs) नसून ती राष्ट्र उभारणीसाठी होणारी प्रभावी गुंतवणूक (Investment) आहे. ही, इतर अनेक कल्याणकारी प्रकल्पांपेक्षा कितीतरी अधिक लाभदायक अशी गुंतवणूक आहे.

बालशिक्षणावरील गुंतवणुकीचे हे महत्त्व आपण सर्वांनीच जाणून घेतले पाहिजे. आणि आपला बालशिक्षणावरील खर्चाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्णतः बदलला पाहिजे. थोडीशी विस्ताराने नि जाणतेपणाने ही गोष्ट आपण समजून घेऊ या.

अर्थशास्त्राच्या क्षेत्रात, देश-विकासाच्या दृष्टीने भांडवल-गुंतवणुकीच्या विषयाला अनिवार्य असे महत्त्व आहे. थोडेसे जागतिक इतिहासात डोकावले तर असे दिसून येईल, भांडवल गुंतवणुकीच्या संकल्पनेत

**सहा ते आठ वर्षांपर्यंतचे वय हे मुलांचे मेंदू घडणीचे वय असते. माणसाचा मेंदू जन्मानंतरच प्रामुख्याने कार्यरत होत असतो. मेंदूची ऐंशी टक्के वाढ याच वयात पूर्ण होते; आणि ती कशा दिशेने पूर्णतेला जावी, हे आपल्याला बऱ्याच प्रमाणांत ठरविता येते.**

गेल्या अर्धशतकातच खुपसा बदल झाला आहे. १९६० च्या दशकापर्यंत भौतिक भांडवल हाच मुख्यतः विकासाचा आधार मानला जात होता. १९६० सालापासून हे चित्र पालटून, मानवी भांडवलाची संकल्पना पुढे आली. शिक्षण (त्यातही उच्च व कौशल्यांचे शिक्षण) व आरोग्य यांवर गुंतवणूक करून राष्ट्रातील श्रमशक्तीची गुणवत्ता सुधारता येते, हे लक्षात आले. १९९० नंतर मात्र आरोग्याबरोबरच पायाभूत अशा प्राथमिक शिक्षणावर भर देणे, मानवी भांडवलाची प्रत सुधारण्याच्या दृष्टीने, अत्यावश्यक मानले जाऊ लागले. आज मी तुमच्यापुढे विषय मांडतोय तो असा की, पायाभूत शिक्षणाची संकल्पना विस्तारून त्यामध्ये बालशिक्षण व प्राथमिक शिक्षण असा दोहोंचाही समावेश करायला हवा. आज, आपल्या देशापुरता, आणि देशांमधील राज्यांपुरता विचार करायचा झाल्यास, असे दिसून येते की, १ एप्रिल २००९ पासून, 'बालकाच्या मोफत व सक्तिच्या शिक्षणा'चा जो कायदा अस्तित्वात आला आहे त्यानुसार, प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर व त्याची गुणवत्ता सुधारण्यावर आवश्यक तो खर्च करायला आपण बांधून घेतलेच आहे. आता प्रश्न आहे तो बालशिक्षणाचा. याविषयीचे माझे प्रतिपादन असे आहे की, बालशिक्षणावरील खर्च हा केवळ खर्च नसून ती फार लाभदायक अशी गुंतवणूक आहे; आणि या गुंतवणुकीचा ताबडतोबीचा लाभ म्हणजे त्याने प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारतो, आणि त्याचे दीर्घकालीन वैयक्तिक आणि सामाजिक लाभ तर पुष्कळच असणार आहेत. गेल्या दीड-दोन दशकांमध्ये झालेल्या संदर्भातील संशोधनांचा भरभक्कम आधार माझ्या या विधानाला आहे.

जेम्स हेकमन (James Heckman) हे अमेरिकेतील शिकागो विद्यापीठातील २००० सालचे नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ आहेत. त्यांचे, एकीकडे, बालशिक्षणाच्या आर्थिक लाभांवर संशोधन चालू असते. त्यांनी म्हटले आहे, '(बालकांच्या)सुरूवातीची वर्षे आपण समृद्ध केली तर त्याने, शिक्षकांच्या हातांशी अधिक चांगली मुले येऊन, त्याने शाळांची उत्पादकता सुधारण्यास मदत होईल. शाळांचा दर्जा सुधारला तर अखेरीस श्रमशक्तीचा दर्जा सुधारेल; अशातऱ्हेने, मानवी भांडवलातील सरकारी गुंतवणुकीचा लाभ मिळेल.

अमेरिकेत गरीब-वंचित मुलांसाठी 'पेरी प्रीस्कूल इनिशिएटिव्ह' या कार्यक्रमात १९६२ ते १९६७ या काळात त्यांच्यासाठी खास उघडलेल्या शास्त्रीय बालशाळांतून गेलेली मुले एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीस ४० व्या वर्षात पदार्पण केलेली होती. या मुलांच्या बालशिक्षणावर सरकारने व कुटुंबांनी केलेला खर्च विचारात घेऊन त्यावरील सामाजिक स्वरूपाचे लाभ कशाप्रकारे झाले, याचा हेकमन व त्यांचे सहकारी यांनी अभ्यास केला. त्यांचे निष्कर्ष असे होते.

१. बालशिक्षण न झालेली ४० टक्के मुले माध्यमिक शिक्षण पूर्ण करतात. तर बालशिक्षण झालेली ९० टक्के मुले माध्यमिक शिक्षण पूर्ण करतात.

२. बालशिक्षण न झालेली ५ टक्के मुले कॉलेजप्रवेश घेतलेली होती तर, बालशिक्षण झालेल्या मुलांबाबत हे प्रमाण ४० टक्के होते.

३. बालशिक्षण न झालेली ४० टक्के मुले गुन्हेगारीत आढळली तर, बालशिक्षण झालेल्या मुलांबाबत हे प्रमाण १० टक्के होते.

दुसऱ्या एका अभ्यासात, १८ व्या वर्षापर्यंत मुलांचा अभ्यास केला गेला, त्यातून असे दिसले की, या वयापर्यंत वेगवेगळ्या गुन्ह्यांसाठी

**बालशिक्षणावरील खर्च हा परिव्यय (costs) नसून ती राष्ट्र उभारणीसाठी होणारी प्रभावी गुंतवणूक (Investment) आहे. ही, इतर अनेक कल्याणकारी प्रकल्पांपेक्षा कितीतरी अधिक लाभदायक अशी गुंतवणूक आह**

अटक होण्याचे प्रमाण हे या कार्यक्रमांतर्गत बालशिक्षण झालेल्या मुलांपेक्षा इतर मुलांमध्ये ७० टक्के पेक्षा जास्त होते.

**इतर सामान्य निष्कर्ष असे होते की, शास्त्रीय बालशिक्षणाचा लाभ झाल्यामुळे**

१. व्यक्तिगत स्तरावर आर्थिक संपन्नतेच्या अधिक संधी,मिळून सामाजिक स्तर उंचावतो.

२. शास्त्रीय बालशिक्षणाने प्राथमिक-माध्यमिक शिक्षणाचा दर्जा सुधारतो.

३. बालवयातच सुरूवात केल्यास नागरिकत्वाचे, पर्यावरणाचे मूल्य संस्कार प्रभावीपणे घडविता येतात.

४. देशातील भावी गुन्हेगारीला आळा घालता येतो.

५. गुन्हेगारांवर खटले चालवणे, तुरूंगात सांभाळणे या सामाजिक खर्चाचे प्रमाण नेहमीच खूप मोठे असते तर, त्या तुलनेत बालशिक्षणाचा खर्च कमी असतो. बालशिक्षणातील गुंतवणुकीने पुढील काळातील हा सामाजिक खर्च बऱ्याच प्रमाणात वाचवता येतो.

शिकागो विद्यापीठातील संशोधनातून असे दिसून आले आहे की, बालशिक्षणातील १ डॉलरच्या गुंतवणुकीवर बालकाच्या पुढील जीवनभरात दरसाल १८ टक्के निव्वळ लाभ समाजाला प्राप्त होतो. हेकमन यांच्या सिद्धांतानुसार, प्रौढांचे व्यवसायांतर्गत प्रशिक्षण, शालेय शिक्षण आणि बालशिक्षण यांवर समान गुंतवणूक केली तर त्याचे मिळणारे लाभ तुलनेने बालशिक्षणाच्या बाबतींत सर्वांत जास्त आहेत. यातही, वंचित मुलांच्या बालशिक्षणावर गुंतवणूक केल्याने होणारे सामाजिक व आर्थिक फायदे जास्तच आहेत. अमेरिकेतील 'पेरी प्रीस्कूल मॉडेल प्रोग्राम' हा वंचित मुलांच्या बालशिक्षणाचा कार्यक्रम दीर्घकालचा आणि प्रसिद्ध असा आहे. १९६२ साली सुरू झालेल्या आणि त्यावेळी त्या शाळांतून बालशिक्षण घेतलेल्या मुलांचा, त्यांच्या चाळीशीत केलेल्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, या मुलांवर केलेल्या गुंतवणुकीतून समाजाला दर डॉलरमागे १७ डॉलर्सचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. इतर कुठल्याही गुंतवणुकीपेक्षा हा लाभ अधिक आहे. असे वेगवेगळ्या कार्यक्रमांचे अनुकालिक (Longitudinal) अभ्यास अशाच तऱ्हेचे निष्कर्ष देतात. उदाहरणार्थ, अमेरिकेतील फेडरल रिझर्व बँकेचे अर्थतज्ज्ञ आर्थर रोलनिक व रॉब ग्रुनेवाल्ड (Arthur Rolnic and Rob Grunewald) म्हणतात की, 'सरकारच्या अनेक योजना-प्रकल्पांवरील गुंतवणुकीपेक्षा बालशिक्षणावरील गुंतवणुकीतून मिळणारा लाभ



कितीतरी मोठा असतो.'

बालशिक्षणामधील गुंतवणुकीचे केवळ आर्थिक लाभच मोठे असतात असे नाही तर त्याने शाळांमधील गळतीचे प्रमाण कमी होते. विद्यार्थ्यांची विषयवार कामगिरीही सुधारते. उदाहरणार्थ, एका प्रकल्पात (Utah program) बालशिक्षण घेतलेल्या मुलांची कामगिरी इतर विद्यार्थ्यांपेक्षा जास्त चांगली होती. गणितात उत्तीर्ण होणाऱ्यांची संख्या १६ टक्के वाढली तर वाचनात उत्तीर्णतेचे प्रमाण २४ टक्के वाढले. तसेच गणितातील कामगिरी ५१ टक्क्यांनी तर भाषेमधील कामगिरी २७ टक्क्यांनी वाढली.

अशाच एका बालशिक्षणाच्या प्रकल्पाच्या (Syracuse Pre-school Program) अभ्यासाचा असा निष्कर्ष आहे की, ज्यांना योग्य वयात शास्त्रीय बालशिक्षणाचा लाभ झाला आहे, अशा मुलांच्या बाबतींत गुन्हेगारीचे प्रमाणही ७० टक्क्यांनी कमी झालेले आहे. तर दुसऱ्या बाजूला या मुलांचे महाविद्यालयात जाण्याचे प्रमाण वाढून, त्यांना अधिक उत्पन्नाच्या नोकऱ्या व अधिक संपन्न जीवन जगता आल्याचेही काही अभ्यासांतून स्पष्ट झाले आहे.

अशातऱ्हेचे अभ्यास आपल्या देशांत झालेले नाहीत ही आपली उणीव आहे. परंतु त्यामुळे इतर देशांमधील अभ्यासांनी दर्शविलेल्या निष्कर्षांचे मोल कमी मानता येणार नाही.

बालवयाचे महत्त्व, शास्त्रीय बालशिक्षणाचे योगदान, त्यावरील गुंतवणुकीवरील सामाजिक-आर्थिक लाभ आणि अलीकडच्या मेंदूसंशोधनाने अधोरेखित केलेले बालवयातील अनुभवांधारित; पण अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन, प्रत्येक राज्याने स्वतःचे नवे बालशिक्षण-धोरण आखण्याची गरज आहे. त्यासाठी, महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या (१९९४-९५) 'राज्यस्तरीय बालशिक्षण समिती'चा अहवाल खुपच शास्त्रीय व खुपच उपयुक्त आहे. या अहवालाने आपल्यासमोर ठेवलेल्या काही सूचनांचा त्वरीत उपयोग करणे, गोमंतक शासनाला शक्य आहे.

१. गोवा प्रदेशातील बालशिक्षणाला शास्त्रीय वळण देऊन, त्याच्या सार्वत्रिक अंमलबजावणीसाठी, स्वायत्त स्वरूपाचे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे 'बालशिक्षण मंडळ' स्थापन करावे.

२. केंद्र सरकारच्या पुढाकाराने चाललेल्या अंगणवाड्यांचे रूपांतर उत्तम दर्जाच्या बालवाड्यांत करण्यासाठी योजना आखावी, यांतून बालवयातील आरोग्य व शिक्षण या दोहोंचीही दखल घेतली जाईल.

३. बालशिक्षणात काम करणारी शिक्षिका उच्च शिक्षित असावी व तिला शास्त्रीय बालशिक्षणाचे प्रशिक्षण मिळण्यासाठी दोन वर्षे मुदतीचा पदव्युत्तर स्तरावरील शिक्षणक्रम विद्यापीठ स्तरावर सुरू करावा.

४. शास्त्रीय बालशिक्षणाच्या प्रचार-प्रसाराचे आणि पालक प्रबोधनाचे कार्य करण्यासाठी 'गोमंतक बालशिक्षण परिषदे'स शासनाने आवश्यक ते सहाय्य करावे.

५. गोमंतक सरकारने एखादी तज्ज्ञ समिती गठित करून या सूचनांचा पाठपुरावा केल्यास, गोमंतकात नवे 'शास्त्रीय बालशिक्षणाचे युग' निर्माण होईल अशी मला खात्री आहे.

**(गोमंतक बालशिक्षण परिषदेच्या अधिवेशन प्रसंगी केलेले भाषण.)**

---

*जसे एखाद्या बीमध्ये संपूर्ण झाड समावलेले असते, तद्वतच, बालकात त्याच्या भविष्याचा विकास सामावलेला असतो. शिक्षकाने, बालकाच्या नैसर्गिक विकासाला कोणताही बाह्य अडथळा होणार नाही, याची फक्त काळजी घेतली पाहिजे.*

**जोहानन पेस्टॉलॉझी**

अनिल जोशी

# महाराष्ट्र बालशिक्षण परिषद : सामजिक चळवळ

▶▶

बालशिक्षण म्हणजे मुलांचे सातव्या-आठव्या वर्षांपर्यंतचे शिक्षण. मुलांचे हे वय व या वयातील त्यांचे शिक्षण हे त्यांच्या आयुष्यभराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. हे शिक्षण अत्यंत शास्त्रीयपद्धतीने होणे, ही आपली सामाजिक गरज आहे. परंतु सामाजिक स्तरावर बालशिक्षणाचे महत्त्व नि शास्त्र सामान्यतः लोकांना माहीत नसते. आपल्या मुलांच्या निरोगी विकासासाठी त्याची अनिवार्य गरज आहे. अशातऱ्हेची जाणीव कुटुंबातून पसरलेली नाही. अनेकजण अनेक प्रकारचे शिक्षण घेऊन नोकरी व्यवसायाला लागतात; संसार थाटतात, पण, त्यांच्या स्वतःच्या शिक्षणाच्या कुठल्याही टप्प्यांवर, मुले वाढविण्यासाठी असणाऱ्या बालशिक्षणाच्या नि बालआरोग्याच्या माहिती व तंत्रांचा समावेशच नसतो. त्यामुळे बहुधा पालक सुशिक्षित असूनही संसारातील या मूलभूत कार्याविषयी अनभिज्ञच असतात.

बालकांचे सहा-सात वर्षांपर्यंतचे वय हे अत्यंत वेगाने होणाऱ्या वाढीचे वय आहे. शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अशा सर्वांगांनी एकाच वेळी होणाऱ्या या विकासाचे ते वय आहे. या वयात, मुलांच्या आरोग्यावर, आणि शिक्षणाच्या संदर्भात काही विपरित घडले तर त्याचे अनिष्ट परिणाम मुलांना आयुष्यभर भोगावे लागतात. आणि याच दोन्हींच्या बाबतींत निरोगी वातावरणात नि प्रभावी रीतीने काही घडत गेले, तर मुलामधून जन्माला येणारा प्रौढ पूर्णांशाने विकसित होतो, परंतु याची जाणीव पालकांना नसते, हा आपल्या देशातील एक गंभीर प्रश्न आहे.

मुलांना बालशाळेत टाकले की, पुढे सारी जबाबदारी शाळेची मानली जाते. शाळांमध्ये मुले शिक्षकांच्या किंवा खरे तर शिक्षिकांच्या ताब्यात असतात; आणि त्या करतील ते शिक्षण असे मानले जाते. शाळांच्या मुख्याध्यापिका आणि शाळांच्या व्यवस्थापन समित्यांचे सदस्य यांना बालशिक्षण नीटपणे कळणे, ही त्यांच्या कार्याची प्राथमिक अट असते. पण, या सर्वांचे बालशिक्षणाचे ज्ञान, आपल्या सामाजिक जीवनात ज्या प्रकारचे नि ज्या स्तरावरचे असते; त्याच प्रकारचे नि त्याच पातळीचे असते. बालशिक्षणाचा सुमारे चारशे वर्षांचा इतिहास, अनेक तत्त्वज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ यांनी केलेले प्रयोग, मांडलेले विचार, शिक्षणशास्त्र नि त्याला आधारभूत असलेले मानसशास्त्र-प्रामुख्याने बालमानसशास्त्र नि विकासक मानसशास्त्र; शरीरविज्ञान व आरोग्यविज्ञान; तत्त्वज्ञान आणि अलीकडे वेगाने विकसित होत चाललेले मज्जाशास्त्र, या साऱ्यांची पुसटशीही ओळख शिक्षणसंस्थांच्या चालकांना नसते. किंबहुना; असे काही आपल्याला माहीत असायला हवे, अशी जाणीवही त्यांना कधी झालेली नसते. आपल्याकडे शाळाचालक हे बहुधा हाती वेळ असलेले सामाजिक कार्यकर्ते असतात. जाणिवपूर्वक शिक्षणाचे मंत्र-तंत्र माहीत करून घेतलेले शैक्षणिक कार्यकर्ते नसतात; ही खरी अडचण आहे. त्यामुळे पालकांना आवडणाऱ्या गोष्टी ते शिक्षणात आणतात; पण मुलांच्या गरजेच्या मात्र नाही. आज विविध शास्त्रांच्या वेगाने वाढणाऱ्या जगभराच्या संशोधनांतून, आपल्या प्रचलित शिक्षणाला धक्के देणारे, पारंपरिक शिक्षणपठडीला आव्हान देणारे आणि चालू शिक्षणपद्धतींचा पायाच उलथून टाकणारे असे, काही घडते आहे. याची साधी माहितीसुद्धा शाळांच्या दैनंदिन व्यवहारांपर्यंत पोचलेली नाही. सामाजिक जीवनांचे नियंत्रण करू पाहणारे आणि त्यातही आपल्या शिक्षणाच्या आशयावर नि व्यवस्थांवर काबू ठेवून असणारे सरकारही अशा ज्ञानाच्या बदलत्या प्रवाहांपासून अनेक कोस दूर असते. शासन हे स्वभावतःच स्थितीप्रिय असते. पण शिक्षणात, त्याच्या आधारभूत शास्त्रांतून त्याच्या नित्य चालणाऱ्या प्रयोगांतून किंवा संशोधनांतून येणारी गती पकडली नाही; तर आपण जगात पुन्हा इतर समाजांच्या मागेच राहण्याची शक्यता ठेवत आहोत, असे होते. त्यामुळे शासनाला बालशिक्षण शास्त्राचे महत्त्व पटवणे नि त्यात होत जाणाऱ्या बदलांचे भान देणे, असेही एक काम आम्ही, बालशिक्षण चळवळीत काम करणारी मंडळी करीत आहोत.

बालशिक्षण चळवळीत आम्हा मंडळींना शास्त्रीय बालशिक्षणाचे महत्त्व तीव्रतेने वाटते. आणि बालशिक्षणाचे महत्त्व लक्षात न घेता कशातरी पद्धतीच्या शिक्षणामुळे आपल्या देशातील भावी पिढीचे नि म्हणून संपूर्ण भावी देशाचे मोठे नुकसान होत आहे असे दिसते. त्याबाबत एकूणच शासनासहित सर्व समाजाचे प्रबोधन कसे करावे, हा आमच्या पुढचा जागता प्रश्न आहे. वृत्तपत्रे-मासिके यांमधून बालशिक्षणाला फारशी जागाच मिळत नाही. रेडिओ-टीव्ही आणि त्यांची विविध चॅनल्स् देशातील पायाभूत अशा या विषयाच्या जवळ कधी पोचलेलीच नाहीत. जी काही थोडीशी शिक्षणविषयक मासिके आहेत, त्यांच्यांतूनही बालशिक्षण हा तसा तुलनेने दुर्लक्षितच भाग आहे. अर्थात, आपल्याकडे शिक्षणविषयक मासिकांची फारशा लोकांपर्यंत पोचच नाही. त्यामुळे त्यांमधून बालशिक्षणाचे केलेले प्रबोधन समाजाच्या एक टक्का लोकांपर्यंतही पोचण्याचा संभव नाही.

बालशिक्षणाला एक 'सामाजिक कार्य' म्हणूनही फारशी प्रतिष्ठा नसल्यामुळे, या क्षेत्रात तरुण कार्यकर्त्यांची ऊठबस तशी कमीच. त्यामुळे या क्षेत्रात कार्य करू शकणाऱ्या कार्यकर्त्यांचाच वर्ग वाढविण्यासाठी, महाराष्ट्र बालशिक्षण परिषद सातत्याने प्रयत्न करीत आहे. अशा लोकांसाठी वर्ग चालविले जातात; पण पाच-दहा लोकही त्याला हजेरी लावत नाहीत, असा अनुभव तसा दरवर्षीचाच.

मुख्य खंत आहे ती वेगळीच, बालशिक्षण हे एक शिक्षणाचे क्षेत्र आहे; आणि त्यात ज्ञानाचे नित्यनूतन प्रवाह असतात; नवनव्या विचारांचे वारे वाहत असते; संशोधनाचे नि प्रयोगांचे निष्कर्ष हे शिक्षणपद्धतींना

वेळोवेळी बदलण्याचे साकडे घालत असतात, यांविषयी सदैव जागृत असणारे देश आपल्या शिक्षणाला कुंठित होऊ देत नाहीत. आणि आपण, एक देश म्हणून याबाबतीत डोळे मिटून आहोत. विलक्षण उदासीन आहोत. हे सारे चित्र पालटले जाईल. अशी, महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेस उमेद आहे. पालक प्रबोधन, शिक्षण प्रशिक्षण, समाजप्रबोधन आणि शासन संबोधन ही परिषदेच्या हाती असलेली साधने आहेत.

बालशिक्षणाचे क्षेत्र हे पवित्र क्षेत्र आहे. ते दूषित होता कामा नये. त्याच्या दैनंदिन व्यवहारात शासनाने उतरू नये, स्वतंत्र तज्ज्ञ व्यक्ती, स्वेच्छाकार्य संस्था, छोटे समाजहितेच्छू गट आणि स्वतंत्रतेचे बाळकडू प्यालेला समाज यांनी बालशिक्षणाचे क्षेत्र आपलेसे करावे आणि शास्त्रीय बालशिक्षणाचा ध्यास घ्यावा, यासाठी, महाराष्ट्र बालशिक्षण परिषद काम करीत आहे.

महाराष्ट्र बालशिक्षण परिषद ही एक शैक्षणिक-सामाजिक चळवळ आहे. प्रत्येक जागरूक नागरिकास त्यात स्थान आहे, काम आहे, पुढाकार घेऊन काम करण्यास वाव आहे.

♦ परिषदेचे सभासद व्हा! ♦ इतरांना सभासद करून घ्या! ♦ आपल्या गावात, तालुक्यात परिषदेची शाखा उभी करा! ♦ सर्वच ठिकाणच्या बालकांचे भवितव्य उज्ज्वल करा! ♦ आजच्या बालशिक्षणातून उद्याची प्रौढ जनता विकासक्षम बनवा! ♦ भूतकाळाचा नाद सोडा, भविष्यकाळ घडविण्यासाठी संधी देतो तो वर्तमानकाळ धरून ठेवा!

**परिषदेच्या सदस्यत्वासाठी संपर्क :**
**अनिल जोशी-कार्यवाह-महाराष्ट्र बालशिक्षण परिषद**
**द्वारा-प्राज्ञपाठशाळा मंडळ, गंगापुरी-वाई-४१२८०३**
**जि. सातारा-फोन-०२१६७-२२०००६ (निवास-२२०९४७)**

# शिक्षणवेधसाठी आपण हे करू शकता।

ग्राममंगल
शिक्षणवेध
शिक्षणातील परिवर्तनासाठी

- वार्षिक वर्गणीदार
- एखाद्या कुटुंबाला अंक भेट
- कल्पक सूचना
- विविध शैक्षणिक संदर्भ किंवा माहिती
- आपलं कसदार लेखन
- वर्षभर किमान एखादी जाहिरात
- उपक्रमांसाठी प्रायोजक
- परीक्षणार्थ पुस्तके
- प्रतिक्रिया आणि शुभेच्छा

|| अनुभव ||

डॉ. रत्ना गुजर

# प्रतिमानासह अध्यापन एक सर्जनात्मक प्रयोग

▶▶

अध्यापन म्हणजे विद्यार्थ्यांचे मन आणि वर्ग वातावरण अध्यापनाची अद्दिष्टे साध्य करता करता अध्यापनात रंजकता आणणे होय. अध्यापन प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी विविध प्रकारच्या वातावरणाची निर्मिती, विद्यार्थ्यांना करावयाच्या कामाचा पुरवठा, विद्यार्थ्यांच्या मनाचे चित्र या तीन चक्रातून शिक्षकाला जावे लागते. हे चक्र सातत्याने चालू असते.

अध्यापनाचा एक वेगळा प्रयोग म्हणजे अध्यापनाचे प्रतिमान. अध्यापनाचे प्रतिमान म्हणजे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रियेसाठी पोषक वातावरण तयार करणारा आराखडा.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत अधिव्याख्याता म्हणून कार्य करण्याआधी प्राथमिक शाळेला मुख्याध्यापिका असताना अध्यापनाचे वेगवेगळे प्रयोग मी प्रत्यक्ष वर्गाध्यापनात केलेले आहेत. त्यापैकी 'प्रतिमानाच्या' प्रयोगाची उदाहरणे शब्दांकित केली आहेत. वर्ग ६ वीला मराठीचे अध्यापन सुरू असतानाचा प्रसंग-विषयाला अनुसरून मी थोडसं कथन केलं...निलेश मावळे नावाचा एक विद्यार्थी ६ वीत शिकत असताना त्याच्या डोळ्यांनी त्याला कमी दिसायला लागलं. पुढे कमी-कमी दृष्टी होता होता, वर्ग १० वीच्या सुरुवातीला त्याची पूर्ण दृष्टी गेली. वडील डॉक्टर होते. त्यांनी डॉक्टर मित्रमंडळीच्या मदतीने निलेशवर महागडे औषधोपचार केले. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. १० वीच्या पूर्ण शिकवण्या, त्याने फक्त ऐकून केल्या,

**अध्यापन म्हणजे विद्यार्थ्यांचे मन आणि वर्ग वातावरण अध्यापनाची अद्दिष्टे साध्य करता करता अध्यापनात रंजकता आणणे होय. अध्यापन प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी विविध प्रकारच्या वातावरणाची निर्मिती, विद्यार्थ्यांना करावयाच्या कामाचा पुरवठा, विद्यार्थ्यांच्या मनाचे चित्र या तीन चक्रातून शिक्षकाला जावे लागते. हे चक्र सातत्याने चालू असते.**

कारण दिसत नसल्यामुळे लिहायला अडचणी येत होत्या. परीक्षेसाठी निलेशच्या आई-बाबांना लेखनिकाची व्यवस्था करावी लागली. परीक्षा झाली...निलेशने जिवापाड मेहनत केली होती...निकालाचा दिवस उजाडला...आणि काय आश्चर्य!...प्रत्यक्ष नागपुरचे जिल्हाधिकारी निलेशची मुलाखत घ्यायला त्याच्या घरी पोहचले. सोबत प्रसार माध्यमांची गर्दी होती. निलेशला जिल्हाधिकाऱ्यांनी पेढा भरवला, त्याचे अभिनंदन केले; कारण निलेश अपंग विद्यार्थ्यांमधून, नागपूर विभागतून प्रथम मेरीट होता. जिल्हाधिकाऱ्यांनी विचारले, 'निलेश तुला भावी आयुष्यात काय व्हायचे आहे?' निलेशने उत्तर दिले, सर! मला तर संगणक अभियंता व्हायचे होते; पण मला आता शिक्षकच व्हावे लागेल. कारण सर! माझे डोळे हरवले आणि त्यासोबत संगणक अभियंता होण्याचे स्वप्नही हरवले.' निलेशच्या या हृदयाला भिडणाऱ्या उत्तराने निलेशसह जिल्हाधिकारी व त्याचे आई-वडील सर्वांचेच डोळे डबडबले.

मुलांनो, वरील प्रसंग ऐकून तुम्हाला काय वाटलं? तुमच्या मनात आलेले विचार सांगा.

**एक विद्यार्थी** : मॅडम, निलेशला डोळ्यांमुळे आपली इच्छा बदलावी लागली.

**दुसरा विद्यार्थी** : डोळे हा आपल्या शरीराचा अतिशय महत्त्वाचा अवयव आहे.

**तिसरा विद्यार्थी** : डोळ्यांची आपण खूप काळजी घ्यायला हवी.

बरोबर सगळेजण छान उत्तर देत आहेत. काळजी म्हणजे नेमकं काय करावं बरं?

**विद्यार्थी** : सकाळी उठल्याबरोबर डोळे स्वच्छ पाण्याने धुवावे.

**दुसरा विद्यार्थी** : डोळे स्वच्छ आणि थंड पाण्याने धुवावेत व स्वच्छ कापडाने पुसावेत.

आणखी काय सांगता येईल डोळ्याची काळजी घेण्याबाबत?...मॅडम, डोळ्यांचा व्यायाम पण करायला पाहिजे; म्हणजे डोळे गोलाकार फिरवायचे, सरळ व उलट दिशेने फिरवायचे. तुम्ही शनिवारी शिकवला होता ना व्यायाम डोळ्यांचा, तोच रोज करायला पाहिजे. अगदी बरोबर! आणि शिवानी, तू तर मघापासनं काहीच बोलली नाहीस. सांग बरं यापेक्षा वेगळ काय करायचं, डोळ्यांची काळजी घ्यायला?

**शिवानी** : हो सांगते ना, टी. व्ही. कमी पाहायचा. कारण, परवाच मला आईने डॉक्टरांकडे नेलं होतं. माझे डोळे सतत लाल राहायचे ना म्हणून मग डॉक्टर काकांनी हेच सांगितलं, टी. व्ही. कमी पाहा, टी. व्ही. पाहाताना टी. व्ही. जवळ बसायचं नाही. जरा अंतरावर बसायचं. ही पण डोळ्यांची काळजी घेणंच झालं ना मॅडम.....बरोबर, अगदी बरोबर. शिवानी आजकाल माहिती बारकाईनं लक्षात ठेवायला लागली. सगळ्यांनी टाळ्या वाजवून कौतुक करा शिवानीचं. (विद्यार्थ्यांच्या टाळ्या)...यापेक्षा आणखी जास्तीची माहिती सांगायची आहे का कुणाला?

विद्यार्थी : मॅडम, मी सांगतो ना. बरं बरं सांग...मॅडम आपण जेव्हा पुस्तक वाचतो ना, तेव्हा पुस्तक एकदम डोळ्यांजवळ नाही पकडायचं. त्यातही थोडं अंतर असावं, म्हणजे डोळ्यांना त्रास नाही होणार; तुम्ही सांगता ना मॅडम, नेहमी वर्गात आम्हाला, पुस्तक डोळ्यांच्या जवळ नका धरू म्हणून. मग तसंच...अरे व्वा! ब्रिजेशला बरोबर लक्षात राहिली सूचना. तसेच

डोळ्यात काजळ लावणे किंवा पेन्सिलने काजळ लावणं ह्या गोष्टी पण डोळ्याला घातक आहेत. एखाद्यावेळी डोळे लाल झाले, खाजवले किंवा चिपड येत असेल तर डॉक्टरांकडे जायचं व त्यांनी सांगितल्यानुसार डोळ्यांची काळजी घ्यायची. खूप उष्णता, खूप थंडीपासून डोळ्यांना त्रास होतो. उन्हात फिरल्याने डोळ्यांना त्रास होतो. ज्याने त्रास होतो त्या गोष्टी टाळायच्या. अशाप्रकारे, डोळ्यांची काळजी घ्यायची. मुलांनो, डोळ्यांमुळे निलेशला आपल्या जीवनाचं ध्येय बदलावं लागलं. म्हणजे, डोळे आपल्या जीवनाला वळण देणारा महत्त्वाचा अवयव आहे.

मुलांनो 'नेत्रदान हे श्रेष्ठदान' म्हटले आहे. मरणानंतर डोळे दान करता येतात. ऑपरेशनने दुसऱ्यांना बसवता येतात. त्यामुळे त्यांना जग पाहता येतं. दुसऱ्याला दृष्टी मिळते. मुलांनो, डोळ्याबद्दल छान माहिती दिली आणि ऐकली. सगळ्यांनी एकमेकांचे टाळ्या वाजवून अभिनंदन करूया. 'डोळे' या विषयावर ऐकलेल्या गाण्यांचा संग्रह करा आणि वहीत लिहा.

'डोळ्यांची निगा' या महत्त्वाच्या विषयावर रटाळ स्पष्टिकरणात्मक माहिती देण्यापेक्षा वरीलप्रमाणे 'सर्जनात्मक प्रतिमानाचा' अध्यायपनात सर्जनशील प्रयोग करून, ज्ञानरचनावादाची बैठक अध्यापनाला देता आली. विद्यार्थ्यांच्या विचारशक्तिला विचार प्रवृत्त करता आले. असेच विविध शैक्षणिक प्रयोग करण्याची आणि शैक्षणिक व्यासपीठ जिंकण्याची गरज ओळखून शिक्षकांनी अध्यापन करणे अपेक्षित आहे. तरच या तंत्रज्ञानाच्या युगात आपण आपले महत्त्व टिकवून ठेवू शकू.

'अशी मारू या उंच भरारी, गगन होईल थिटे,
पाहून अपुल्या कलागुणांना, पारणे डोळ्यांचे फिटे'

●●





वार्षिक वर्गणी रुपये ४००/-
त्रैवार्षिक वर्गणी रुपये १०००/-
किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या.
'८० जी' कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि दरमहा 'शिक्षणवेध'चा अंकही मिळवा.
वर्गणी / रोख / चेक / ड्राफ्टने 'ग्राममंगल' या नावाने पाठवू शकता.
मुंबई-पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/- वटणावळ आवश्यक.

**पुणे कार्यालय :**
ग्राममंगल, गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी,
कोथरुड, पुणे ४११ ०३८. संवाद : ०२० २५३८६६८७

## वृत्त विशेष

# शिक्षणहक्क कायदा आणि मराठी शाळांचा प्रश्न या विषयावर चर्चासत्र

इंग्रजी शाळांमध्ये उत्तम प्रकारच्या पायाभूत सुविधा दिसतात. त्यामुळे पालक इंग्रजी शाळांकडे आकर्षित होतात. अनुदान नसल्यामुळे या शाळा शासनाला जुमानत नाहीत; कायद्याचा बडगा उगारला जातो तो फक्त मराठी शाळांवर, असे मत दै. लोकसत्ताने आयोजित केलेल्या 'लाऊडस्पीकर' या कार्यक्रमात व्यक्त करण्यात आले. 'शिक्षणहक्क कायदा आणि मराठी शाळांचा प्रश्न' हा कार्यक्रमातील चर्चेचा विषय होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध बालशिक्षणतज्ज्ञ रमेश पानसे हे होते.

याप्रसंगी पानसे यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले की, 'मूल निसर्गत: कसे वाढते, कसे शिकते, या बाबीचा विचार करून संपूर्ण शिक्षणव्यवस्था बदलणे गरजेचे आहे. शाळेत शिकवण्यापेक्षा शिकण्याचे कार्य चालू झाले पाहिजे. शिक्षकांच्या मानसिकतेपासून वागणुकीपर्यंत, शिकविण्याच्या कौशल्यापासुन त्यांच्या माहितीच्या साठ्यापर्यंत, मुलाच्या अंगानी, संस्थाचालकांनी, शासकीय धोरण बनवणाऱ्यांनी आपली भूमिका बदलली पाहिजे. याचा दुसरा धागा असा की, प्रत्येक मुलातून एक प्रौढ जन्माला येणार असतो; त्यामुळे मुलाचे आजचे शिक्षण हे उद्याचा प्रौढ घडवत असतो. उद्याचा प्रौढ कसा असावा? याविषयी काही ठोस भूमिका आहे का? पुढच्या समाजाचे काही चित्र आहे का? भविष्यातील समाज, साधारणत: २०२० नंतर हा तरुणांचा देश असणार आणि आपल्या देशाची तेव्हाची स्थिती आपला तरुण वर्ग कसा असेल यावर ठरेल, आणि हा आपला तरुण वर्ग कसा असेल हे आपण त्याला काय शिक्षण देतो आहोत यावर ठरणार आहे. मला या ठिकाणी निश्चित स्वरूपाची भूमिका मांडायची आहे की, शिक्षणाचा खूप नीटपणे पुनर्विचार व्हायला हवा. त्यामध्ये आज कुठेही ना शासनाकडून ना समाजाकडून सुरुवात झालेली दिसते.'

शिक्षणहक्क कायदा झाला, त्यामुळे सर्वांना शिक्षण मिळेल याची खात्री झाली आहे. परंतु 'शिक्षणाची गुणवत्ता' हा विषय नेहमीच दुर्लक्षित राहिला आहे, याबाबत गांभीर्याने विचार होण्याची गरज आहे. तसेच या शिक्षणहक्क कायद्याच्या अंमलबजावणीबाबत साशंकता आहे, असे मत आर.पी.जोशी यांनी यावेळी व्यक्त केले.

शिक्षण हक्क कायद्याची आवश्यकता, त्याच्या अंमलबजावणीमध्ये उद्भवणाऱ्या अडचणी, शिक्षणाची घसरणारी गुणवत्ता, नियोजित मुदतीत सर्व तरतुदींची पुर्तता होणार का? कायद्याच्या आणि अनुदानाच्या सापळ्यात अडकलेल्या मराठी शाळांचे भविष्य, शाळाबाह्य मुले, शिक्षेसाठी शिक्षकांना होणाऱ्या शिक्षा, शिक्षणव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण घटक असणाऱ्या शिक्षकांची मानसिकता, अशा विविध मुद्यांवर शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांनी चर्चा केली. या चर्चेमध्ये शिक्षणतज्ज्ञ रमेश पानसे, शिक्षण संचालक डॉ. श्रीधर साळुंखे, पुणे महानगरपालिकेच्या शिक्षणमंडळांचे अध्यक्ष बाबा धुमाळ, शिक्षणसंस्था महामंडळांचे कार्यवाह डॉ. आर. पी. जोशी, डोअरस्टेप स्कूलच्या सदस्या भावना कुलकर्णी, आपटे प्रशालेचे निवृत्त शिक्षक अ. ल. देशमुख, विविध शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी आणि पालक संघटनांचे प्रतिनिधी आदी सहभागी झाले. शिक्षणाचा पसारा शाळेत जाणाऱ्यांसाठी, शिकणाऱ्यांसाठी आहे; पण तिथे त्यांचा विचार होताना दिसत नाही. ज्याला शिक्षण द्यायचे त्याच्या गरजा, त्याच्या क्षमता आणि त्याचा कल लक्षात घेणे गरजेचे आहे. अलीकडच्या अनेक शास्त्रीय संशोधनांतून शिक्षणविषयक नवे ज्ञान समजून घेणे शक्य झाले आहे.

मराठी शाळांच्या प्रश्नावर प्रकाश टाकताना शिक्षण संचालक साळुंखे यांनी महाराष्ट्रात एकूण १८४ हजार शाळा असून पैकी ६८ हजार मराठी शाळा आहेत. या १८४ हजार शाळांमध्ये एकूण ५ लाख ४८ हजार शिक्षक कार्यरत आहेत. तरीही शिक्षणहक्क कायद्याची अंमलबजावणी करताना सर्व स्तरांतील शाळाबाह्य मुलांपर्यंत पोहचून त्यांना शाळेकडे वळवण्यामध्ये शासन कमी पडत आहे, अशी कबुलीही दिली. मुलांच्या वर्तणुकीबाबत शिक्षकांनी मुलांना शिक्षा करायची नाही, शिक्षा केल्यानंतर शिक्षकाला ३ वर्षांच्या कारावासाची 'शिक्षा' होणार, याविषयावर सुद्धा मतमतांतरे व्यक्त झाली. आर्थिकदृष्ट्या निम्नस्तरावरील घटकांना शाळांमधून २५% आरक्षण, याची अंमलबजावणी याबाबतही चर्चा याठिकाणी झाली. एकूणच या चर्चेतून 'शिक्षण' या विषयावर अनेक प्रश्न जमलेल्यांच्या मनात होते, अनेक प्रश्नांची उत्तरे देण्यात आली, अनेक प्रश्न वेळेअभावी अनुत्तरित राहिले. पण त्यानिमित्ताने 'शिक्षण' या प्रश्नाने किती गंभीर स्वरूप धारण केलेले आहे आणि त्यात आता ठाम व ठोस पावले उचलून बदल करण्याची गरज आहे, हे प्रकर्षाने जाणवले. 'शिक्षणहक्क कायदा व मराठी शाळांचा प्रश्न' या नियोजित विषयावर मात्र विशेष चर्चा झाली नाही. तो विषय सोडून इतर प्रश्नांनी चर्चा गाजली, रंगली व थांबली.

## वाचकसंवाद

**सप्रेम नमस्कार.**

प्रदर्शनात रचनावादी शिक्षणाचा दृष्टिकोन सहजपणे, सोप्या भाषेत वाचता आला. एकूणच शिक्षण ही प्रक्रिया कशी घडते, याचे हे तात्त्विक (पहिल्या पोर्चमध्ये) व प्रात्यक्षिक (नंतरच्या पोर्चमध्ये) पाहिल्यावरच प्रतिमान अनुभवता आले. तुमच्या या मूलभूत प्रयत्नांची स्तुती करावी एवढा मी मोठा नाही, पण मनपासून आभार मानावेसे वाटतात. शिक्षणवेधही महाराष्ट्रातल्या प्रत्येक शाळेत, शिक्षकांपर्यंत, शिक्षण प्रशासकांपर्यंत, ग्रंथालयात पोहोचला, तर नवशिक्षणाकडे स्पष्ट आणि स्वच्छपणे पाहण्याचा नवा चष्मा या घटकांना जरूर मिळेल, असा विश्वास वाटतो. Thanks a lot.

**सदानंद टेळके**



## अमेरिकेत उच्च पदावरील जागा रिक्त

अमेरिकेतील लाखो तरुणांना चांगल्या रोजगाराची, नोकरीची आवश्यकता आहे असे तेथील चित्र दर्शवते. पण तेथील लाखो उच्च पगाराच्या नोकऱ्यांची पदे रिक्त आहेत. कारण त्याकरिता लागणारे कौशल्य व शिक्षण असलेल्या माणसांची खूप कमतरता तेथे जाणवते आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ओबामा आणि राज्यपाल रोमने यांनी यावर खूप चर्चा केली. मात्र, त्यांची ही चर्चा एकाच मुद्यावर येऊन थांबत होती की, अमेरिकन तरुण उच्च शिक्षणाकडे कसे वळतील आणि कमी उत्पन्न असणाऱ्या तरुणांसाठी उच्च शिक्षण आवाक्यात कसे आणता येईल.

मात्र, आता कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांतील मुलांसाठीही उच्च शिक्षण उपलब्ध व्हावे; यासाठी अमेरिकन सरकार प्रयत्नशील आहे व त्यादृष्टीने विविध योजना आखत आहेत. विद्यार्थ्यांनी आधीपासूनच आपल्या उच्च शिक्षणाची दिशा ठरविणे कोणते कॉलेज निवडायचे, तेथील प्रवेश प्रक्रिया व आर्थिक मदत निधीची माहिती घेणे, त्या सुविधेचा फायदा घेणे, याकरिता नियोजन करावे व पालकांनीही हे सर्व समजून त्यात सहभागी व्हावे; याकरिता सरकार प्रयत्नशील आहे. महाविद्यालयीन काळातील या विविध योजना आणि सुविधांमुळे सर्व स्तरातील युवक उच्च शिक्षणाकडे वळतील आणि उत्तम कौशल्य असलेले गुणवत्ताधारक उमेदवार प्राप्त होऊ शकतील. उच्च पगाराच्या उच्च पदांवरील रिक्त पदांचा प्रश्न सोडविण्यासाठी हा प्रयत्न होत आहे.

## नॉर्वेतील दांपत्याला बाल अत्याचारा संदर्भात अटक

कोणत्याही प्रकारची कठोर शिक्षा मग; ती शारीरिक असो वा भावनिक, ती मुलांच्या मनावर दीर्घकाळ किंवा आयुष्यभर ठसा उमटवते. त्याचे विपरित परिणाम त्याच्या व्यक्तिमत्त्वावर होतात. मुलांना शाळेत शिक्षा करण्यात येऊ नये असा नियम आहे. पण घरातील शिक्षेचे काय? असा प्रश्न पडतो. नुकतेच नॉर्वेत राहणाऱ्या एका भारतीय दांपत्याने आपल्या सात वर्षांच्या मुलाला वारंवार शारीरिक शिक्षा दिली. त्यासाठी नॉर्वेतील न्यायालयाने दोघांना १८ महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा ठोठावल्याची बातमी आहे. आपल्या 'अतिचंचल' मुलाची समस्या समजून न घेता, त्याला सहा-सात महिने अशा प्रकारे सातत्याने धमकावणे, रागावणे, भीती घालणे, चटके देणे अशा प्रकारच्या शिक्षा हे पालक करत होते, असे काही वृत्तपत्रांत म्हटले आहे.

ऑस्लो येथील जिल्हा न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली आणि नॉर्वेतील पिनल कोडच्या कलम २१९ नुसार 'वारंवार अत्याचार' या अंतर्गत शिक्षा ठोठावण्यात

आली. पालकांना झालेला तुरुंगवास, नॉर्वेतील कायदे व न्यायालयाचा निकाल या सर्वांबाबत जरी उलटसुलट चर्चा होत असली, तरी लहान बालकाला कुटुंबातच इतक्या असुरक्षिततेला सामोरे जोव लागत आहे, ही गोष्टच हादरवून टाकणारी आहे. खरंतर जगात कुठेही सुरक्षित वाटत नसले, तरी आई-वडीलांच्या कुशीत मूल सुरक्षित असते. पण या गोष्टीलाही याप्रकारच्या बातम्या छेद देतात. पालकांनी, आपल्या पाल्यांना काही समस्या असू शकते आणि त्यावरी उपायही करता येतो, याचे भान ठेवणे अत्यंतिक गरजेचे आहे. शिक्षेने प्रश्न कधीही सुटत नाही; तर ते प्रश्न अधिकच वाढत जातात हे लक्षात घेणे आवश्यक झाले आहे.

राष्ट्रवृत्त

## मानवी हक्कांचा अभ्यासक्रमात समावेश

राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने केलेल्या शिफारसीनुसार NCERT ने शालेय अभ्यासक्रमात मानवी हक्कांचा समावेश केला असल्याची माहिती, आयोगाचे अध्यक्ष न्यायाधीश के. जी. बालकृष्णन यांनी नुकतीच दिली. 'मुलांमधील संवेदनशीलता वाढीला लागावी; यासाठी प्राथमिक शाळेतच याचा समावेश केला आहे. परंतु केवळ अभ्यासक्रमात समावेश करून हा प्रश्न सुटणार नाही, तर मानवी हक्कांविषयी लोकांनी सजग आणि सतर्क राहिले पाहिजे, असे त्यांनी मानवी हक्क प्रशिक्षणाच्या अधिवेशनात सांगितले.

निवृत्त न्यायाधीश व आयोगाचे संस्थापक व्ही. एस. मलीमथ यांनी, केवळ अभ्यासक्रमात समावेश करून किंवा परीक्षेच्या पातळीवर याचा विचार करून, मानवी हक्काची जोपासना होणार नाही, तर संपूर्ण प्रक्रियेचे भारतीयकरण करून त्याला मूल्यशिक्षणाची जोड दिली पाहिजे, असे मत व्यक्त केले.

या कामासाठी शासकीय पातळीवर आणि सर्वांनीच साहाय्य करण्याची आवश्यकता असल्याचे NCERT चे अध्यक्ष प्रवीण सिनक्लेर यांनी म्हटले आहे. शिक्षकांचे प्रशिक्षण व सुधारित अभ्यासक्रमामध्ये फार मोठी दरी असल्याचे मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. ही दरी भरून येण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करू, असे आश्वासनही त्यांनी दिले.

## गोमंतक बालशिक्षण परिषदेचे अधिवेशन

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या धर्तीवर ५ वर्षांपूर्वी गोमंतक बालशिक्षण परिषदेची स्थापना झाली. या परिषदेचे पहिले अधिवेशन दि. ३ नोव्हेंबर २०१२ रोजी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ रमेश पानसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

बालशिक्षणाच्या शास्त्रीय ज्ञानआधाराचा प्रचार व प्रसार करण्यासाठी भारतातील या दुसऱ्या राज्य परिषदेची स्थापना झाली आहे. गोवा राज्याचे मुख्यमंत्री मोहन पार्टीकर यांचीही या अधिवेशनाला विशेष उपस्थिती होती. गोवा राज्याने जर या पद्धतीने व वेगाने बालशिक्षणाच्या

शास्त्रशुद्ध शिक्षणपद्धतीचा शासकीय पातळीवरून प्रसार व कृतीकार्यक्रम हाती घेतला तर गोवा गोवा हे राज्यातील शास्त्रशुद्ध शिक्षण देणारे भारतातले पहिजे राज्य ठरेल असा विश्वास या अधिवेशना प्रसंगी मान्यवरांनी व्यक्त केला.

राज्यवृत्त

## विनाअनुदानित शाळांवरील संकट

महाराष्ट्र राज्यातील साडेचार हजार विनाअनुदानित शाळांवर अनुशेषाच्या अटीने नवेच संकटे उभे ठाकले आहे. राज्य सरकारच्या विनाअनुदानित शाळा आणि कायम विनाअनुदानित शाळांच्या स्थापनेनंतर, पाच वर्षानंतर या शाळांचे मूल्यांकन करून त्यापुढील प्रत्येक वर्षी टक्क्यांप्रमाणे अनुदान देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले होते. यानुसार संस्था स्थापन झाल्यानंतर दहा वर्षांत, त्या अनुदानित होण्यास पात्र ठरत होत्या. दहा वर्षे सर्व नियमांनुसार सुरू असलेल्या या शाळांवर १५ नोव्हेंबर २०११ च्या शालेय शिक्षण विभागाच्या आदेशाने कारवाई झाली. पदांचा अनुशेष असलेल्या शाळांना अनुदानापासून अपात्र ठेवण्याचा निर्णय लागू करण्यात आला. या अनुशेषाच्या संकटाचा फटका तब्बल सोडचार हजार शाळांमधील ८० हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व ८ लाख विद्यार्थी यांना बसण्याची भीती आहे. यामुळे सरकारने अचानक लादलेल्या या धोरणात बदल करावा, यासाठी २० हजार शिक्षकांनी आझाद मैदानावर आंदोलन केले आहे. शालेय शिक्षण विभागाचा हा निर्णय शिक्षण हक्क कायद्याच्या विरोधी आहे व सरकारने हा निर्णय रद्द केला नाही, तर घटनेच्या शिक्षण हक्क कलमाचा भंग होईल, अशी संतप्त प्रतिक्रिया शिक्षकांनी व्यक्त केली.

## पात्रता आहे, पण नोकरी नाही

हवी तशी नोकरी मिळवायची, तर त्याकरिता जी पात्रता नियमानुसार निर्धारित करण्यात आली आहे, त्याची पूर्तता केली जाते. परंतु तरीही बेकारीला सामोरे जावे लागले; तर मोर्चा काढण्याची, आंदोलन करण्याची पाळी येते. नुकतेच नेट-सेट, बी. एड., डी. एड. पात्रताधारक उमेदवारांनी शासकीय मध्यवर्ती इमारतीबाहेर याच कारणासाठी मोर्चा नेला. नेट-सेट, बी. एड., डी. एड. व डी. टी. एड. असलेल्या उमेदवारांच्या नेमणुका केंद्रिय पद्धतीने व्हाव्यात व या नोकऱ्यांसंदर्भात होणारा संस्थांचा मनमानी, भ्रष्टाचारी कारभार त्वरित थांबवावा, ही मागणी मांडण्यात आली. मूळ पदवी, पदविका किंवा पदव्युत्तर शिक्षण घेऊनही नियमानुसार अन्य पात्रता परीक्षांची जसे, सेट-नेटची अट असते. तीही परीक्षा पास करूनही अनेकांना बेकारीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. मुळात अध्यापन कार्य उत्तम करण्यासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत? त्याची पूर्तता होते आहे का? सगळ्या अटी पूर्ण करूनही संस्थाचालक निवड करताना मनमानी कारभार करतात त्याविरुद्ध कारवाई का होत नाही? असे अनेक प्रश्न या आंदोलनात उमेदवारांनी उपस्थित केले.



# नवे शिक्षण नव्या दिशा

पुण्यामध्ये गणेश कला क्रीडा केंद्र येथे दि. १९ ते २२ नोव्हेंबर दरम्यान ग्राममंगल संस्थेतर्फे शैक्षणिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विषय होता – 'नवे शिक्षण नव्या दिशा' – रचनावादी शिक्षण हे प्रदर्शन आयोजित करण्यामागे निमित्त होते; ते महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या १९ व्या राज्यव्यापी अधिवेशनाचे. आणि या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ सह आयोजक होते.

ग्राममंगल ही संस्था गेली तीस वर्षे अखंडपणे शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे. आदिवासी मुलांच्या बालवाडीपासून सुरू झालेले कार्य आज अत्यंत व्यापक क्षेत्रात पसरले आहे. बालवाडीपासून सुरुवात करून आज, बालशिक्षण, प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षणातील नवे प्रयोग, नव्या शास्त्रीय पायांवर उभे करणे, नव्या शिक्षणपध्दतीची निर्मिती व प्रसार करणे, शिक्षकांचे प्रशिक्षण करणे, अनेक शिक्षणसंस्थांना सल्लागार-साहाय्यक म्हणून काम करून त्यांना शिक्षण परिवर्तनाच्या प्रवाहात सामील करून घेणे, ही कामे आज मोठ्या प्रमाणावर चालू आहे. आदिवासी शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, लर्निंग होम, महाराष्ट्र ज्ञान महामंडळासमवेत हॉबी होम, शास्त्रालय, विकासघर असे अनेक नवनवे नमुने ग्राममंगलने समाजापुढे ठेवले आहेत. एक नवा रचनावादी शिक्षणाचा पर्याय ग्राममंगलने उभा केला आहे.

केंद्र व राज्य शासनानेही सर्व स्तरांवरील शालेय शिक्षणात ज्ञान रचनावादी शिक्षणाचा अवलंब केला आहे. अशावेळी रचनावादी शिक्षण याविषयी संबंधीत समाजाचे प्रबोधन होणे, ग्राममंगलला गरजेचे वाटते. हा हेतू मनात धरून, या विषयावर हे शैक्षणिक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. रचनावादी शिक्षण म्हणजे काय, रचनावादाची सैध्दांतिक पार्श्वभूमी, रचनावादाची तत्वे, रचनावादाचे व्यावहारिक स्वरूप, प्रत्यक्ष शालेय वर्गामधील रचनावादी शिक्षणाची विषयवार मांडणी, रचनावादातील मूल्यमापन, इत्यादी विविधांगी विषय प्रदर्शनात

मांडले गेले होते. त्याचबरोबर आजचे शिक्षण विषयक प्रश्न, शिक्षण क्षेत्रात होणारी नवी संशोधने, मेंदूशास्त्र, बहुविध बुध्दिमत्तांचा विचार, आकलनशास्त्र इत्यादी विषयांची मांडणी केलेली होती. मुलांची शिक्षणाची प्रक्रिया समजावून देणारी दालने होती, प्रकल्प पध्दती उलगडून दाखवलेली होती. तसेच, ग्राममंगलने तयार केलेली शैक्षणिक साधने, मुलांसाठी स्वयंअध्ययन पुस्तिका, शिक्षक पालकांसाठी संदर्भ पुस्तके, मासिके यांचे प्रदर्शनही होते. याचबरोबर बालशिक्षणाच्या सर्व टप्प्यांचे प्रात्यक्षिक दाखवणारी बालनगरीही होती. शिक्षणाच्या प्रक्रियेत सर्वात महत्वाची व्यक्ती आहे, ती म्हणजे बालक. या बालकाच्या शिक्षण स्वातंत्र्याचा जाहीरनामा सुरूवातीला मांडलेला होता.

'नवे शिक्षण नव्या दिशा' या प्रदर्शनातून आम्ही समाजाला आणि सरकारला असा विश्वास देऊ इच्छित आहोत की, समाजातले प्रत्येक मूल चांगले शिकू शकते.

प्रत्येकच बालकाला नि बालिकेला उपजत शिकण्याची आवड असते. शाळा ही आकर्षक आणि भरपूर उपक्रम देणारी असेल; तर प्रत्येक बालक-बालिकेला शाळेत जावेसे वाटते; मुलांना शाळेत येती करण्याचा प्रश्नच राहत नाही. रोजच रमवणारे, मन गुंतवून ठेवणारे शिक्षण शाळेत मिळत असेल; तर प्रत्येक बालक आणि बालिका आपणहून, वर्षानुवर्षे शाळेला खिळून राहील; शाळांतून 'गळती' होण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही. प्रत्येकालाच मेंदू हा त्याचा/तिचा 'शिकण्याचा अवयव' आहे. मेंदूला अनुभवांचे खाद्य लागते. शाळांतून कृतिशील अनुभवांची रेलचेल असेल; तर प्रत्येकच मूल शाळेत जाऊन चांगले 'शिकते' होईल. कच्च्या मुलांचा-अप्रगत विद्यार्थ्यांचा प्रश्नच शिल्लक राहणार नाही.

स्वयंशिक्षणाच्या अपार संधी, सौंदर्यपूर्ण आनंदमय वातावरण, व्यक्तिगत शिक्षणाची रचना, अभ्यासांतर्गत सातत्याने छोटी छोटी बौध्दिक आव्हाने घेण्याच्या संधी, शिकण्यात आवडीचे, नावडीचे नि निवडीचे स्वातंत्र्य, मुलांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा आदर आणि त्यांच्या भावनांची कदर या गोष्टी असतील तिथे मुले सहजपणे, शिकत जातात.

जिथे बक्षिसांची लालूच नाही, शिक्षांचे भय नाही, परीक्षांचे नि स्पर्धाचे ताण नाहीत, शिस्तीचा बडेजाव नाही, आणि मुलांच्या छोट्या छोट्या गरजांची उपेक्षा नाही तिथे विद्यार्थी उमलतात, फुलतात आणि आयुष्यभराची फलप्राप्ती करतात.

जिथे भाषेची विविध वळणे आत्मसात करायला मिळतात,

नवनवोन्मेषशाली कल्पनांचे पतंग आकाशात उडवायला मिळतात; जिथे विचारांच्या खोल सागरात मनसोक्त पोहायला मिळते, जिथे मित्र-मंडळींशी, त्यांच्या भाव-भावनांशी एकरूप व्हायला मिळते आणि जिथे आत्मसंयमाने आत्मसन्मान जोपासता येतो, तिथे शिकणे तर नैसर्गिक होतेच पण ते नेहमीच पुढल्या शतकभराची व्यक्तीची सारी तयारी करून ठेवते.

मुले शाळेत येतात ती स्वतःची शिकण्याची भूक भागविण्यासाठी. मुले शाळेत शिकतात ती उपजत स्वयंप्रेरणेने. मुले नवनवे ज्ञान अधाशासारखे आत्मसात करतात ते कायमस्वरूपी टिकणाऱ्या जिज्ञासेने. मुले निवड करीत जातात ते आपल्या विशिष्ट बुध्दिमत्तांच्या दिशेने आणि मुले निर्णय घेतात ते आत्मसामर्थ्य वाढविणारे. या साऱ्यांच्या संधीचा आपल्या शालेय वयात मुले सातत्याने शोध घेत असतात. त्यामुळे अशा विविधांगी संधी पुरविते ती शाळा, अशी शाळेची व्याख्या करता येईल.

- अशा संधीपूर्ण शाळांचा शोध पालकांनी घ्यावा.
- अशा संधीयुक्त शाळा निर्माण करण्याचा ध्यास शिक्षकांनी घ्यावा.
- अशा संधीदायी शाळेत आपल्या शाळेचे रुपांतर करण्याचा वसा संस्थाचालकांनी घ्यावा. आणि
- अशा संधीप्रधान शाळा निर्मितीसाठी व्यापक धोरण सरकारने आखावे.

**उद्याच्या जगासाठी नव्या दिशेने नवे शिक्षण नेण्याचा केवळ हाच मार्ग आहे**

या नव्या शिक्षणासाठी आधारभूत असलेले तत्त्वज्ञान प्रदर्शनाच्या सुरुवातीला मांडलेले होते. यात मेंदूशास्त्र, बहुविध बुद्धिमत्तेचा सिद्धांत, आकलनशास्त्र यांची मांडणी केली होती. आकलनशास्त्र म्हणजे मनाचे मेंदूचे शास्त्र, कोणत्याही गोष्टींचे आकलन होते म्हणजे नेमके काय होते, हे सांगणारे शास्त्र. या शास्त्राच्या जन्माअगोदर अनेक नवी संशोधने होत गेली आणि हीच संशोधने आकलनशास्त्राची पायाभरणी करून गेली. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात जर्मन मज्जाशास्त्रज्ञ गॉल यांनी मेंदू आणि मन हे वेगळे नसून एकच असल्याचा शोध लावला. फ्रेंच सर्जन ब्रोका यांनी मेंदूतल्या बोलण्याच्या केंद्राचा शोध लावला. मानसशास्त्रातही अनेकविध संशोधन होत गेले, आणि आकलनशास्त्राची पायाबांधणी होत गेली.

हे आकलनशास्त्र अर्थात कॉग्निटिव्ह सायन्स नव्या शिक्षणाचा आधार मानले जाते. आकलनशास्त्राची व्याख्या करायची झाली तर आकलनशास्त्र म्हणजे एखादी गोष्ट समजण्याचे किंवा माहिती असण्याचे शास्त्र आहे. मानवी मन आणि त्याची रचना आकलनशास्त्र पुढे आणते. ही रचना माहिती मिळविण्याचे, ती साठविण्याचे, ती हवी तेव्हा परत आठवण्याचे, तिच्यात बदल करण्याचे आणि ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवण्याचे काम करते. मिळालेल्या माहितीवर होणाऱ्या सोपस्कारांना माहिती प्रक्रिया किंवा गणन प्रक्रिया असे म्हणतात. मानवी मनाशी संबंधित या घटनांना माहिती प्रक्रियेच्या दृष्टिकोनातून बघणे, हाच शिक्षणातला नवा विचार म्हणता येईल. नेमका हाच दृष्टिकोन आकलनशास्त्र पुरवते आणि त्यायोगे ते शिक्षणाच्या दृष्टिने महत्त्वाचे शास्त्र आहे.

समजून घेण्याच्या, विचार करण्याच्या, शिकण्याच्या, भाषा समजून घेण्याच्या या प्रक्रियांचे ज्ञान होणे आणि त्याचबरोबर स्मरणप्रक्रिया समजून घेणे आणि इतर मानसिक स्थित्यंतरांचा अभ्यास करणे, हे आकलनशास्त्राचे कार्यक्षेत्र मानता येईल. आकलनशास्त्राचा आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन समजून घेणे, हे सुद्धा महत्त्वाचे आहे. कारण यामुळे सर्व शास्त्रे, शिक्षण आणि आकलनशास्त्र यांचा परस्परसंबंध समजून घेता येईल. मानसशास्त्र, मज्जाशास्त्र, तत्वज्ञान, मानववंशशास्त्र, भाषाशास्त्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या सहा विद्याशाखांच्या अनुषंगाने आकलनशास्त्राचा विचार करायला हवा.

मानसिक स्थित्यंतरे समजून घेणे, मानवी स्मृतीच्या मर्यादा ओळखणे, एखाद्या संकल्पनेला समजून घेणे, सर्जनशील विचार आणि भाषेचे सौंदर्य जाणणे या सगळ्यांबाबतचे विचार समजून घेताना मानसशास्त्र आणि आकलनशास्त्राचा परस्पर संबंध लक्षात येतो. कुठलीही गोष्ट लक्षात राहणे, समजणे, तीचे आकलन होणे, ती करता येणे म्हणजे नेमके काय होते, याबाबत समजून घेणे, म्हणजेच आकलनशास्त्राच्या भूमिकेतून मज्जाशास्त्राचा अभ्यास करणे.'मन आणि मेंदू यांचा संबंध का आणि कसा, वागण्यात, बोलण्यात, विचार करण्यात सजगता आणि जागरूकता कशी येते?' या प्रश्नांची उत्तरे तत्त्वज्ञान आणि आकलनशास्त्राच्या एकत्रित विचारातून मिळू शकतात.

मानवी मनाचा आणि पर्यायाने मानवी जातीच्या स्थित्यंतराचा आणि अमूर्त पातळीवरच्या मानवी सिध्दांताचा अभ्यास करताना आकलनविषयक मानववंशशास्त्राचा विचार करावा लागतो. आकलनविषयक भाषाशास्त्राबाबत बोलायचे झाले, तर भाषेसाठीच्या अनुकूल वातावरणाचा विचार त्यात केला जातो. भाषेची ओळख कशी ओते, भाषेची जाण कशी येते, शब्द-अक्षर-वाक्य-संवाद हा प्रवास नेमका कसा होतो, व्याकरण कसे येते, या सगळ्याचा शास्त्रीय उहापोह यामध्येच होतो.'कृत्रिम आणि मानवी बुध्दिमत्तेत साम्य काय? फरक काय? आणि त्यांचा परस्पर संबंध काय? या सगळ्याची उत्तरे आकलनविषयक कृत्रिम बुध्दिमत्ता अभ्यासताना लक्षात येतात.

एकूण काय, तर आकलनशास्त्र ही व्यापक संकल्पना आहे आणि मानवी शिक्षणाशी निगडित सगळ्याच मूलभूत शास्त्रांशी तिचा अगदी जवळचा संबंध आहे.

प्रत्येक शास्त्राचे उत्तम आकलन होणे आणि त्यांची व्यावहारिक पातळीवरची उपयुक्तता समजणे म्हणजे उत्तम शिक्षण मानले तर आकलनशास्त्राला नव्या शिक्षणाचा पाया मानलाच पाहिजे. यापुढे रचनावादी शिक्षणाची सारी तत्त्वे मांडलेली होती.

**रचनावादी शिक्षण म्हणजे काय?**

- रचनावादी शिक्षण म्हणजे असे शिक्षण की ज्यात,
- मुले-मुली स्वतःचे स्वतःच शिकतात.
- स्वतःच्या प्रेरणेने व आपल्या आवडी-निवडींनी शिकतात.
- अनेक प्रकारचे अनुभव घेऊन शिकतात.
- सतत काहीतरी करत करतच शिकतात.
- मुले - मुली एकमेकांची मदत घेत घेत शिकतात.

**शालेय वर्गामध्ये रचनावाद कसा आणावा ?**

- वर्गातील शिक्षणात 'शिकविण्याकडून' शिकण्याकडे जायचे आहे.
- आता विद्यार्थ्यांना सारखे शिकवत बसायचे नाही. त्यांना शिकण्यास प्रवृत्त करायचे आहे. त्यांना आपणहून शिकू द्यायचे आहे. त्यांच्या शिकण्यास शिक्षकांनी मदत करायची आहे.
- वर्गातील व शाळेतील सर्व रचना, व्यवस्था आणि वातावरण हे विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या अंगांनी तयार करायचे आहे. यालाच 'विद्यार्थीकेंद्री' शिक्षणव्यवस्था असे म्हणतात.
- वर्गातील शिक्षण 'पुस्तकी अभ्यासाकडून' वास्तव अनुभवांकडे वळवायचे आहे.
- वर्गात विद्यार्थ्यांना 'शिकण्या'ची संधी देणे याचा अर्थ त्यांना विविध, वास्तव आणि गुंतागुंतीच्या अनुभवांना भिडू देणे होय.
- जेवढे आणि जे अनुभव वर्गाच्या मर्यादेत घेता येतील तेवढे घेऊ द्यावेत. इतर अनुभवांसाठी विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर न्यावे. निसर्गातील व मानवी जीवनातील शक्य त्या वास्तव अनुभवांना विद्यार्थी सामोरे जातील.
- या प्रकारच्या शिक्षणालाच अनुभवाधारित शिक्षण असे म्हणता येईल.
- विद्यार्थ्यांना, प्रत्येक अभ्यासघटकाचा शोध क्रमिक पुस्तकांच्या पलीकडे जाऊन घ्यायचा आहे.
- हा शोध कधी एकट्याने, कधी दोघांनी, कधी छोट्या गटात तर कधी मोठ्या गटात बसून, इतरांच्या समवेत घ्यायचा आहे. त्यासाठी अभ्यासघटकांची मुक्त मांडणी करणे आणि विद्यार्थ्यांना स्वतः पुढाकार घेण्यास, स्वतः सहभागी होण्यास, शिक्षकांनी उद्युक्त करायचे आहे.
- हे विद्यार्थ्यांचे स्वयंअध्ययन असते.

याप्रकारे, प्रत्यक्ष वर्गाच्या पातळीवर रचनावाद कसा आणता येतो, याची मांडणी पुढील दालनांमध्ये केलेली होती. यात भाषा, गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, कलानुभव अशी विषयवार रचना केलेली होती. तसेच लर्निंग होम, हॉबी होम, शास्त्रालय, विकासघर असे ग्राममंगलच्या कार्याचे अनेक नमुने मांडलेले होते.

पुण्यामध्ये ग्राममंगलचा 'लर्निंग होम' हा अभिनव शैक्षणिक प्रयोग चालतो. या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे या लर्निंग होमची मुले हे सारे प्रदर्शन, विषयांतील उपक्रम समजून देत होती. त्यांच्यातील आत्मविश्वास हे या रचनावादी पध्दतीचे साध्य म्हणता येईल.

---

*लहान वयात, खेळ ही मानवी विकासातील एकमेव अभिव्यक्ती असते;*
*कारण त्यानेच फक्त बालकाच्या आत्म्यातील गोष्टींचा उलगडा होतो.*

**फ्रेडरिक फ्रोबेल**

शिक्षणवेधमधून सद्यकालीन शिक्षण प्रक्रियेबद्दल आपण वैचारिक चर्चा घडवून आणतच आहोत. परंतु प्राचीन काळात ज्यावेळी औपचारिक शिक्षण पद्धतीचा आरंभ झाला. त्यावेळीच शिक्षणपद्धती कशी होती हे सांगणारी, मनोरंजक पण बोधप्रद अशी ही लेखमाला...

सुनित पोतनीस

# रोमराज्यातील शिक्षण व्यवस्था

▶▶

रोमन राज्याच्या स्थापने पासून म्हणजे इ.स.पूर्व ७५३ पासून इ.स.पूर्व तिसऱ्या शतकाच्या मध्यापर्यंत रोममध्ये शिक्षण पध्दतीत विशेष नांव घेण्यासारखे काही नव्हते. शिक्षणासाठी शाळा नव्हत्या. पालकच लहान मुलांना घरच्या घरी खेळांतून काही शिक्षण देत. मुले थोडी मोठी झाली की, वडिलांचा व्यवसाय, शेती यात त्यांना गुंतवून दैनंदिन गरजा भागविण्याचा मार्ग शिकवीत. ते फक्त जीवनासाठी मूलभूत गरजा मिटविण्याशिवाय एकसंघ समाजात राहण्याचे नीतीनियम सुध्दा त्यांना शिकवीत असत.

रोममध्ये पहिल्या शाळा इ.स.पूर्व चवथ्या शतकात सुरू झाल्या. मूळ रोमन म्हणजेच फ्लेबियन वर्गाकडे राजकीय सत्ता आल्यावर या शाळा सुरू झाल्या. त्या शाळांना 'लुडस्' म्हणत. लॅटीन शब्द लुडस् म्हणजे खेळ. यावरून हे नाव पडले. म्हणजेच अलीकडचे 'प्ले ग्रुप'. लहान मुलांना शिक्षण देण्यासाठी इ.स.पूर्व तिसऱ्या शतकाच्या उत्तरार्धात ग्रीस मधील एक मुक्त गुलाम स्पुरियस कार्व्हिलियस याने प्रथम विद्यावेतन (फी) घेऊन लुडस् सुरू केले. तिथून पुढे शिक्षण हा व्यवसाय सुरू झाला. ग्रीक संस्कृतीचा मोठा परिणाम रोमन संस्कृती आणि शिक्षण पध्दतीवर झाला. अगदी थोड्या शतकांच्या अवधीतच पूर्वी जी पारंपारिक शिक्षण पध्दती रोम मध्ये चालू होती त्यातून प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण अशा विविध पातळ्यांवरील शिक्षण सुरू झाले. पुढे रोम हे प्रबळ साम्राज्य झाल्यावर रोममध्ये जी शिक्षण पद्धती स्थिर झाली,

तीच पध्दती रोमन साम्राज्यातील इतर देशांत स्वीकारली गेली. रोम मधील शिक्षण पध्दतीचा परिणाम पुढे सर्व पाश्चिमात्य संस्कृतीवर झालेला दिसतो.

लुडस् या शाळा म्हणजे पडदे लावून बनविलेली एक खोली असे. सुर्योदयाला शाळा उघडून सुर्यास्ताला त्या बंद होत. मुले, मुली बारा वर्षांचे होईपर्यंत लुडस् मध्ये शिकत. लिहीणे, वाचणे, ॲबॅकसच्या सहाय्याने गणित आणि समाजात वापरायचे नीतीनियम या शाळांमध्ये शिकवीत. लिहिण्यासाठी मेणपाट्या व स्टीलसचा उपयोग करीत. मुलांना लिहिता येऊ लागल्यावर पपायरस वनस्पती पासून बनविलेल्या कागदावर डिंक व काजळी पासून बनविलेल्या शाईने लिहावयास देत. बाराव्या वर्षी प्राथमिक शिक्षण




संपल्यावर, पुढील शिक्षण घेण्यास मुलींना परवानगी नव्हती. कारण, त्या काळात मुलींचे लग्न बाराव्या वर्षी, तर मुलांचे चवदाव्या वर्षी होई. लुडस् मधील शिक्षकाला 'लिटरेटर' असे म्हणत. तो स्वतःची शाळा चालवू शकत होता. लिडस् या शाळा रस्ते, बागा, व्यायामशाळात कुठेही भरत. बाराव्या वर्षानंतर मुले 'लिटरेटर' कडचे शिक्षण संपवून 'ग्रॅमॅटीक्स' या शिक्षकाकडे पुढचे शिक्षण घेत. 'ग्रॅमॅटीक्स'कडे विद्यार्थी काव्यशास्त्र, वक्तृत्त्व, ग्रीक भाषा शिकत. मुलांना ग्रीक व लॅटीन भाषेत शिकवीत. गरीब मुले मात्र हे शिक्षण घेऊ शकत नसल्याने, कुठल्यातरी व्यवसायात उमेदवारी करीत. लिव्हीयस अँड्रानिक्स हा ग्रीसच्या टॅरॅंटम येथील विक्री झालेला गुलाम रोमच्या उमरावाकडे ट्यूटर म्हणून नोकरीस लागला. मुक्त झाल्यावर त्याने रोममध्येच राहून खाजगी ग्रॅमॅटीकसचा पेशा स्वीकारला. त्याने ग्रीक महाकवी होमरच्या ऑडिसी या महाकाव्याचे लॅटीनमध्ये भाषांतर केले. तो ग्रीक भाषेत शिकवीत असे. प्रसिध्द ग्रॅमॅटीक्स ल्युसियस प्युपिलस हा गुलाम मुलांना वेळप्रसंगी मारीत असे. चवदा पंधराव्या वर्षानंतर श्रीमंत मुले वादविवाद, जाहीर वक्तृत्त्व हे विषय ऱ्हेटॉर कडे शिकत. ते शिकताना त्यांना भूगोल, तत्त्वज्ञान, भूमिती, संगीत शिकावे लागत असे. रोमन इतिहासात नेहमी राजकीय उलाढाली चाललेल्या असत. त्यामुळे जाहीर वक्त्यांची प्रवक्ते म्हणून आवश्यकता भासत असे. त्यातले काहीजण वकील, भाषांतर तज्ञ किंवा राजकारणात भाग घेत असत. वक्ते दोन प्रकारचे असत. कोर्ट कचेरीच्या कामात असणारे व दुसरे म्हणजे सिनेटरला उपयोगी पडणारे. त्याही पुढचे उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्याला ग्रीस मध्ये एखाद्या तत्त्वज्ञाकडे जावे लागत असे. संगीताने व्यक्ती विचार संपन्न बनते, हा विचार ग्रीकांचा होता. पण रोमन लोकांना तो प्रथम पटला नव्हता. ग्रीकांना व्यायाम हा आरोग्यवान, सुंदर शरीरासाठी आवश्यक वाटे, तर रोमन लोकांना व्यायाम हा चांगले सैनिक व योध्दे बनण्यासाठी आवश्यक वाटत असे.

‘कले’ला जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कला ही जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी व पूर्णत्वाकडे नेणारी प्रक्रिया आहे. जीवनाकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन कलेमुळे प्राप्त होतो. प्रत्येक मानव हा वैशिष्ट्यपूर्ण असून त्याच्या ठिकाणी सर्जनशीलता आहे, हाच सर्व कलांचा मूलभूत सिद्धांत आहे. नवनिर्मिती व सौंदर्योपासना यामुळे व्यक्तीजीवनाला दिव्यत्व प्राप्त होते. कलेच्या वैशिष्ट्यांसह कलाशिक्षणाचे महत्त्व सांगणारे कला शिक्षणाची तोंडओळख करून देणारे सदर.

उर्मिला मराठे

# संगीत : आनंददायी कला

▶▶

कोणत्याही कलेचं उगमस्थान किंवा उद्दिष्ट हे मुख्यतः दैनंदिन ताणतणावातून विरंगुळा मिळवण्याचं साधन, असं आहे. अगदी संगीत, नृत्य, नाट्य इथपासून ते प्राचीन शिल्पकला, मातीकाम, धातूकाम वगैरेपर्यंत आपण गेलो; तर त्यातून आनंद मिळवणे, कलेचा आस्वाद घेणे, हे मुख्य उद्दिष्ट आहे. ती कला शिकता शिकता जेव्हा एखादा त्यात पारंगत होतो; तेव्हा मग कला हे स्वतःला व्यक्त करण्यासाठीचं माध्यम म्हणून ती व्यक्ती वापरते. चित्रकला शिकताना कुंचल्यातील फटकाऱ्यातून व्यक्त होणाऱ्या विविध रुपांचा अभ्यास करत करत अखेर एखादा चित्रकार त्याच्या मनातील भावभावनांना मूर्त स्वरुप देण्यासाठी एखादी कलाकृती तयार करतो.

संगीत ही देखील माणसाला मिळालेली एक दैवी देणगीच आहे. निसर्गातसुद्धा सातत्याने आढळणारे संगीत म्हणजे धबधब्याचा घोंड घोंड आवाज, पावसाची टप टप, पानांची सळसळ हे सर्व अनुभवत, त्यातूनच मानवनिर्मित संगीताची सुरुवात झाली असावी. म्हणजेच, माणसाच्या आवाजाची रेंज ठरवून, त्यात बसणारे ठराविक स्वर व त्या आधारावर तयार झालेली सुरावट म्हणजेच संगीत, असं मला वाटतं.

कोणतीही कला शिकताना कानसेन ते तानसेन हा प्रवास खडतर असतो. त्यात त्या कलाकारांचा नित्यनियमित अभ्यास तर असतोच; पण वेळोवेळी मिळालेलं गुरुच मार्गदर्शन खूप मोलाचं ठरतं.

शंभरातला एखादाच असतो, ज्याला त्या कलेबद्दल एवढी ओढ असते, तीव्र इच्छाशक्ती, असते त्यामुळे त्या कलेसाठी आवश्यक ती साधना त्याच्याकडून सहज केली जाते. गुरुंचा हात पाठीवर असल्यावर असे कलाकार उच्च पातळी गाठायला वेळ घेत नाहीत.

असे कलाकार वगळता इतर सर्वांसाठी कला ही आनंद घेण्याचं, विरंगुळ्याचं एक साधन असतं. उपजतच एखादी कला अवगत असली, तरी त्याला पोषक वातावरण मिळालं तरच ती अधिक खुलते. संगीत म्हंटलं की, अधिकांश लोकांकडून कंठसंगीत एवढाच संबंध लावला जातो. फार तर फार, वाद्यसंगीत; पण 'सवाई गंधर्व' सारख्या महोत्सवात बघितलं की, जाणवतं की, संगीत कलेचा आस्वाद सर्वसामान्यांना घेता यावा; यासाठीचा हा स्तुत्य उपक्रम आहे. संगीत कला शिकताना पारंपरिक पद्धतीत कंठसंगीताचं शिक्षण दिलं जातं, अशावेळी, मुलांचा कल कसा आहे? हे ओळखणं खूप महत्त्वाचं ठरतं. त्यामध्ये मुलांच्या कलाने, हसत-खेळत खूप वेळ घेता येतात.



पेटीवर एक सूर धरला तर त्या सुरात साऽऽऽ म्हणायचा, असा खेळ घेतला की त्यातून एकाग्रता, श्रवण, संगीताची समज आणि कंठसंगीत असे विविध पैलू लक्षात येतात. इतर कोणीतरी ह्याचे मूल्यमापन करण्यापेक्षा मूल स्वतःच हे ताडू शकतं, की सूर कधी बरोबर लागला; कधी चुकला. जरी प्रत्येकाला उत्तम गाता आलं नाही; तरी हे तारतम्य उपजत असतं. अशाचप्रकारे, तालाशी संबंधीत खेळातून हे ओळखता येतं की लय, ताल याची किती जाण मुलाला आहे. खरं तर लयीचा संबंध तार्किक क्षमतेशी असतो. त्यामुळे अशा खेळातून मुलाची तार्किक क्षमता देखील कळते. ५ टाळ्यांचे वेगवेगळे पॅटर्न तयार करणे, हा असाच एक खेळ मुलांना खूप आवडतो. लयीशी संबंधीत अनेक अनुभव या खेळातून मुलांना देता येतात. अशा खेळातून मुलं तालाचा, लयीचा आनंद घ्यायला शिकतात. आणि एक प्रकारे संगीताशी जोडली जातात. ज्याला संगीताची उपजत जाण आहे, शिकण्याची तीव्र इच्छा आहे, तो पारंपरिक शिक्षणपद्धतीतून संगीत शिक्षण घेतोच. पण, फारच थोड्या मुलांना हे लहान वयातच समजतं की, मला गाणं म्हणणं, ऐकणं, वाद्य वाजवणं आवडतं. व त्यातूनही कमी मुलं, पालक हे निश्चितपणे सांगू शकतात. अशावेळी, विविध खेळातून, खुल्या माध्यमातून, शालेय उपक्रमातून जर, संगीत लहान मुलांपर्यंत पोचलं, तर ते संगीताचा आस्वाद घ्यायला नक्कीच शिकतील. गाता आलं नाही, वाद्यावर जरी हात सराईतपणे फिरला नाही, तरीही त्याचा आनंद मुलं घेऊ शकतील. पूर्वीच्या काळी पारंपरिक संगीत शिक्षणातून शारीरिक बैठक, मानसिक स्थिरता, एकाग्रता हे गुण जोपासले जात. कारण त्याशिवाय गुरुमुखी विद्या मिळत नसे. आजही संगीत शिक्षणातून हे गुण जोपासले जाऊ शकतात. संगीत शिकता शिकता बरोबरीने शारीरिक बैठक, मनाची स्थिरता, शांतता, ओमकार, ध्यान, स्वराचा अभ्यास (यातून होणारा स्वरयंत्राचा विकास), याचाही अभ्यास होतो, आणि साहजिक त्या क्षमतांचा विकास होतो. संगीतात फक्त शब्दांची समजच शब्दात नव्हे तर पूर्णार्थानी त्या वाक्याचा, गीताचा, कवितेचा अर्थ समजणे, हे खूप महत्त्वाचं ठरतं. त्यादृष्टीने, मुलाचा भाषिक विकास कसा झाला आहे, आणि पुढे कसा होईल, या दोन्ही गोष्टी संगीताशी जोडता येतात. शब्दाचा अर्थ समजणे, शब्दांची रचना समजणे, पर्यायी शब्द निवडता येणे, दिलेल्या शब्दांपासून काव्य तयार करता येणे, असे सर्व पैलू संगीतात येतात.

ग्राममंगल संस्थेच्या 'लर्निंग होम' या शाळेत अशाच प्रकारे संगीताचा उपक्रम राबवला जातो. गेल्या वर्षभरात घेतलेल्या विविध खेळांतून मुलांपर्यंत 'संगीत' पोचवण्याचा प्रयत्न होतो. अनुभव असा आहे की, ज्यांना घरून अथवा उपजत गाण्याची अभिव्यक्ती नसते; अशी मुलंदेखील उत्साहाने सहभागी होतात. गाणं ऐकताना लयीवर उड्या मारतात, मान हलवतात, ह्या सर्व गोष्टी हेच दाखवतात की, ती मुलं लयीचा आनंद घेतात. आपला सूर बरोबर लागला आहे की नाही, हे स्वतःच तपासून बघतात. ताशा, ढोलकी, पेटी, खंजिरी, टाळ यांसारखी वाद्ये स्वतःहून हाताळून बघतात.

||पुस्तक परीक्षण||




डॉ. अपर्णा कुलकर्णी

# सजग पालकत्वाच्या दिशेने

▶▶

आजच्या बदलत्या, गतिमान युगात मुलांचे उत्कृष्ट संगोपन करणं, यासाठी पालकांना कायम सजग राहावं लागतं. खरंतर पालकत्व हे कोणत्याही काळातील म्हटले, तरी पालक आणि मूल यांच्यातील पिढीचे अंतर कायम असतेच. त्यामुळे त्या-त्या वेळाचे पालकत्व हे त्यादृष्टीने आव्हानात्मकच म्हणायला हवे. मात्र, तरीसुद्धा एकविसाव्या शतकातील पालकत्वाचा विचार करता, हे आव्हान अधिकच कठीण आणि दिवसेंदिवस गुंतागुंतीचे होत जाते आहे, असे लक्षात येते.

आपलं मूल पहिल्यापासूनच तरतरीत, प्रसन्न, सर्वांना आवडणारं, हुशार, अत्यंत यशस्वी असावं, असं प्रत्येकालाच वाटतं. पालकांच्या मुलांप्रती, मुलांच्या पालकांप्रती वेगवेगळ्या अपेक्षा असतात. या सगळ्याची गुंतागुंत झाली की, हाती काहीच लागत नाही, असे लक्षात येते. सभोवतालचं जग झपाट्याने बदलत आहे. त्याच्याशी जुळवून घेत मुलांचे योग्य संगोपन करायचे, म्हणजे पालकांचीही तारेवरची कसरत आहे. मुलांचे शारीरिक आरोग्य, त्यांच्या सवयी, अभ्यास, शाळेचे वेळापत्रक, खेळ व मनोरंजन इत्यादी अनेक बाजूंनी त्यांच्यासाठी विचारपूर्वक

आणि निश्चयी पावलं पालकांना उचलावी लागतात. कधीकधी या सगळ्या प्रवासात काही चूका होतात, काही त्रृटी राहून जातात. नेमके कसे वागावे म्हणजे मूल आपले ऐकेल, असे प्रश्नही वारंवार पडतात. मुले वाढविताना त्यांच्या वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर विविध प्रश्न समोर येतात. पालकांच्या पुढ्यातील या साऱ्या प्रश्नांची उत्तरे देणारे, पुरस्कारप्राप्त पुस्तक म्हणजे '१० लॉज् ऑफ लर्निंग'. अर्थात, मुलांना यशस्वी बनविण्यासाठीची दशसूत्री'. या पुस्तकाचे लेखक आहेत स्टीव्हन रुडॉल्फ. अश्विनी लाटकर यांनी त्याचा अनुवाद केला आहे. मराठीतील हे अनुवादित पुस्तक अमेय प्रकाशनाने प्रकाशित केले आहे.

नुकत्याच या पुस्तकाला 'कुमुद बन्सल पुरस्कारा'ने गौरविण्यातही आले आहे.

**१० लॉज् ऑफ लर्निंग**

**स्टीव्हन रुडॉल्फ**

**अनुवाद : अश्विनी लाटकर**

स्टीव्हन रुडॉल्फ यांनी या पुस्तकात, पालकांनी मुलांना वाढविताना कोणत्याप्रकारे मार्ग चोखाळावा, यासाठी मार्गदर्शक ठरतील, अशा १० नियमांची ओळख करून दिली आहे. हे दहा नियम आणि त्याअंतर्गत दिलेली माहिती, सूचक टीप्स आणि अत्यंत सुटसुटीत, साधी रचना, यांमुळे हे पुस्तक वाचताना कोठेही कंटाळवाणे होत नाही. मुख्य म्हणजे, या पुस्तकातील कोणतेही पान काढून तुम्ही वाचू शकता, अशी त्याची मांडणी आहे. पुस्तकात जागोजागी स्टीव्हनने 'हे लक्षात ठेवा' आणि 'केस स्टडी' हे मुद्दे घालून; पालकांना, त्यांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे सहजपणे गवसतील, अशी सोय करून ठेवली आहे. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी (नियमाच्या शेवटी) त्याचा गोषवारा थोडक्यात मांडला आहे. मुलांना स्वतःची काळजी घ्यायला शिकवणे, स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवणे, स्वतःचा शोध घ्यायला आणि शोधक वृत्ती जोपासायला शिकवणे, खेळायचे कसे व खेळाचे नियम पाळायचे कसे, आपले ध्येय कसे ठरवायचे, नियोजन कसे करायचे इत्यादी, अशा महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर यामध्ये चर्चा केली आहे. पुस्तकात शेवटी, पालकांना हमखास पडणाऱ्या पंचवीस प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. एकूणच, पालकांसाठी व मुलांच्या उत्तम संगोपनासाठी मार्गदर्शक ठरावे, असे हे पुस्तक आहे.

रुडॉल्फ हे मुळचे अमेरिकन असले, तरी त्यांचे वास्तव्य भारतात आहे. ते शिक्षणतज्ज्ञ, संशोधक व वक्ते म्हणून नावाजलेले आहेत. त्याचप्रमाणे, शिक्षणक्षेत्रातील त्यांचा अनुभव प्रदिर्घ आहे. पालकत्वासंबंधित आणि जीवनकौशल्यांवरील कार्यशाळा ते भारतभर घेतात. मुलांना योग्य आरोग्यविषयक सवयी, आहारविषयक सवयी कशा लावाव्यात, स्वतः पालकांनी त्यासाठी स्वतःच्या सवयींना कशी मुरड घालावी, मुलांमध्ये निर्णयक्षमता कशी विकसित करावी, येथपासून ते मुलांना व्यवहारज्ञान कसे शिकवावे, त्यांचा अभ्यास/शिकणे सहजसोपे कसे करावे, त्यांच्यातील सुप्त गुण कसे ओळखावेत, इत्यादी, अशा अनेक आवश्यक मुद्द्यांचा यामध्ये समावेश आहे. मनातील प्रश्नांची संख्या वाढत असता या पुस्तकाचा आधार पालकांना निश्चितच दिलासा देऊ शकेल. प्रत्येक मूल वेगळं, असं आपण म्हणतो; तसंच प्रत्येकाचा पालकत्वाचा अनुभव वेगळा. मुलांची संगोपनाची पद्धत ज्याची-त्याची अनुभवानुसार ज्याने-त्याने ठरविलेली असते. हे सगळे जरी खरे असले, तरी या पुस्तकातील दहा नियम व त्यातील उदाहरणे पालक असणाऱ्या सर्वांनाच मार्गदर्शक आहेत. त्यामुळे आई-बाबा असणाऱ्यांनी आणि मुलांशी संबंध येणाऱ्या शिक्षक, आजी-आजोबा इत्यादी सर्वांनीच वाचावे असे हे पुस्तक आहे.

आसावरी गुपचूप

# संवेदनशीलता वाढवा

▶▶



आपल्या बाळाच्या जन्मापासून प्रत्येक क्षण आपण पालक असतो. आपल्या ओझ्यानिशी पालक असतो. या दरम्यान आपण अनेक चुका करून बसतो. कित्येक वेळा, आपण आपलं सर्वस्व पणाला लावून, ही पालकत्वाची जणू काही लढाईच खेळत असतो.

आपण काही प्रसंग पाहू. स्थळ : बाजार, वेळ संध्याकाळचे सहा, आपल्या दोन्ही हातात पिशव्या, गर्दी, सोबत पाच-सहा वर्षांचं मूल. आई आणि मुलाचा संवाद.

**मूल :** आई वेफर्स घेना.

**आई :** आत्ता नाही. कालच हॉटेलमध्ये गेलो होतो ना?

**मूल :** घेऊ ना. मग पुढचा आठवडाभर काहा मागणार नाहा.

**आई :** पुढचा आठडाभर तसंही मागायचं नाहीच आहे, गेल्या आठवड्यात तू दोनदा नूडल्स खाल्ली आहेत.

**मूल :** ए आई, तू चिटींग करतेस हं! प्रणवच्या घरी गेलो होतो, तेव्हा त्याच्या आईने दिली. मी मागितली नव्हती.

**आई :** पण दोन वेळा पोटात गेली ना? आत्ता असलं काही मिळणार नाहीये. घरी स्ट्रॉबेरीज आणल्या आहेत. त्या खा हवं तर.

**मूल :** तू काहीच मस्त आणत नाहीस.

**आई :** (आता मात्र आईचा संयम सुटतो ), बरं.

**मूल :** (हात पाय आपटत) बरं काय? तू नेहमीच असं करतेस.

या प्रसंगाचा शेवट काय होतो हे महत्वाचे नाही. कधी याचा निकाल मुलाच्या बाजूने लागतो, तर कधी आईच्या बाजूने लागतो. कधी वाद वाढत जातो, तर कधी थोडक्यात आटोपतो. कधी तह होतो, तर कधी बिनशर्त माघार. या प्रसंगामधल्या वेफर्सची जागा कधी टीव्ही घेतो, कधी व्हिडीओ गेम्स तर कधी मोबाईल. चाल मात्र हीच, अशीच. आता या प्रसंगामधील आईने/बाबांनी कसं वागावं? त्या मुलाशी रागावून बोलावं? समजावावं? मारावं? इथे पालकाचा मूळ हेतू अगदी प्रेमळ आहे. मुलानी चंगळवादाच्या आहारी जाऊ नये. सकस खावं, पाहावं आणि अनुभवावं. मात्र, हे मुलाच्या गळी उतरवणं महामुष्कील. पालकत्वामध्ये असे प्रसंग येणं, हे अपरिहार्य आणि अटळ आहे. आपण पूर्वीच्या लेखांमध्ये बघितलं तसं; या सर्वांमध्ये आपलं स्वत:च आयुष्य, आपला आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन, हे सर्वात महत्वाचे. त्यावर प्रत्येक क्षणाला काम हे व्हावेच लागते. मात्र त्याबरोबरीने हेही खरे आहे, की हे लहान सहान दिसणारे संघर्ष त्या क्षणासाठी खूप मोठे भासतात. दोन्ही पक्षांकडून अतिशय ताण बसायला सुरूवात होते. आणि अशा ताणांचे प्रमाण वाढू लागले, की हळूहळू पालक आणि मूल हा संबंधच तणावपूर्ण होऊ लागतो.

आपल्याला माहीत असते, की आपल्या मुलावर आपले प्रेम आहे. परंतु मुलांपर्यंत ते पोहोचेनासे होते. इतकेच काय, पण कधी कधी आपल्यालाही त्याचा विसर पडू लागतो. विशेषत: वयात येणारी मुले घरात असतील, तर मुलांकडून पालकांवर रागाच्या भरात होणारे जे आरोप असतात, ते बरेचदा मनावर गंभीर ओरखडा आणणारे असतात. जसा पालक म्हणून उमटलेला असतो. तसाच एक व्यक्ती म्हणूनही उमटलेला असतो, त्याची वेदना अगदी खरी असते.

अशावेळी, आपल्याला झालेले दु:ख कधी रागाच्या, कधी निराशेच्या, तर कधी अलिप्तपणाच्या माध्यमातून व्यक्त होते. हा राग, निराशा, अलिप्तपणा, ही प्रतिक्रिया असते, मुळातल्या दु:खाची. आपण गेल्यावेळी पाहिले, तशी पहिली पायरी म्हणजे, वाईट वाटले, तर मी रागावू शकेन, जोरात ओरडू शकेन, रडू शकेन. शांतपणे चेहऱ्यावर काहीच न दाखवता बोलू शकेन. यांपैकी कोणतीही प्रतिक्रिया देण्याचे स्वातंत्र्य (हा शब्द मुद्दाम वापरला आहे.) मला आहे.

मग दोन गोष्टी उरतात. एक म्हणजे, मी एखादी प्रतिक्रिया निवडली, तर ती चूक की बरोबर हे कसं ठरवायचं? आणि दुसरं म्हणजे, कोणतीही प्रतिक्रिया दिलेली असली, तरी 'मला वाईट वाटलं' या भावनेचं काय करायचं?

तर कोणती प्रतिक्रिया बरोबर?- जर अशा 'बरोबर' आणि 'चूक' प्रतिक्रियांचा फार्म्युला आपल्याकडे असता, तर सगळेच फार सोपे झाले असते. गंमत अशी असते की, अनेक वेळा आपण आपल्या मनात एक 'बरोबर प्रतिक्रिया' किंवा 'आदर्श प्रतिक्रिया' ठरवून ठेवलेली असते. आणि आपल्या मनात आपल्याला सतत 'बरोबर-चूक' च्या पारड्यामध्ये तोलणारा एक न्यायाधीश आपणच नेमलेला असतो.मुलाबरोबर बोलताना जरा आवाज चढला की, तो न्यायाधीश वटारतोच डोळे. त्याच्या धाकात राहायला लागल्यावर आपण भीतीमुक्त जगणंच विसरतो.

पालक झाल्यावर सर्वात मोठी गोष्ट आपल्याला काय शिकावी लागते, तर स्वतःला क्षमा करणे. स्वतःला क्षमा केली तर-आणि तरच-आपण इतरांना-आपल्या मुलांना क्षमा करू शकतो. आपण आपल्या कळत-नकळत आपल्या मुलांच्या बाबतीत अनेक चुका करत असतो. एखाद्या क्षणी झालेली चूक सतत

आपल्याला छळत राहते, आणि मग आपण स्वतःला अजूनच टोचू लागतो. जागरूक असणं आणि सतत स्वतःवर टीका करणं यात फरक आहे. आपल्या टीका करण्यामधून आपण सतत स्वतःला हेच सांगत असतो की, तू चांगला/चांगली पालक नाहीस. जेव्हा आपल्याला वाटते की, आपण चांगले पालक नाही, किंवा जेव्हा आपल्याला वाटते, की आपण अगदी आदर्श पालक आहोत, या दोन्ही वेळेला आपण 'चांगले पालक' मध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवायला जात असतो.

मुळात पालकांमध्ये चांगले आणि वाईट असे गट असतात का? जी आई किंवा जो बाबा मुलाला बेदम मारतात, त्यांच्यावर 'वाईट पालक' असं लेबल लावता येईल का? अर्थातच, याचा अर्थ असा अजिबातच नाही, की मुलाला मारणे, अपमानास्पद बोलणे, कोंडणे हे सर्व समर्थनीय आहे. मुळीच नाही. माझे म्हणणे एवढेच आहे, की अशा प्रकारचा संघर्ष, अशा प्रकारची चूक आपल्या हातून झाली, तर त्या चुकीत अडकून पडू नये. स्वतःला दूषणे देऊ नयेत. व सर्वात महत्त्वाचे, म्हणजे पुन्हा तशी वेळ आल्यावर जागरूक राहण्याचा प्रयत्न करावा. प्रत्येक संघर्षानंतर पुन्हा नव्याने सुरू करण्याची, नातं जोडण्याची सुरूवात करावी. विचारांत, दूषणांत गुरफटून जाऊ नये. नातं नव्याने जोडण्यासाठी आपण स्वतः प्रत्येक क्षणी नवीन होण्याची आवश्यकता असते. मघाशी म्हटले, त्याप्रमाणे दुःख वाटलेले असते. ओरखडा उमटलेला असतो. त्या दुःखाचे काय करायचे? आपण पूर्वीच्या लेखांमध्ये पाहिले आहे, तसे ते दुःख खूप जुने असणेही शक्य असते. परंतु नवे/जुने कोणतेही दुःख हे छळतेच.

असं म्हणतात की, कोणत्याही दुःखाचं सर्वात मोठं मूळ हे isolation मध्ये - एकटं असण्यामध्ये आहे. आणि एकटं असण्याचं एक प्रमुख कारण म्हणजे, आपल्या मनात बसलेले न्यायाधीश.

जो न्यायाधीश आपल्या मनात बसून आपल्याला टोचतो, तोच बाकी सर्व जगालाही टोचत असतो. आपण समाज म्हणून नातेवाईक म्हणून - इतकंच काय, तर कुटुंब म्हणून सुध्दा एकमेकांवर इतकी टीका करत असतो, की टीका केल्या आणि घेतल्याशिवाय आपल्याला जगण्याची कल्पनाही करता येत नाही.

ही टीका आपल्या इतकी नसांनसांत भिनलेली असते, की श्रीमंत माणूस गरीबावर टीका करतो. बाई पुरूषावर टीका करते, शिक्षक पालकांवर टीका करतो. सतत कोणीतरी बरोबर आणि कोणीतरी चूक, असं आपल्याला हवं असतं. आपल्याला वाटतं की, आपण सगळे मिळून एक शर्यत लावली आहे. त्यामुळे कोणाचं तरी पुढे जाणं, आपल्याला भाग असतं.

पण नीट पाहिलं, तर प्रत्येकाची स्वतःशीच वेगळी, स्वतंत्र शर्यत असते. आपण एकमेकांचे प्रतिस्पर्धी मुळीच नसतो. पाण्यात पोहणारा मासा, जमिनीवर चालणारा प्राणी आणि आकाशात उडणारा पक्षी यांची कधी आपसात शर्यत लागू शकते का? या प्रत्येकाचे वेगवेगळे प्रवास आहेत. पाण्यात पोहणारा मासा त्याच्या समस्येवर जो तोडगा काढेल, तो प्राण्याला आणि पक्ष्याला मुळीच लागू पडणार नाही. त्यामुळे आपल्या आतल्या न्यायाधीशाने, जर प्रेमळ मार्गदर्शक बनायचे ठरवले, तर एकटे पडण्याचे प्रमाण खूप कमी होईल. माझाच/माझीच मुलगा/मुलगी असा/अशी का? याचं उत्तर-हा तुझा प्रवास आहे. मात्र तुझ्या या प्रवासात तुला जसे खाचा-खळगे जाणवतात, तसेच मलाही माझ्या प्रवासात जाणवतात. जशी मी त्यातून काही ना काही चुकत-माकत मार्ग काढते, तसाच तूही काढशीलच. आणि म्हणूनच तुझ्या सामर्थ्यावर माझा विश्वास आहे, आणि तुझं दुःख कळण्याइतकं माझं मन संवेदनाशील आहे. हे दुःख पूर्ण नाहीसं होत नाही. मात्र संवेदनाशील व्यक्तीने ते ऐकलं, की त्याला निश्चित वाट मिळते आणि पुन्हा नव्यानं सुरूवात करण्याची उभारी मिळते. असा संवेदनाशील आणि सामर्थ्यशील समूह-समाज आपल्याबरोबर उभा असणे, ही सर्वात मोठी जमेची बाजू असते. त्यासाठी काय करता येईल ? पुढच्या लेखात वाचू.